सोलापूर तरुण भारत

आसमंत

# संघाची शंभर वर्षांची यात्रा

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपली शंभर वर्षे पूर्ण केली आहेत. संघाच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत संघाचा सतत वाढता विस्तार, संघाची वाढती शक्ती आणि प्रभाव बघून लोकांमध्ये संघकार्याला जाणण्याची आणि ते समजून घेण्याची उत्सुकता वाढत आहे. गुढी पाडव्याच्या निमीत्ताने संघाला समजून घ्यायचे असेल तर त्याचे संस्थापक आद्य सरसंघचालक डॉ. हेडगेवार यांना समजून घेणे गरजेचे आहे.**



निमीत्त

**डॉ. मनमोहन वैद्य,** सदस्य

अखिल भारतीय कार्यकारिणी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

आपला देश इंग्रजांच्या गुलामगिरीत असल्याचा तीव्र संताप आणि आक्रोश त्यांच्या मनात खदखदत होता. तो त्यांच्या बालपणीदेखील अनेक रूपाने प्रकट होताना दिसतो. त्यांच्या मनात हे स्पष्ट होते की, केवळ स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणे म्हणजे केवळ आजारपणाच्या लक्षणांचा उपचार करण्यासारखे आहे. म्हणून सर्वप्रथम इतक्या विशाल, समृद्ध आणि संपन्न भारतीय समाजाला गुलामगिरी पत्करण्याची वेळ का म्हणून आली, याचा विचार करायला हवा. म्हणूनच मूळ आजाराच्या उपचाराकरिता समाजाचे आत्मभान जागृत करणे, स्वाभिमान, एकता, परस्पर सौहार्द, अनुशासन आणि राष्ट्रीय चारित्र्य निर्माणाचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सर्व प्रकारे सक्रिय राहून त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना ऑक्टोबर १९२५ च्या विजयादशमीच्या शुभदिनी केली; ज्यामुळे संपूर्ण भारताची विशिष्ट ओळख सर्वत्र आहे.

अध्यात्म आधारित एकात्म आणि सर्वांगीण जीवन दृष्टीला, ज्याला जग हिंदुत्व किंवा हिंदू जीवनदृष्टीच्या रूपात ओळखते, त्या हिंदुत्वाला जागृत करून संपूर्ण समाजाला एका धाग्याने परस्पर जोडून निर्दोष आणि गुणवान हिंदू समाजाच्या संघटनेचे हे कार्य करण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना करण्यात आली. त्या वेळीच्या सर्व विचारक, प्रबुद्ध चिंतक आणि नेतृत्वाशी दाट परिचय आणि जवळीक असतानाही डॉक्टर हेडगेवार यांची दृष्टी विशिष्ट (unique), व्यापक, सर्व समावेशी व दूरगामी होती. (His vision was well grounded and much ahead of other contemporary leaders.) त्या काळात भारतात अनेक आध्यात्मिक, सामाजिक व इतर संघटनांची सुरुवात झाली. भारताला सावरण्यात त्यांनी आपले श्रेष्ठ योगदान दिले. त्याच प्रकारे हिंदू समाजात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ नावाने आणखी एक संघटना सुरू होणं अस्वाभाविक नव्हतं. पण सुरुवातीपासूनच हे स्पष्ट होते की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ समाजातील एक संघटना किंवा संस्था म्हणून नाही, तर संपूर्ण हिंदू समाजाचे संगठन या रूपात काम करेल. एका ज्येष्ठ चिंतकाने म्हटले आहे की, परिकल्पनेच्या दृष्टीने बघितल्यास संघ आणि हिंदू समाज समव्याप्त (co-terminus) आहे आणि मनोवैज्ञानिक दृष्टीने बघितले तर संघ आणि हिंदू समाज एकात्म आहे. म्हणूनच डॉक्टर हेडगेवार यांनी 'वादोनाऽवलमब्या:' आणि 'सर्वेषाम् अविरोधेन' संपूर्ण समाजाला संघटित करण्याचा संकल्प केला. सध्याचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी आपल्या एका वक्तव्यात असे म्हटले आहे की, ''त्यांनी भलेही आमचा विरोध करायचे ठरविले असले, तरीही आमचे कुणीही विरोधी नाहीत. त्यांच्या संघ-विरोधाने संघाचे काही नुकसान तर होत नाही ना, इतकी सावधानता बाळगून आम्ही त्यांना आत्मीयतेने भेटायला जाऊ.'' व्यक्ती निर्माण आणि समाज संघटित करण्याचे हे 'नित्य' कार्य अविरतपणे, परिस्थिती निरपेक्ष चालत राहील आणि समाजात वेळोवेळी परिस्थितीनुसार येणाऱ्या आव्हानांचा सामना करण्याच्या आवश्यक 'अनित्य' कार्यातदेखील स्वयंसेवक सक्रियतेने सहभागी होतील, असा वस्तुपाठच हेडगेवारांनी आपल्या आचरणातून दिला.

संघाच्या स्थापने आधी सन १९२१ मध्ये महात्मा गांधी यांच्या आव्हानावर झालेल्या असहयोग आंदोलनात डॉ. हेडगेवार यांनी भाग घेतला होता. त्यांना एक वर्षाचा तुरुंगवास भोगावा लागला होता. संघस्थापनेनंतर महात्मा गांधींच्या आवाहनावरून हेडगेवारजींनी सविनय कायदेभंग आंदोलनाच्या अंतर्गत १९३० च्या जंगल सत्याग्रहात ('अनित्य' कार्य) स्वयंसेवक या नात्याने बाकी स्वयंसेवकांसोबत भाग घेतला आणि ९ महिने कारावास सोसला. पण तरीही संघाचे 'नित्य' कार्य अविरत सुरू राहण्यासाठी त्यांनी सरसंघचालकाचे दायित्व आपले सहयोगी डॉ. लक्ष्मण वासुदेव परांजपे यांना सोपविले होते. हा 'नित्यानित्य विवेक' हेडगेवारजींचे वैशिष्ट्य होते, जे केवळ महत्त्वाचेच नसून संघकार्याची पुढील वाटचाल कशी असावी, याचे मार्गदर्शन करणारे होते. समाजाकडून आर्थिक सहायता घेऊन समाजहिताची कामे करण्याची जी परंपरा भारतात पूर्वीपासून चालत आलेली आहे, ती आजतागायत सुरू आहे; पण संघकार्य हे देशकार्य आहे, हे माझे काम आहे आणि ते समाजाकडून पैसे घेऊन नाही, तर स्वयंसेवकांच्या गुरुदक्षिणेतून जी समर्पण राशी प्राप्त होते त्यातूनच चालेल, असा अनोखा विचार हेडगेवारांनी मांडला आणि अं लात आणला. याच प्रकारे संघकार्य आजवर चालत आले आहे.

श्रेष्ठ आदर्श व्यक्तीस गुरू मानण्याची परंपरा भारतात शेकडो वर्षांपासून चालत आलेली आहे, जी आजतागायत प्रचलनात आहे; पण 'संघ' संपूर्ण समाजाचे संघटन असल्यामुळे संघात कुणाही व्यक्तीला गुरुपद दिलेले नाही. हिंदू समाज जितका प्राचीन आहे, त्याचा गुरू, हिंदुत्वाचा प्रतिनिधी आणि तितकेच प्राचीन असे प्रतीक असू शकेल, या विचाराने भगवा ध्वज संघात गुरू म्हणून प्रस्थापित झाला. स्वामी विवेकानंदांची शिष्या भगिनी निवेदिता (मूळची आयरीश, मार्गरेट नोबेल) यांनी १९०६ मध्ये स्वतंत्र भारताच्या ध्वजाचा जो पहिला नमुना तयार केला होता, त्यात भगव्या रंगाच्या कापडावर पिवळ्या रंगाचे वज्र चिन्ह अंकित होते. स्वतंत्र भारताचा राष्ट्रध्वज कसा असावा, यावर विचार करण्यासाठी १९३१ साली काँग्रेसने एक ध्वज समिती (flag committee) ने ली. जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मास्टर तारा सिंह, मौलाना अब्दुल कलाम आझाद, पट्टाभी सीतारामय्या (संयोजक), काका कालेलकर आणि डॉ. हर्डीकर या समितीचे सदस्य होते. सर्वांनी एकमताने प्रस्ताव ठेवला की, भारताच्या ध्वजाचा रंग एकच असावा आणि तो भगवा असावा. कारण हा रंग विशिष्ट (distinct) आहे. हा रंग भारताच्या सर्वजनसामान्यांना सहज स्वीकार्य आहे आणि या प्राचीन देशाच्या इतिहासाशी दीर्घकाळापासून निगडित असा आहे. ध्वज समितीने सर्वानु ते प्रस्ताव मांडला की, आयताकार भगव्या कपड्यावर निळ्या रंगाने 'चरखा' अंकित केलेला असावा. आर्य समाज आणि हिंदू महासभेचे ध्वज भगव्या रंगाचेच आहेत, ज्यावर सूर्य वा ओंकार अंकित आहे. त्यावेळी प्रस्तावित किंवा प्रचलित सगळ्या ध्वजांवर कुठले न कुठले चिन्ह अंकित असायचेच. पण १९२७ पासून संघात प्रचलित, गुरुस्थानी स्थापित भगव्या ध्वजावर कुठलेही चिन्ह अंकित केले गेले नाही. कारण संघ, समाजाच्या अंतर्गत एक संस्था वा संघटना नसून हे संपूर्ण समाजाचे संघटन आहे, ही त्यामागची मूळ कल्पना आहे. राष्ट्रीय चारित्र्यनिर्माण आणि सामूहिक गुणांच्या उपासनेकरिता आपल्या ध्येयाचे नित्य स्मरण करण्यासाठी नियमितपणे एकत्रित होण्यासाठी 'शाखा' नामक कार्यपद्धती संघात विकसित झाली. दैनंदिन सामान्यतः एक तासभर चालणाऱ्या शाखेत हा भाव जागविला जातो की, भारतातील संपूर्ण समाज एक आहे, सर्व समान आहेत आणि सर्व आपले आहेत. त्याचसोबत उद्यम, साहस, धैर्य, शक्ती, बुद्धी आणि पराक्रम असे गुण बाणविण्यासाठी खेळ व विविध कार्यक्रम शाखेत होऊ लागले. अनुशासन, एकता, शौर्य आणि सामूहिकता निर्माण करण्याकरिता परेड, बँडच्या तालावर पथसंचलन, व्यायाम-योग (पीटी) सारखे कार्यक्रम जे ब्रिटिश सेनेपासून स्वीकारले तेही शाखेत होऊ लागले आणि ती परंपरा आजदेखील सुरू आहे. शाखा म्हणजे मुळात सामूहिक गुणांची उपासना आणि व्यक्तिगत गुणांचा सामूहिक अभ्यासाचा एक कार्यक्रम, एक साधन आहे. समाजाला आपले मानून त्यासाठी काही न काही (कधी कधी सर्वस्व) देण्याचा, जे समाजाकडून मिळाले आहे त्याची परतफेड करण्याचा संस्कार या शाखेच्या माध्यमातून प्राप्त होतो. या विचाराला व्रत म्हणून स्वीकार करून आयुष्यभर त्या व्रताचे पालन करण्याचा संकल्प घेऊन जगणाऱ्या सहयोगी कार्यकर्त्यांना बघून, त्यांच्या संपर्काने प्रेरणा घेऊन प्रसन्नतेने हजारो-लाखो कार्यकर्त्यांच्या सहयोगाने हा समर्पण यज्ञ आजतागायत सतत सुरू आहे.

आज संपूर्ण भारतातील ९२४ जिल्ह्यांपैकी ९८.३ टक्के जिल्ह्यांत संघशाखा कार्यरत आहेत. एकूण ६६१८ खंडांपैकी (तालुका) ९२.३ टक्के खंड (तालुका), एकूण ५८,९३९ मंडलांपैकी (मंडल म्हणजे १०-१२ खेड्यांचा एक समूह) ५२.२ टक्के मंडलांत एकूण ५१,७१० स्थानी ८३,१२९ दैनिक शाखा आणि याशिवाय २१,९३६ स्थानी २२,८६६ साप्ताहिक मिलन केंद्र या माध्यमातून देशभरात संघकार्याचा विस्तार झाला आहे व यात सतत वाढ होत आहे. या ८३,१२९ दैनिक शाखांपैकी ५९ टक्के शाखा विद्यार्थ्यांच्या आहेत आणि उर्वरित ४१ टक्के व्यवसायी स्वयंसेवकांच्या शाखांपैकी ११ टक्के शाखा प्रौढ स्वयंसेवकांच्या आहेत. उरलेल्या सगळ्या शाखांमध्ये तरुण व्यवसायी स्वयंसेवक आहेत. खेळ आणि इतर कार्यक्रमांच्या माध्यमातून व्यक्ती निर्माण करण्याचे कार्य संघ शाखांमधून केले जाते, त्यात केवळ पुरुषांचा सहभाग असतो. याच कार्याकरिता स्त्रियांसाठी राष्ट्र सेविका समितीच्या माध्यमातून शाखांचे संचालन केले जाते. स्वयंसेवकांद्वारे प्रचार विभाग, संपर्क विभाग आणि सेवा विभागाच्या माध्यमातून समाजजागरणाचे जे काम सतत सुरू आहे, त्या सर्व कार्यात स्त्रियांचा सहभाग आहे. स्त्रियांच्या भागीदारीत अजून वाढ व्हावी याकरिता सतत प्रयत्न सुरू आहेत. याचप्रकारे समाजपरिवर्तनाचे कार्य, धर्मजागरण (पान ४ वर)

# आखातातील युद्धाची जगाला झळ




लक्ष्यवेध

**अनय जोगळेकर**

सुमारे दहा दिवसांच्या अनिश्चिततेनंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिका विजयाच्या समीप असून लवकरच हे युद्ध थांबेल, अशी घोषणा केली. त्यामुळे बॅरलला १५० डॉलरकडे वाटचाल करणारे खनिज तेलाचे भाव १०० डॉलरपेक्षा कमी झाले. जमिनीवर हे युद्ध थांबण्याची कोणतीही शक्यता दिसत नसताना, तसेच यापूर्वी ट्रम्प यांनी हे युद्ध काही आठवडे, कदाचित काही महिने चालण्याची शक्यता वर्तवली असताना, या एका वक्तव्यामुळे शेअर बाजारासह सर्वांनाच हुरुप आला. दि. २८ फेब्रुवारीला अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हवाई हल्ल्यांमध्ये इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्यासह इराणच्या लष्करी नेतृत्वातील ४० हून अधिक वरिष्ठ अधिकारी मारले गेले. मिनाब येथील नाविक तळाला लक्ष्य करण्याच्या प्रयत्नांमध्ये अमेरिकेचे 'टॉमाहॉक' क्षेपणास्त्र एका मुलींच्या शाळेवर पडले. या हल्ल्यामध्ये अनेक लहान मुलींसह १५० हून अधिक लोक मारले गेले. इराणने इस्रायलसकट अमेरिकेचे लष्करी किंवा नाविक तळ असणाऱ्या सर्व मित्रदेशांविरुद्ध क्षेपणास्त्रे, तसेच ड्रोनचा मारा सुरू केला. या हल्ल्यांमध्ये सात अमेरिकन सैनिक मारले गेले.

इराणवरील हल्ल्यांमध्ये मारल्या गेलेल्या लोकांची संख्या १ हजार, ३०० हून अधिक असली, तरी त्यात मुख्यतः इराणमधील इस्लामिक राजवटीशी संबंधित लोकांचा समावेश असल्याचे अमेरिका आणि इस्रायलने म्हटले आहे. इस्लामिक राजवटीच्या गेल्या ४७ वर्षांच्या काळात पाश्चिमात्य देशांकडून विविध प्रकारचे निर्बंध असल्यामुळे इराणचे हवाई दल, तसेच शस्त्रास्त्रे अनेक दशके जुनी होती. इराणची बरीचशी लढाऊ विमाने, तसेच नौदलाची जहाजे या युद्धामध्ये बुडवली गेली. त्यात हिंदी महासागरात श्रीलंकेच्या किनाऱ्या जवळ आंतरराष्ट्रीय समुद्रात बुडवलेल्या 'इरिस देना' या युद्धनौकेचाही समावेश आहे. असे असले तरी, निर्बंधांच्या काळात इराणने मोठ्या प्रमाणावर दीर्घ पल्ल्याची क्षेपणास्त्रे, तसेच ड्रोनची निर्मिती केली होती. इराणच्या 'शहीद' ड्रोननी सर्व आखाती देशांमध्ये दहशत निर्माण केली. या ड्रोन हल्ल्यांमध्ये मारल्या गेलेल्यांची संख्या फारशी नसली, तरी त्यांनी आखाती देशातील अमेरिकेचे दूतावास, सैन्यतळ, विमानतळ, तेलशुद्धीकरण प्रकल्प आणि पर्यटनकेंद्रांना लक्ष्य केले.

**जग हे एक खेडे असल्याच्या सिद्धांताचा परिचय सध्या सुरु असलेल्या आखाती युद्धामुळे अवघ्या जगाला आला. इंधनाबरोबरच मालवाहतुकीवरही मोठ्या प्रमाणात परिणाम झाल्याने व्यापारही थंडावला. त्यामुळे या युद्धाची झळ संपूर्ण जगालाच बसली असून, दिवसेंदिवस त्याचे परिणाम अधिक प्रकर्षाने दिसू लागले आहेत. त्यामुळे हे युद्ध आणखीन लांबले, तर त्याचे अधिक गंभीर परिणाम जगाला भोगावे लागतील.**

आखाती देशांकडे अत्याधुनिक शस्त्रास्त्रे असली, तरी त्यांना युद्ध लढण्याचा अनुभव नाही. गेल्या काही दशकांमध्ये कतार आणि संयुक्त अरब अमिरातींमध्ये प्रचंड समृद्धी आली आहे. संयुक्त अरब अमिरातींची लोकसंख्या दहा लाखांपासून वाढून एक कोटींच्या वर गेली आहे. २०२५मध्ये या देशात गृहनिर्माण क्षेत्रात २५० अब्ज डॉलरचे व्यवहार झाले. त्यातील २३ टक्के घरांची खरेदी भारतीयांनी केली. तीच गोष्ट तेथील तेल आणि नैसर्गिक वायूच्या व्यापारालाही लागू पडते. इराण आणि संयुक्त अरब अमिरातीमध्ये पर्शियाच्या आखाताची रुंदी जेमतेम २० मैल असून, मोठ्या जहाजांच्या प्रवासासाठी तेथील जेमतेम दोन मैल रुंदीचा भाग सुयोग्य आहे. याचाच अर्थ, एका दिशेने वाहतुकीसाठी केवळ एक मैल एवढाच भाग योग्य आहे. या भागाला 'होर्मुझची सामुद्रधुनी' म्हटले जाते. या भागातून जगातील २० टक्के खनिज तेल, २५ टक्के नैसर्गिक वायू आणि २५ टक्के खतांची वाहतूक होते. भारताच्या एकूण गरजेपैकी सुमारे ५० टक्क्यांहून अधिक इंधन पुरवठा या भागातून केला जातो. इराणने हा भाग बंद करत असल्याची घोषणा करून या भागातून वाहतूक करणार्या जहाजांना, तसेच तेलाच्या टँकरवर हल्ले करायला सुरुवात केली. त्यामुळे विमा कंपन्यांनी आपले हात वर केले. गेला आठवडाभर होर्मुझचे आखात बंद असून त्याचा जागतिक तेल, नैसर्गिक वायू आणि अन्नधान्याच्या व्यापारावर परिणाम झाला आहे. अमेरिका तेलाच्या बाबतीत स्वयंपूर्ण असल्याने या टंचाईची अमेरिकेला फारशी झळ बसणार नसली, तरी तेलाचे भाव वाढल्याने अमेरिकेतील निवडणुकांवर त्याचा परिणाम होऊ शकतो. इराणकडे पाच हजारांहून अधिक समुद्री सुरुंग असून, ते पेरल्यास आखातातील वाहतूक सुरू करायला काही महिने लागू शकतात. आखाती देश समुद्राच्या शुद्ध केलेल्या पाण्यावर अवलंबून आहेत. इराणमध्ये पाच टक्के पाण्याचा पुरवठा समुद्राच्या पाण्याच्या शुद्धीकरणाद्वारे होत असला, तरी संयुक्त अरब अमिराती, बहारीन आणि कतारमध्ये हेच प्रमाण ८० ते ९० टक्के आहे. युद्धादरम्यान आपल्या जलशुद्धीकरण प्रकल्पावर हल्ला झाल्याचे घोषित करून इराणने आपण त्याचे प्रत्युत्तर देणार असल्याचे सांगितले. पाठोपाठ बहारीन येथील जलशुद्धीकरण प्रकल्पावर हल्ला करण्यात आला. जर समुद्राच्या पाण्याच्या निक्षारीकरण प्रकल्पांना लक्ष्य करण्यात आले, तर अनेक आखाती देशांच्या भविष्यासमोर गंभीर प्रश्न निर्माण होईल. या युद्धामध्ये इराणच्या तुलनेत आखाती अरब देशांचे लष्करीदृष्ट्या खूप कमी नुकसान झाले आहे.

अमेरिकेकडून विकत घेतलेल्या 'हवाई हल्ले प्रतिरोधक यंत्रणे'मुळे या देशांना इराणकडून येणारे ९५ टक्के ड्रोन आणि क्षेपणास्त्रे हवेत नष्ट करणे शक्य झाले. असे असले तरी, या क्षेपणास्त्रांची संख्या मर्यादित आहे. वर्षभरात सुमारे ९६ 'थाड' आणि ५०० ते ६२० 'पॅट्रियट' क्षेपणास्त्रांची निर्मिती केली जाते. इराणकडून येणारे क्षेपणास्त्र हवेतल्या हवेत नष्ट करण्यासाठी दोन 'पॅट्रियट' क्षेपणास्त्रांचा वापर करण्यात येतो. त्यामुळे हे युद्ध लांबल्यास आखाती देशांकडचा क्षेपणास्त्रांचा साठा संपण्याची भीती आहे. या युद्धाचा फायदा (पान ४ वर)

राष्ट्रक्षा

मल्हार कृष्ण गोखले

# बदल! सतत बदल! निसर्गाचा न बदलता नियम





**काळ प्रवाही आहे. काळाच्या प्रवाहामध्ये अनेक गोष्टी बदलत जातात. युगे बदलली, राष्ट्रांच्या सीमा बदलल्या, सत्ता बदलल्या फक्त बदलला नाही तो 'बदल.' जगाच्या इतिहास कालातीत असलेल्या या बदलाचा विविध घटनांच्या माध्यमातून घेतलेला मागोवा...**

तुम्ही 'ग्रँड ट्रंक रोड' हे नाव ऐकलेय का? इंग्रजी वाघिणीचे दूध प्यायलेल्या एखाद्या विद्वानाला विचारा. लगेच तो मिशांना पीळ भरत (असल्या तर) तुम्हाला सांगेल, वा, ग्रँड ट्रंक रोड म्हणजे काय विचारता? इंग्रजांनी इथल्या 'ऑल दी ब्लडी इंडियन नेटिव्ह' लोकांसाठी जी अनेक हितकारक सार्वजनिक कामे केली, त्यातलेच ग्रँड ट्रंक रोडची उभारणी हे एक मोठे काम होय. कलकत्ता (आता कोलकाता) ते पार काबूलपर्यंतचा सुमारे एक हजार, ५०० मैल लांबीचा हा सुंदर राजमार्ग, इंग्रजांनी सन १८३० ते १८६० या काळात बांधून काढला. ही विधाने म्हणजे सत्य आणि असत्य याची छानशी मिसळ आहे.

मुळात हा मार्ग अत्यंत प्राचीन आहे. म्हणजे किती प्राचीन? तर हिंदू परंपरेनुसार सर्वप्रथम मगधसम्राट चंद्रगुप्त मौर्याने तो बांधला. तो तत्कालीन वंग प्रदेशातल्या ढाक्यापासून सुरू होऊन, तत्कालीन पंचनद आणि गांधार यांच्या सीमेवरील पुरुषपूर ऊर्फ पेशावर इथे संपायचा. प्राचीन भारतीय साहित्यात या राजपथाला म्हटले आहे- उत्तरापथ! उत्तर भारताच्या पूर्व टोकापासून पश्चिम टोकापर्यंत, आडवा छेद दिल्यासारखा जाणारा तो उत्तरापथ!

पुढच्या काळात या मार्गाची दुरुस्ती, बांधबंदस्ती केली, ती सूर घराण्याच्या शेरशाह सूरी याने. हा हुमायूनचा पराभव करून, अल्पकाळ दिल्लीत सत्ताधारी झाला होता. त्याने विहिरी, तळी, धर्मशाळा, रस्ते अशी थोडीफार सार्वजनिक कामे केली. पण, त्याच्यानंतर दिल्लीत पुन्हा अकबर सत्ताधीश झाला आणि सार्वजनिक कामे वगैरे भंकसबाजी थांबली. सगळे मुघल बादशाह किंवा एकंदरीतच वेगवेगळ्या घराण्यांचे सुलतान यांनी मोठमोठे महाल बांधले, तलाव बांधले, शालिमार बाग सारखे रम्य बगीचे तयार केले. कुणासाठी? सार्वजनिक वापरासाठी, म्हणजे सर्वसामान्य लोकांसाठी? छे! छे! हे सगळे त्यांनी उभे केले स्वतःच्या ऐयाशीसाठी!

अगदी तसेच, इंग्रजांनी ज्या काही कथित सुधारणा आणल्या, त्या इथल्या सामान्य माणसासाठी नव्हे; तर आपला व्यापार वाढविण्यासाठी. इंग्रज हे पक्के धंदेवाईक, सततोद्योगी, दीर्घोद्योगी. प्रत्येक गोष्टीतून पैसा कसा काढता येईल, इकडे त्यांचे प्रथम लक्ष. ते साध्य झाल्यावर जमले तर ऐयाशी करायची. त्यामुळे १८३० साली 'ईस्ट इंडिया कंपनी'ने निर्णय घेतला की, आपली राजधानी असलेल्या कलकत्ता शहरापासून थेट पेशावर, आणि पुढे काबूलपर्यंत मार्ग बांधायचा. त्या काळामध्ये मुघली अमलामुळे उत्तरापथचे नाव झाले होते 'सडक-ए-शेरशहा-'शेरशहाचा मार्ग'. इंग्रजांनी जवळपास तोच मार्ग, काही ठिकाणी त्यांना सोयीची ठिकाणे त्याला जोडून नवा मार्ग उभारला आणि त्याला नाव दिले- 'ग्रँड ट्रंक रोड'. १४९१ मैल किंवा सुमारे दोन हजार, ४०० किमीचा हा सुंदर मार्ग, इंग्रजांनी आपल्या व्यापारी आणि लष्करी हालचाली वेगाने व्हाव्यात म्हणून बांधला; भारतीय जनतेच्या सोयीसाठी नव्हे. परंतु, त्यामुळे भारतीय लोकांची आपोआपच सोय झाली एवढेच. १८३३ ते १८६० पर्यंत हे भव्य काम चालू होते. साहजिकच, 'ईस्ट इंडिया कंपनी'च्या इंग्लंडहून आलेल्या आधुनिक अभियंत्यांसमोर प्रश्न आला.

आधुनिक पद्धतीने रस्ता बांधण्यासाठी कुशल सहायक हवेत. म्हणून तत्कालीन संयुक्त प्रांतातील सहारनपूर जवळच्या रूडकी (भ्रष्ट इंग्रजी उच्चार रूरकी) या गावी, एक अभ्यासवर्ग सुरू करण्यात आला. ते साल होते १८४५. हळूहळू त्या अभ्यासवर्गाला अभियांत्रिकी विद्यालयाचे रूप आले. त्यातून १८४७ साली 'ईस्ट इंडिया कंपनी'चे सिव्हिल इंजिनिअरिंग डिपार्टमेंट निर्माण झाले. १८५४ साली या विद्यालयाला लेफ्टनंट गव्हर्नर जेम्स टॉमसन यांच्या स्मरणार्थ 'टॉमसन कॉलेज ऑफ सिव्हिल इंजिनिअरिंग' असे नाव देण्यात आले. हेच आजचे 'आय.आय.टी. रूडकी' होय. तर, चल-अचल वस्तूंच्या, व्यक्तींच्या, संस्थांच्या, ठिकाणांच्या रंगरूपांत, नावांत, कार्यांत, गुणधर्मांत सतत असे बदल होतच असतात.

कारण काळ सतत बदलत असतो. काही बदल समाजाला आवडतात, काही बदल समाज स्वतः होऊन करतो. काही बदल समाजावर लादले जातात, काही बदल समाज कुरकुर करत स्वीकारतो. जे समाजधुरीण असे बदल घडवून आणतात, त्यांची इच्छाशक्ती मोठी असते. त्यांना माहीत असते की काळाबरोबर जो बदलतो, तोच टिकतो.

बदल नेमका कुठे, कसा, किती प्रमाणात घडवायचा, हेही त्यांना माहीत असते. त्यामुळे चिरंतन मूल्ये न बदलता, ते योग्य तो बदल घडवतात. म्हणून अशा धुरीणांना 'द्रष्टा' असे म्हणतात. ज्या समूहांना असे द्रष्टे मिळत नाहीत किंवा जे समूह आपल्या पुस्तकांना 'अपरिवर्तनीय' म्हणून घट्ट चिकटून बसतात, त्यांचे काही खरे नसते. उदा. एका पुस्तकातल्या तत्त्वज्ञानाला प्रमाण मानून एका अवाढव्य युरोपीय देशाने आपली राज्यव्यवस्थाच नव्हे, तर संपूर्ण जीवनव्यवस्थाच नव्याने बांधली. आता पृथ्वीवर जणू स्वर्गच अवतरला, असे डिंडिम पिटले जाऊ लागले. पण, अवघ्या ७० वर्षांत कल्पनेतला स्वर्ग दणकन जमिनीवर आदळला. 'रशियन एम्पायर'चे 'युनायटेड सोशलिस्ट सोव्हिएत रिपब्लिक्स' (यू.एस.एस. आर.) आणि पुन्हा 'रशियन फेडरेशन' झाले.

१९१२ साली इंग्रजांनी आपली भारतीय राजधानी कलकत्त्याहून हलवून दिल्लीला नेली. गोऱ्या इंग्रजी राज्यकर्त्यांना भारतीय हिंदू-मुसलमान नागरिकांबद्दल मनःपूर्वक तिरस्कार, तुच्छता वाटत असे. त्यामुळे त्यांच्या दृष्टीने शहर दिल्ली म्हणजे जुनी दिल्ली हे 'ब्लॅक टाऊन' होते. म्हणून त्यांनी स्वतःसाठी नवी दिल्ली हे नवे 'व्हाईट टाऊन' उभारले. हे करताना नव्या आणि जुन्या दिल्लीतल्याही अनेक रस्त्यांना, चौकांना इंग्रजांची आणि आधीच्या मुघली राज्यकर्त्यांचीही नावे दिली गेली. बाबर रोड, अकबर रोड, औरंगजेब रोड, बहादुरशहा जफर रोड, शाहजहान रोड, तुघलख रोड, सफ्दरजंग एनक्लेव्ह, किंग्जवे, राटेंडन रोड, आयर्विन रोड, ॲलनबी रोड, कॅनिंग रोड, एडवर्ड रोड इत्यादी. बंगालची फाळणी करणारा कुप्रसिद्ध व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन याच्या नावाने तर, एक 'कर्झन लेन' पण होती आणि एक 'कर्झन रोड' पण होता. तत्कालीन मद्रासचा फ्रेंच गव्हर्नर जोसेफ डुप्ले याचा इंग्रजांनी पराभव केला. त्यामुळे भारत जिंकण्याचे फ्रेंचांचे स्वप्न विरून गेले. पण, नव्या दिल्लीत इंग्रजांनी आपल्या या जबरदस्त शत्रूचेदेखील नाव एका रस्त्याला दिले. स्वातंत्र्यानंतर ही सगळी इंग्रजी नावे आणि इंग्रजांचे पुतळे हलवायला, सगळ्याच ठिकाणी सुरुवात झाली. स्वातंत्र्यानंतरच्या काँग्रेसी सरकारांची गंमत पहा हं! इंग्रजांची नावे सहजपणे हटली पण, मुसलमानी सुलतानांची नावे मात्र हटायला तयार नाहीत. बाबर, अकबर, शाहजहाँ, सफ्दरबंग, लोदी, तुघलख अजून घट्ट आहेत. २०१५ साली 'औरंगजेब रोड'ची मात्र मोठ्या कुशलतेने उचलबांगडी करून, तिथे 'डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम रोड' करण्यात आले. त्यांच्या नावाला कुणीही कोणत्याच मुद्द्यावर विरोध करूच शकत नाही. तरी ते हयात असताना आपल्याकडचे एक खुसपटे काढण्यात प्रवीण असलेले स्वयंघोषित विचारवंत बोललेच होते की, 'त्यांना कशाला राष्ट्रपती करताय? ते महान शास्त्रज्ञ आहेत पण, त्यांना राजकारणातले काय कळतेय?' इत्यादी. असो, तर आज ना उद्या मुघली सल्तनतीची प्रतीके असणारे ढांचे, वास्तू, नावे जाणार, हे नक्की. आमची मुलगी किंवा मुलगा किनई कॅलिफोर्नियाला आहे हो, असे सांगण्याची फॅशन आपल्याकडच्या नवशिक्षितांमध्ये आहे.

कॅलिफोर्नियात कुठे आहे? असे विचारले तर त्यांना सांगता येत नाही. कारण मुळात इंग्लंड-अमेरिका ही नावे, ते आपल्याकडच्या पेण-पनवेल प्रमाणेच घेत असतात. असतील एकमेकांपासून तासाभराच्या अंतरावर! असो, अमेरिका म्हणजे 'युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका' हा पूर्वेच्या अटलांटिक महासागर किनार्यापासून, पश्चिमेच्या पॅसिफिक समुद्रकिनाऱ्यापर्यंत पसरलेला एक अवाढव्य देश आहे. त्याच्या एका टोकापासून दुसर्या टोकापर्यंत विमानातून जायलादेखील आठ तास लागतात. न्यूयॉर्क, न्यूजर्सी, वॉशिंग्टन डी. सी. ही शहरे त्याच्या पूर्वकिनाऱ्यावर आहेत; तर सान फ्रान्सिस्को, लॉस एंजल्स, हॉलीवूड वगैरे पश्चिम किनार्यावर आहेत. कॅलिफोर्निया हे राज्य त्याच्या पश्चिम किनार्यावर असून, सेक्रमेंटो हे शहर त्याची राजधानी आहे. मात्र, या अधिकृत राजधानीपेक्षा राज्यातले सान फ्रान्सिस्को हे शहर जगभर जास्त प्रसिद्ध आहे. सेक्रमेंटो शहराजवळ साधारण ५०-५५ कि.मी.वर 'प्लेसरव्हिल' नावाचे एक छोटसे गाव आहे. गावाचे स्वतःचे असे एक मानचिन्ह-लोगो किंवा मोनोग्राम आहे. एक मनुष्य खड्डा खणून त्यातून काहीतरी वस्तू काढतोय. त्याच्या मागे एका झाडावरून एक फास लटकतो आहे, असे हे मानचिन्ह आहे. या चित्रापाठी गावाच्या स्थापनेचा इतिहास आहे.सन १८४८ साली कॅलिफोर्निया प्रांतात सोने सापडले. अख्ख्या अमेरिकेतून हौशे-नवशे-गवशे कॅलिफोर्निया येऊ लागले. सोने आले की, गुन्हेगारी आलीच. १८४८ साली जेम्स मार्शल नामक एका संशोधकाला या परिसरात, सिएरा निवाडा पर्वताच्या पायथ्याशी एका ओढ्यात सोन्याचे कण दिसले. मग अनेक संशोधक आले. सोने मिळत गेले आणि अनेकांनी तिथेच घरे बांधून गाव वसवले. पण, काही गुन्हेगारांनी एका संशोधकाला लुटून ठार केले. इतरांनी गुन्हेगारांना पकडले. आता सेक्रमेंटोहून शेरीफ येणार, वगैरे वाट बघायला लोकांना धीर नव्हता. त्यामुळे आपण 'वेस्टर्न-काऊबॉय' चित्रपटात बघतो, तसेच घडले. लोकांनी त्या गुन्हेगारांना एक झाडावर फाशी दिले आणि विषय संपवला. पुढे या घटनेवरून लोकांनी आपल्या या नव्या गावाचे नाव, मोठ्या हौसेने ठेवले- हँगटाऊन-फाशीगाव, आणि गावाच्या मानचिन्हामध्ये सोन्याचे उत्खनन नि फाशी दोन्हीचे चित्र ठेवले. अलीकडेच कौन्सिलच्या सभासदांची एक विशेष बैठक झाली. विषय असा होता की, गावाच्या मानचिन्ह चित्रातला सोन्याचे उत्खनन करणारा हॅटवाला बुवा ठेवा; पण मागे झाडाला लटकणारा फासाचा दोर काढून टाका, तो अयोग्य वाटतो. यावर बरीच चर्चा होऊन अखेर फाशीचा दोर हटवण्याचा निर्णय घेण्यात आला. निर्णयाच्या विरुद्ध मत देणाऱ्यांचे म्हणणे असे की, फाशीच्या दोराच्या प्रतीकात अनुचित, अयोग्य, ऑड खरे पहाता काही नाही. तत्कालीन कायदा आणि सुव्यवस्थेची एकंदर व्यवस्था लक्षात घेता, आपल्या पूर्वजांनी कायदा हातात घेतला आणि स्वतःच गुन्हेगारांचा न्याय करून टाकला, हे फारसे चुकीचे म्हणता येणार नाही. तुम्ही आजचे नैतिक नियम त्या काळाला लावून, आपल्या गावाचा इतिहास बदलून टाकताय. त्यांच्या म्हणण्यातही नक्कीच तथ्य आहे. पण, बदल अपरिहार्य आहे.

सुखात्म

डॉ. अविनाश मोहरील

# जजमेंटल



इंग्रजी भाषेतला हा शब्द मी माझ्या साहित्याच्या अभ्यासात वाचला होता. फार तीव्रतेने 'इंग्लिश-विंग्लिश' नावाच्या चित्रपटात श्रीदेवीच्या तोंडी ऐकला. बरेच वेळा आपण जजमेंटल होतो आणि त्यानुसार वागू लागतो. असे करणे चूक असते असे नाही. कारण आपल्याला आलेल्या अनुभवांवरून आपण जजमेंटल होतो. कधी कधी या नादामध्ये आपण अकारण काही लोकांवर अन्याय करतो. आपले काही बाबतीत फार ठाम मत बनलेले असते व त्यावरूनच आपण लोकांच्या वागण्यासंदर्भात आडाखे बांधतो, त्यांच्या कृतींबद्दल वाच्यता करतो व आपले मत व्यक्त करतो. परंतु असे करणे कधी कधी चुकीचे व अन्यायकारक होऊ शकते.

विशेषतः अशा व्यक्तीच्या बाबतीत, जी व्यक्ती आपल्या पूर्व अनुभवांपेक्षा संपूर्णपणे वेगळी वागून आपल्याला आश्चर्याचा धक्का देते. अशा व्यक्तींच्या धक्क्यामुळे आपण उगाच जजमेंटल झालो, असे आपल्याला वाटू लागते. आपल्याला आलेले अनुभव जरी तसे असले, तरी ती व्यक्ती आपल्याला आलेल्या वाईट अनुभवांना चांगल्या अनुभवांमध्ये परावर्तित करून जाते. कधी कधी तर एकच व्यक्ती काही दिवसांनंतर संपूर्णपणे वेगळी वागून आपण तिच्याबद्दल अकारण जजमेंटल झाल्याचा आपल्याला पश्चात्ताप घडवून देते. एखादे साधे काम करणारी व्यक्ती आपल्याला योग्य पद्धतीने जगण्याचा धडा देऊ शकते; अर्थात आपली शिकण्याची तयारी असेल तरच. काही दिवसांपूर्वीच असाच एक जजमेंटल होऊ नये हे शिकविणारा धडा मला शिकायला मिळाला. माझ्याकडे कार साफ करायला आठवड्यातून दोन दिवस एक मुलगा यायचा. अतिशय मेहनती व कष्टाळू असा तो पोरगा होता. सकाळी ६ वाजेपासून ते १० वाजेपर्यंत लोकांकडे कार साफ करणे व त्यानंतर एका दुकानामध्ये सायंकाळपर्यंत नोकरी करणे असे त्याचे चरितार्थासाठी सुरू होते. गेल्या काही वर्षांपासून तो माझ्याकडे काम करायचा व स्वतःची कार असल्यागत अतिशय छान साफ सफाई करायचा. यासोबतच त्याचा आणखी एक गुण मला अतिशय भावला होता व तो म्हणजे तो अतिशय प्रामाणिक होता. गाडी आतल्या बाजूने साफ करताना कधी कधी समोरच्या कप्प्यात चिल्लर पैसे पडलेले असायचे, गाडीत गाणी ऐकण्यासाठी पेन ड्राईव्ह लागलेला असायचा. शिवाय इतरही काही छोट्या वस्तू पडलेल्या असायच्या.

एक वर्षाच्या कालावधीत एकाही वस्तूला किंवा पैशांना त्याने हात लावला नव्हता. अगदी चिल्लर पैसेदेखील, जे मी मोजलेलेही नसायचे, त्यांचीही संख्या कधीच कमी झाली नाही. यासोबतच गाडी नेहमी स्वच्छ ठेवत असल्याने मी त्याच्यावर खूश होतो. एका वर्षानंतर त्याने मला काही पैसे वाढवून मागितले जे मी अतिशय आनंदाने मान्य केले. एकंदरीत त्याचे छान काम सुरू होते. अशातच त्याने मला एक दिवस त्याच्या भविष्यातील एका योजनेबाबत सांगितले. त्याला त्याच्या परिसरात चप्पल-जोड्यांचे एक दुकान लावण्याची इच्छा होती. त्याने परिसरातील मार्केटचा अभ्यास केला होता व तशा प्रकारचे दुकान तेथे चालू शकेल असे त्याला खात्रीपूर्वक वाटत होते. मला त्याचे खरोखरीच कौतुक वाटले. इतकी मेहनत करून तो पोरगा आपल्या जीवनाचा विकास करण्यासाठी धडपडत होता. मी त्याला काही प्रश्न विचारून त्याच्या व्यवसायाचा व्याप व संधी समजून घेतल्या. त्याचा बारीक अभ्यास बघून मला त्याच्या यशस्वीतेबद्दल खात्री पटली. आमचे बोलणे झाल्यावर तो म्हणाला की, "सर, माझ्या व्यवसायाच्या सुरुवातीला जी रक्कम उभी करायची आहे त्याकरिता मला आपल्याकडून काही मदत हवीय. आपण मला पाच हजार रुपयांची मदत करावी. मी आपल्याकडे काम करून ते पैसे फेडून देईन."

मुळातच त्याच्या प्रामाणिकपणावर आणि मनापासून काम करण्याच्या कार्यशैलीवर खूश असल्याने मी त्याला लगेच पैसे दिले. त्यानंतर तो पुढे कार स्वच्छ करण्यासाठी येत राहिला. त्याला दिलेल्या मदतीपैकी जवळपास २०० रुपये त्याने काम करून फेडले आणि तो अदृश्य झाला. मला कोणतीही सूचना न देता त्याने अचानक कार स्वच्छ करायला येणे बंद केले. एखादा आठवडा वाट बघितल्यानंतर मी त्याला फोन केला तर 'फोन नंबर अस्तित्वात नाही' असे ऐकू आले. त्याचा दुसरा नंबर होता. त्यावर 'हा नंबर बंद आहे' असे कायम ऐकू येत होते. पुढचा आठवडा त्याला फोन करण्यात गेला. त्यानंतर मी तो काम करीत असलेल्या दुकानात जाऊन चौकशी करून आलो. तर कळले की, त्याने ती नोकरी दोन महिन्यांपूर्वीच सोडली आहे. आता मात्र माझी खात्री पटू लागली की, आपण पुन्हा एकदा फसविले गेलो. कारण या आधीही अशा प्रकारे मदत करण्याच्या प्रसंगांमध्ये मला बरेच वेळा आर्थिक फटके बसलेले होते. त्याकरिता कुणावरही पटकन विश्वास ठेवतोस, असे टोमणेही मला ऐकायला मिळतात. परंतु, यावेळी मला जास्त वाईट वाटत होते. कारण हा पोरगा असे काही करेल असे मला मनापासून वाटत नव्हते. त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल मी फारच आश्वस्त होतो. जवळपास महिना उलटून गेला. मी रोज त्याला फोन करून बघायचो, पण उपयोग झाला नाही.

शेवटी आपली फसवणूक झाली हे दुःख मनात ठेवून आणि या संपूर्ण प्रसंगाला जीवनातील एक कटू प्रसंग म्हणून जमा खाती टाकला. चर्चांमध्ये आणखी काही जणांना मी माझा अनुभव सांगितला. सोबतच आगांतूकपणे त्यांनीही अशी मदत करताना विचार करावा असे सुचविले. काही दिवसांनी ते बुडालेले ४८०० रुपये आपण नेहमी म्हणतो त्याप्रमाणे अक्कलखाती टाकून मी तो प्रसंग विसरून गेलो; तेवढ्यात माझ्या अत्यंत स्वाभाविकपणे जजमेंटल होण्याला चुकीचे ठरविणारी घटना घडली. (पान ६ वर)

संस्कारांच्या देशा

रमा गोळवलकर

# समावर्तन



व्रतबंध संस्काराविषयी माहिती करून घेत असताना त्याविषयी निर्माण करण्यात आलेले अपसमजही आपण समजून घेतले पाहिजे. मागच्या लेखात बाल्यावस्थेतच भविष्यात कोणती वृत्ती म्हणजे उपजीविकेच्या साधनाची निवड करण्याचा प्रघात होता हे आपण पाहिलं. त्यामुळे ब्राह्मण वर्णाचा स्वीकार करण्याची इच्छा असलेल्या बालकाची पाठवणी वयाच्या आठव्या वर्षीच गुरुगृही करण्यात येई. तर, क्षत्रिय वृत्ती स्वीकारणार असलेल्या बालकाचा व्रतबंध बाराव्या वर्षी आणि वैश्य वृत्तीचा अवलंब करणाऱ्यास सोळाव्या वर्षी सांगितलेला आहे. यात वर्णानुसार भेद करण्यात आलेला आहे.

शूद्र वर्णाची वृत्ती जोपासण्याची इच्छा असलेल्या बालकाला तर व्रतबंध सांगितलेलाच नाही, असाही समज जाणीवपूर्वक करून देण्यात आला आहे. त्यामुळे भारतीय समाजव्यवस्थेत कमालीचे भेदाभेद होते, असा अपप्रचार करण्यात आला. यातला एक बिंदू लक्षात घ्यायला हवा की, क्षत्रिय वर्ण ज्याला स्वीकारायचा आहे, त्याची शारीरिक जडणघडण भक्कम व्हावी यासाठी द्यावा लागणारा वेळ लक्षात घेऊनच अशांचा व्रतबंध बाराव्या वर्षी करण्याचं सांगण्यात आलं आहे तर वैश्यवृत्तीचा स्वीकार करणाऱ्यानं उद्योग धंदा व्यापार उदीमाचं प्रशिक्षण घरीच घेऊन नंतर विशेष विषयांचा अभ्यास करण्यासाठी गुरुकुलात जाणं अपेक्षित आहे. ही त्या काळाच्या चौकटीत योग्य बसणारी शिक्षण व्यवस्था होती. या प्रथेला समजावून घेण्यासाठी आजच्या काळातले संदर्भ दिले तर? जसं एखाद्या व्यक्तीला अभियंता म्हणजे इंजिनीअर व्हायचं असेल तर त्याला एका विशिष्ट वयानंतर एक ठरावीक प्रवेश परीक्षा द्यावी लागते. तिच्यात उत्तम गुण मिळवावे लागतात. तरच हवं ते महाविद्यालय किंवा संस्थानात प्रवेश मिळतो.

डॉक्टर व्हायचं असेल तर वेगळी प्रवेश परीक्षा देऊन उत्तीर्ण व्हावं लागतं. जिला चार्टर्ड अकाऊन्ट किंवा वकील व्हायचं असेल ती व्यक्ती या दोन्हीही परीक्षा देणार नाही आणि ज्या व्यक्तीला घराचं रंगकाम करण्याची उपजीविका करायची असेल ती तर या सगळ्या भानगडीत न पडता सरळ एखाद्या रंगाऱ्याच्या हाताखाली कामाला सुरुवात करून ते कौशल्य आत्मसात करेल. हा सगळा स्वखुशीचा मामला आहे. पूर्वी ज्या काळात सगळ्या वस्तू हातानं बनवल्या जायच्या त्यावेळी त्या बनवणाऱ्या व्यक्ती अगदी लहानपणापासूनच त्यात कौशल्य मिळविण्याचे प्रयत्न करू लागत. वंशपरंपरागत व्यवसायात अनेक पिढ्या याच कौशल्यप्रधान उद्योगात असल्यामुळे त्या बालकाला हे प्रशिक्षण घरातले ज्येष्ठ अनुभवी लोकच द्यायचे. त्यामुळे विद्यारंभ हा संस्कार झाल्यानंतर त्याला घरीच सगळ्या सोयी उपलब्ध असत. म्हणजे विणकराच्या घरी सूतावर प्रक्रिया करण्यापासून तर हातमागावर कापड विणण्यासाठीची पूर्वतयारी करणं आणि प्रत्यक्ष कापड विणणं हे सगळं घरीच होत असल्यामुळे त्या व्यक्तीला वेगळ्यानं कुठे जाण्याची आवश्यकताच नसे. अर्थात हे सारं शिकायचं तर त्यासाठीदेखील छुरिका बंधनाचा विधी करण्यास सांगितलं आहे. हा विधी क्षत्रिय आणि शूद्र दोन्ही वर्णांनी करायचा असून यात बटूच्या कमरेला आत्म आणि समाज संरक्षणासाठी एक लहान सुरी किंवा कट्यार बांधण्यात येते.

काळाच्या ओघात इस्लामी आक्रमणं आणि नंतरची ब्रिटिश राजवटीत हा विधी कुठेतरी गहाळ झाला हे नक्की. कारण पुण्यश्लोक शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या विधींची सुरुवातच उपनयन आणि छुरिकाबंधन या संस्कारांनी केली होती, असा ऐतिहासिक संदर्भ आहे. कमलाकरभट्ट कोंडदेव (दादोजी कोंडदेवांचे सख्खे भाऊ) लिखित 'शूद्र कमलाकर' नावाच्या ग्रंथात क्षत्रिय आणि शूद्र बटूंसाठी करण्याचा छुरिकाबंधन हा विधी दिलेला आहे. जिज्ञासूंनी तो अवश्य अभ्यासावा. व्रतबंधानंतर बटूला काही नियम काटेकोरपणे पाळावे लागतात. त्यातले मुख्य नियम म्हणजे भूमीवर झोपणे, सूर्योदयापूर्वी उठणे, गुरुगृहातली दैनंदिन कामं न कंटाळता करणे, अभ्यास करण्यात कुचराई न करणे. आरश्यात न बघणे, कौपिन- धोतर- उपरणं ही तीनच वस्त्रं अंगावर घालणे. कोणतेही सौंदर्यप्रसाधन न वापरणे. स्त्रियांच्या आसपासही न वावरणे, पैसे कमावण्यासाठी कोणताही उद्योग न करणे. भिक्षा मागूनच खाणे, उष्टं न खाणे, सात्त्विक भोजन करणे इत्यादी. हे ब्रह्मचर्याचं व्रत शिक्षण पूर्ण होईपर्यंत पाळायचं असतं. किमान बारा वर्षं किंवा गुरूंचं समाधान होईपर्यंत विद्यार्थी गुरुगृहीच राहतो. एकदा का शिक्षण पूर्ण झालं की, गुरूंच्या आज्ञेनंतर एका शुभमुहूर्तावर त्याचा समावर्तन विधी करण्यात येतो. 'समावर्तन' (समब + आ + वृत्) (पान ६ वर)

# ‘जीवन’रेखा कोरडी पडण्याच्या मार्गावर

पर्यावरण

मिलिंद बेंडाळे

**आशियातील पाण्याची जीवनरेखा म्हणून ओळखला जाणारा हिमालय पर्वत हळूहळू कोरडा पडत आहे. एका नवीन उपग्रह- आधारित अभ्यासात भारतीय पर्वतीय प्रदेशातील भूजल दरवर्षी अब्जावधी टन दराने कमी होत आहे, असे म्हटले आहे. म्हणजेच हिमालयाच्या भूजलाच्यासाठ्यात वेगाने घट होत आहे. या संकटामुळे लाखो लोकांच्या शेती, पिण्याचे पाणी आणि पर्यावरणीय सुरक्षेला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो.**



एका अभ्यासानुसार संपूर्ण हिमालय प्रदेशात दरवर्षी सुमारे २४.२ अब्ज टन दराने भूजल कमी होत आहे. येत्या काही वर्षांमध्ये भारतासह दक्षिण आणि मध्य आशियातील अनेक देशांसाठी ही घट एक मोठा धोका ठरू शकते. हवामान बदलामुळे भूजल तापमान वाढत आहे. या शतकाच्या अखेरीस ते ३.५ अंश सेल्सिअसने वाढण्याची अपेक्षा आहे. हा अभ्यास ‘चायनीज अ‍ॅकेडमी ऑफ सायन्सेस’च्या ‘एरोस्पेस इन्फॉर्मेशन रिसर्च इन्स्टिट्यूट’चे प्राध्यापक वांग शुडोंग यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला. हे निकाल ‘एन्व्हायर्नमेंटल रिसर्च लेटर्स’ या प्रतिष्ठित जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहेत.

‘एआय’ने तयार केलेला दोन दशकांचा भूजल रेकॉर्ड पर्वतीय भागात भूजल मूल्यांकन करणे नेहमीच कडीण राहिले आहे. या आव्हानावर मात करण्यासाठी शास्त्रज्ञांनी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित एक नवीन मॉडेल विकसित केले आहे. अनेक स्रोतांकडून उपग्रह डेटा, पृत्त्वी प्रणाली मॉडेलिंग एकत्रित करून, शास्त्रज्ञांनी गेल्या २० वर्षांमध्ये (२००३-२०२०) भूजल पातळीतील बदलांचे विश्लेषण केले आहे. हे मॉडेल केवळ भूजल घटण्याचे प्रमाण उघड करीत नाही, तर त्यामागील कारणेदेखील स्पष्ट करते. हिमालयाच्या दोन तृतीयांश भागात भूजल पातळीत घट झाली आहे. अभ्यासात आढळून आले की, आशियातील जवळजवळ दोन तृतीयांश उंच पर्वतीय प्रदेशांमध्ये भूजल पातळीमध्ये सातत्याने घट होत आहे. दाट लोकसंख्या आणि जास्त सिंचनाचा दबाव असलेल्या सखल भागात सर्वात जास्त घट नोंदविली गेली. यामध्ये गंगा-ब्रह्मपुत्र खोरे, सिंधू खोरे आणि अमु दर्या खोरे यासारख्या क्षेत्रांचा समावेश आहे. बदलत्या पावसाळ्याच्या पद्धतींमुळे आशियातील हिमनद्या वेगाने वितळत आहेत.

दरवर्षी २२ गीगाटन बर्फ कमी होत आहे. उलट, काही उंचावरील अंतर्गत प्रदेशांमध्ये भूजलाच्या पातळीत थोडी सुधारणा दिसून आली आहे. भूजल घटण्याला हवामान जबाबदार आहे; परंतु मानवी शोषण हा एक प्रमुख घटक आहे. शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की, भूजलाच्या पातळीत सुमारे अर्ध्या बदलांमध्ये हवामान घटकांचा वाटा आहे. हिमनद्या आणि बर्फाचे डोंगर यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. वाढत्या तापमानासह, हिमनद्या वेगाने वितळत आहेत; पण सर्वात मोठी चिंता अशी आहे की, मानवी क्रियाकलाप, विशेषतः सिंचनासाठी जास्त पाणी उपसा, भूजलाचे संकट सतत वाढवत आहेत. चिंताजनक बाब म्हणजे २०१० पासून ही प्रवृत्ती वेगवान झाली आहे. भविष्य आणखी भयानक असू शकते. अभ्यासानुसार, सध्याच्या पाणीवापराच्या सवयी आणि धोरणे बदलली नाहीत तर भूजलात घट होत राहील. २०६० च्या सुमारास काही भागात भूजलाची घट तात्पुरती कमी होऊ शकते; परंतु ही मदत कायमस्वरूपी राहणार नाही. जागतिक तापमानवाढीमुळे ‘डे झिरो’चा धोका वाढतो. पुढील १५ वर्षांमध्ये ३५ क्षेत्रे प्रभावित होतील. यानंतर भूजलाची पातळी आणखी कमी होऊ शकते. त्यामुळे खालच्या प्रदेशातील कृषी क्षेत्रांना मोठा धोका निर्माण होऊ शकतो. या अभ्यासाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे शास्त्रज्ञांनी एक नवीन आणि प्रगत फ्रेमवर्क विकसित केले आहे. ते ‘मल्टी-सेन्सर सॅटेलाईट डेटा’, ‘हायड्रोलॉजी’ आणि ट्रान्सफॉर्मर-आधारित ‘एआय मॉडेल्स’ना स्पष्टीकरणात्मक ‘मशीन लर्निंग’सह एकत्रित करते. यामुळे पर्वतीय आणि दुर्गम भागात भूजलातील बदलांचे अधिक विश्वासार्ह मूल्यांकन शक्य झाले आहे; संशोधकांनी प्रत्यक्ष मोजमाप आणि हजारो भूजलाच्या विहिरींमधील स्वतंत्र डेटा वापरून त्यांचे निष्कर्ष प्रमाणित केले आहेत. त्यामुळे अभ्यासाची विश्वासार्हता आणखी मजबूत झाली आहे. या अभ्यासातून स्पष्ट होते की, हिमालयीन प्रदेशात भूजलाची पातळी वेगाने कमी होत आहे. २०२३ हे नद्यांसाठी कोरडे वर्ष होते.

भारतासह जगभरातील जवळजवळ सर्व नद्यांमधील पाण्याची पातळी कमी होत होती. अशा परिस्थितीत सिंचन पद्धती आणि सध्याच्या पाणी व्यवस्थापन धोरणांमध्ये वेळेत सुधारणा न केल्यास येत्या दशकांमध्ये भूजलाचे संकट केवळ शेतीपुरते मर्यादित राहणार नाही तर लाखो लोकांची अन्न सुरक्षा, पाण्याची उपलब्धता आणि पर्यावरणीय संतुलनालाही गंभीर धोका निर्माण करू शकते. भारत हा जगातील भूजलाचा सर्वात मोठा वापरकर्ता आहे. भूजल हे शेती, पिण्याचे पाणी, उद्योग आणि नैसर्गिक परिसंस्थांसाठी जीवनदायी संसाधन आहे. येथे भूजलाच्या ऱ्हासाचा परिणाम ज्ञात असला, तरी त्याचा परिसंस्थेच्या कार्बन साठवण क्षमतेवर आणि जलचक्रावर होणारा परिणाम आतापर्यंत पूर्णपणे समजला नव्हता. बहुतेक अभ्यास काही प्रदेशांपुरते मर्यादित होते. त्यामुळे संपूर्ण देशाला व्यापणारी माहिती उपलब्ध नव्हती.

‘इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स’ (आयआयएससी) च्या अलिकडील संशोधनातून दिसून आले आहे की, भूजलाची पातळी वनस्पतींच्या कार्बन साठवण्याच्या क्षमतेवर थेट परिणाम करते. या संशोधनात वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये भूजलाची पातळी आणि परिसंस्थेच्या कार्बन साठवण क्षमतेतील संबंधांचा अभ्यास करण्यासाठी उपग्रह प्रतिमा, विद्यमान डेटा आणि सांख्यिकीय मॉडेल्सचा वापर करण्यात आला. हा अभ्यास ‘इकोलॉजिकल इन्फॉर्मेटिक्स जर्नल’मध्ये प्रकाशित झाला. या अभ्यासानुसार, संशोधकांनी भारतातील विविध प्रदेशांमध्ये पाण्याच्या पातळीचे मोजमाप केले. ते जमिनीच्या पृष्ठभागापासून भूजलापर्यंतचे अंतर दर्शविते. त्यांनी वनस्पतींची उत्पादकता मोजण्यासाठी सकल प्राथमिक उत्पादकता (जीपीपी) आणि एकूण प्राथमिक उत्पादकते (एनपीपी) चेही मूल्यांकन केले. त्यांनी बाष्पोत्सर्जनाचाही अभ्यास केला. तो वनस्पतींनी वातावरणात सोडलेल्या पाण्याचे प्रमाण दर्शवतो. अभ्यासात दोन महत्त्वाचे निर्देशक मूल्यांकन केले गेले. त्यातील एक म्हणजे कार्बन वापर कार्यक्षमता. वनस्पती शोषलेल्या कार्बनचे वाढीमध्ये किती कार्यक्षमतेने रूपांतर करतात, ते कार्बन वापर कार्यक्षमता दर्शविते.

दुसरे म्हणजे पाण्याची वापर कार्यक्षमता. वनस्पती प्रत्येक युनिट पाण्यात किती कार्बन साठवू शकतात, हे ते दर्शवते. भूजलाच्या गळतीमुळे हरितगृह वायूंचे प्रमाण वाढत आहे. वनस्पतींच्या वाढीसाठी पाणी आणि कार्बन या दोन्हीची आवश्यकता असते. संशोधनानुसार, विशेषतः नैसर्गिक जंगले आणि गवताळ प्रदेशात पाण्याची कमतरता असते, तेव्हा वनस्पतींना जलसंवर्धन आणि वाढ यापैकी एक निवडण्यास भाग पाडले जाते. त्यामुळे भूजलातील घट वनस्पतींची वाढ आणि कार्बन साठवण क्षमता कमी करते. अभ्यासात असेही आढळून आले की, भारतातील बहुतेक भागांमध्ये खोल भूजल पातळी वनस्पतींची उत्पादकता आणि कार्बन साठवण क्षमता कमी करते. वनस्पतींना खोल भूगर्भातून पाणी खेचावे लागते, तेव्हा त्यांची वाढ मंदावते आणि ते कमी कार्बन साठविण्यास सक्षम असतात. पावसाळ्यात जास्त पाऊस पडणाऱ्या भागात हा पॅटर्न वेगळा असतो. अशा भागात भूजल पातळी खूप उथळ असते आणि मुसळधार पावसामुळे जमिनीत पाणी साचते. यामुळे मुळांना पुरेसा ऑक्सिजन मिळत नाही आणि उत्पादकता कमी होते. सिंचनाखालील शेती असलेल्या भागातही हे दिसून येते. म्हणजेच खूप कमी किंवा खूप जास्त भूजल वनस्पतींची वाढ आणि कार्बन साठवण क्षमता मर्यादित करू शकतात.



## स्वागत नववर्षाचे

नववर्ष आले, गुढी ही उभारू
ध्वज भगवा त्या, सवे उभारू
स्वागत चैत्र प्रतिपदेचे करूया
प्रभू श्रीरामाला, वंदन करूया...
सडा सं ार्जन, अंगणी करूनी
बांधुनी तोरण, नक्षी रेखुनी
भाळी कुंकुम, तिलक लावुनी
गुढीस वंदन, हिंदू म्हणोनी...
उद्घोष कृण्वन्तो विश्वमार्य्
संस्कार वसुधैव कुटुम्बकम्
संस्कृति अमुची एक चिरंतन
चिंतन अमुचे अलख निरंजन...
कडुलिंबाची सोबत करते
गाठी गोड जी, सहज मिसळते
नाती जपू या, अशीच नकळत
जशी साखर, दुधात मिसळत...
नैवेद्य तुजला, श्रीखंड पुरीचा
चटणी स्वाद, कडू कडुलिंबाचा
सेवन दोनही, पदार्थ करूनी
उत्तम स्वास्थ्य, कायम ठेवुनी...
म्हणूनी आज, संकल्प करूनी
हिंदु हिताचे, वर्तन करूनी
संस्कृतीचे या, रक्षण करूनी
गुढी उभारू, भान ठेवूनी...

**शैलेश चौथाईवाले**

## गुढीपाडवा

मुहूर्त मंगल घरोघरी गोडवा
स्वागत करण्या आला गुढीपाडवा
आनंदाचा सण दाराला तोरण
निरोगी राहण्याचे आखा धोरण
चैत्र प्रतिप्रदा वर्ष शुभारंभ
तेजो य पहाटेने व्हावा प्रारंभ
गुढी सांगते व्हा भव्यदिव्य
निष्ठेने करा उज्ज्वल भवितव्य
साडेतीन मुहूर्तातील अनमोल घडी
कर्तृत्वातून व्हावी समृद्ध पिढी
गुढी उभारून करू संकल्प नवा
नको मनी कुणाचा हेवादेवा
गुढीपाडवा मांगल्याचे प्रतीक
नात्यामध्ये येवो विनयता अधिक
काम करा असे वाटेल हेवा
संस्कृती देते नित्य सण नवा

**रा. कों. खेडकर**

## गुढी

इंग्रजांच्या नववर्षाचे लाड प्यार बहु झाले
भारतीयांनो डोळे उघडा अपुले नववर्ष आले
इंग्रजांचे पाय चाटणे विसरा त्यांची वाहवा
गुलामगिरीचे बंध झुगारून अपुली संस्कृती जागवा
चुलीत घाला आता तुम्ही ब्रिटिशांच्या नंग्या रूढी
संयम, निष्ठा, सात्त्विकतेची उभारा आकाशीं गुढी
गुढी आमुची उभी राहते उंचावुनि नभी मान
भारतीयांची उच्च संस्कृती मिरवितसे अभिमान

**रमेश वि. ढाकुलकर**

# गोडवा रामकथांचा

कोणे एके काळी

स्वाती काळे (कोलारकर)



श्रीरामांचा राज्याभिषेक झाला. अयोध्येचा राज्य कारभार ते चालवू लागले. एके दिवशी प्रातःकाळी श्रीराम त्यांच्या सिंहासनावर बसले असता अचानक त्यांची अंगठी घरंगळत पाताळलोकात गेली. हनुमान ती अंगठी शोधायला पाताळलोकात गेला. तेवढ्यात इकडे भूलोकी श्रीरामांना भेटायला वसिष्ठ ऋषी आले. त्यांना अत्यंत महत्त्वाचे बोलायचे असल्यामुळे श्रीरामांनी द्वारावर लक्ष्मणाला पहारा करण्यास सांगितले. वसिष्ठ ऋषींनी श्रीरामांना सांगितले, “आता देवलोकी जाण्याची वेळ आलेली आहे. भूलोकावरील आपला अवतार लवकरच संपुष्टात आणा.” त्याच दरम्यान विश्वामित्रही श्रीरामांना भेटायला आले. लक्ष्मणाने त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला, पण तो त्यांना अडवू शकला नाही.

श्रीरामांची आज्ञा न पाळता आल्यामुळे लक्ष्मण दुःखाने विव्हळ झाला आणि “मला काही प्रायश्चित्त द्या.” असे श्रीरामांना म्हणू लागला. श्रीराम म्हणाले, “जेव्हा विश्वामित्र माझ्या दालनात आले तेव्हा माझे व वसिष्ठ ऋषींचे बोलणे झाले होते. मग तुला सजा का द्यायला पाहिजे?” पण लक्ष्मणाने अजिबात ऐकले नाही आणि शरयू नदीच्या काठी जाऊन तिथेच तो लुप्त झाला. लक्ष्मण म्हणजे शेषाशायी अनंतच तो! त्याच्या पाठोपाठ श्रीरामही अनंताच्या प्रवासाला निघाले. देवलोकी विसावले. इकडे पाताळलोकीचा राजा हनुमानाला विचारित होता, “कोण आहेस तू?” “मी हनुमान. श्रीरामांचा सेवक.” राजाने त्याच्यासमोर हजारो अंगठ्यांनी खचाखच भरलेली एक थाळी ठेवली. सगळ्या अंगठ्या हुबेहूब सारख्याच दिसत होत्या. यातली श्रीरामांची कोणती ओळखायची? तेव्हा पाताळलोकीचा राजा म्हणाला, “येथे जेवढ्या अंगठ्या दिसत आहेत तेवढ्या सगळ्या श्रीरामांच्या आहेत. जेव्हा तू भूलोकी परत जाशील तेव्हा तुला तिथे श्रीराम दिसणार नाहीत. कारण जेव्हा रामावतार संपतो तेव्हा त्याची अंगठी अशीच घरंगळत खाली येते. मी या सर्व अंगठ्या जपून ठेवल्या आहेत.” हे बोलणं ऐकून हनुमान क्षणभर स्तब्ध झाला आणि भूलोकी परत गेला. असे म्हणतात, काळाच्या आवर्तनात प्रत्येक युगात राम जन्माला येतो. प्रत्येक युगात रामायण घडते. चांगल्या आणि वाईटाचा संघर्ष म्हणजेच रामायण. चांगल्या आणि वाईटाच्या युद्धात नेहमीच श्रीरामांचा विजय होतो. कारण श्रीराम कायम सत्याच्या बाजूने आहेत. न्यायाच्या बाजूने आहेत. श्रीराम आपल्या संस्कृतीत युगानुयुगे रुजले आहेत आणि देशाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात आपल्या संस्कृतीचे वारकरी प्राचीन काळापासून ही रामकथा गात फिरत आहेत.

रामनामाच्या भक्तिरसात चिंब भिजत आहेत. वाल्मीकिंचे रामायण प्राचीन वडाचा डेरेदार वृक्ष आहे. त्याच्या पारंब्या प्रत्येक प्रांतामध्ये, प्रत्येक भाषेमध्ये, प्रत्येक बोलीमध्ये आपल्या संस्कृतीत घट्ट रुजल्या आहेत. या सर्व रामकथांमध्ये भाषा वेगळ्या आहेत, प्रांत वेगळे आहेत, कथा वेगळ्या आहेत; पण प्रत्येक रामकथेच्या आत्म्यात रामाचाच वास आहे. दक्षिणेकडील कंब रामायण वाल्मीकि रामायणाप्रमाणेच प्राचीन आहे. दोन्ही रामकथांमध्ये थोडाफार फरक आहेच.

अहिल्येच्या गोष्टीत वाल्मीकि रामायणात अहिल्येला इंद्राबद्दल तारुण्यसुलभ जिज्ञासा होती. जे घडलं ते अगदी सहज घडले. पण दक्षिणेतील कंब रामायणात अहिल्येला जाणीव असते की, आपण चुकीचे वर्तन करीत आहोत. पण ती तिचा तारुण्यसुलभ मोह आवरू शकली नाही. सीताहरणाच्या प्रसंगात कंब रामायणात रावण सीतेला स्पर्श करण्यास घाबरत असतो आणि त्यामुळे पृथ्वीला खणून तो तिला भुयारातून लंकेला घेऊन जातो. संस्कृत वाङ्मयालाही रामनामाची गोडी आहे. ‘रघुवंश’ वाल्मीकि रामायणावरच आधारित आहे. ‘भवभूती’ या संस्कृतमधील श्रेष्ठ नाटककाराच्या लेखणीचा गाभा श्रीराम आहेत. रामाने परशुरामाच्या धनुष्याचा भंग केला. त्यामुळे परशुराम प्रसन्न होऊन त्याला म्हणतात, “रामा, तू मनाने थोर तसाच रूपानेही थोर आहे. रमणीय गुणांचा तू मला सर्वस्वी हृदयंगम झाला आहेस.” असे वाटते, प्रत्यक्ष भवभूतीच परशुरामाच्या मुखातून रामस्तुती करीत आहेत. परंतु रामाचे गुणगान फक्त संस्कृतमध्येच नाही तर प्रत्येक भाषेतील कथांमधून झाले आहे. संस्कृतप्रमाणेच हिंदीत अतिशय प्रगल्भ अशी रामकथा परंपरा आहे. स्वामी रामानंद यांनी सगुण-निर्गुण अशा दोन्ही रूपात उत्तर प्रदेशात रामकथेचा प्रचार केला. विष्णुदास, ईश्वरदास, तुलसीदास, केशवदास, सेनापती, माधवदास चारण अशा अनेक संतमहात्म्यांनी रामसुमिरन अखंड केले. कर्नाटकात नागचंद्र उर्फ अभिनवपंप यांनी ११ व्या शतकात रामचंद्रपुराण किंवा पंपरामायण लिहिले. आंध्र प्रदेशाच्या रामकथांना त्या प्रांतातील मातीचा गंध आहे. रंगनाथांच्या द्विपद रामायणात सीतेच्या संरक्षणासाठी लक्ष्मणाने झोपडीच्या चारही दिशांना सात रेघा काढल्या होत्या. असे बरेच बारीक फरक प्रत्येक प्रादेशिक रामायणात आहेत. प्रत्येक रामकथा त्या त्या मातीचा सुगंध, प्रादेशिक भाषांचा बाज ल्येऊन स्वाभाविकरीत्या प्रकट झाली आहे. पण रामकथेतील भक्तिरसाचा स्रोत मात्र सर्वठायी तोच आहे. गुजरातमध्ये गिरिधरांना गुजरातचे तुलसीदास म्हणतात. गुजराती लोक गोड गळ्याने त्यांचे रामायण गातात. आसाममध्ये माधवकंदली यांना आसामचे तुलसीदास म्हटले जाते आणि बंगाल प्रांतात कृत्तिवासांच्या रामकथेला वाल्मीकि रामायणाचा दर्जा आहे. ओडिशातील बलरामदासांचे ‘दांडी रामायण’ फार लोकप्रिय आहे. सिद्धेश्वर यांच्या ‘विलंका रामायण’मध्ये पुरुषांपेक्षा स्त्री श्रेष्ठ दाखवली आहे.

अद्भुत रामायणातदेखील राम लढत नाही. स्वतः सीता रामाशी युद्ध करते. जैन रामायणात म्हटले आहे की, श्रीरामाचा हा शेवटचा मानव जन्म आहे. तो अहिंसा धर्म पाळणारा दिव्यात्मा आहे. त्यामुळे शेवटी लक्ष्मण रावणाचा वध करतो. आदिवासींमध्ये प्रसंगानुरूप रामकथा सांगितल्या जातात. मध्यभारतातील कोल जमात शबरीचे वंशज आहेत. त्यांच्या रामकथेत लक्ष्मणाने उष्टी बोरे खायला नकार दिला होता. एकदा एका बाणाने लक्ष्मण जखमी झाला होता, पण त्याची जखम काही केल्या भरून येईना. जेव्हा लक्ष्मणाने शबरीची उष्टी बोरे खाल्ली तेव्हा कुठे त्याची जखम भरली. तेव्हा रामाने वर दिला की तिच्या वंशजांना कधीही अन्नधान्याची कमतरता भासणार नाही. शबरीबद्दल अनेक कथा प्रचलित आहेत. एका कथेनुसार शबरीचा जन्म एका समृद्ध परिवारात झाला होता. पण तिथे तिला परमेश्वराची भक्ती करायला वेळ मिळेना. तेव्हा तिने प्रार्थना केली की, ‘पुढचा जन्म तरी सामान्य कुळात मिळू दे. म्हणजे मला रामभक्तीतच लीन राहता येईल.’ त्यानंतर ती भिल्लांच्या कुळात जन्माला आली. तिच्या विवाहाच्या वेळी अनेक प्राण्यांचे बळी देण्याचे ठरले. तिने गुपचूप त्या प्राण्यांना मुक्त केले आणि लग्न न करता पंपा सरोवराजवळ एका झोपडीत राहू लागती. तेथेच प्रभू रामचंद्र आले. पुढे घडलेली उष्ट्या बोरांची गोष्ट तर सगळ्यांनाच माहिती आहे. शबरी आणि अहिल्येच्या गोष्टीत बरीचशी साम्य स्थळे दिसतात. शबरी एका ऋषींबरोबर आश्रमात राहत होती. जेव्हा ते ऋषी साधना करून आश्रमात परतले तेव्हा त्यांना कळले की, शबरीला परपुरुषाचा मोह होऊन एक मुलगा झाला आहे. त्यांनी शबरीचा त्याग केला. ती रडू लागली. त्यामुळे त्या ऋषींनी तिला उःशाप दिला की तिला रघुकुलाची सेवा करण्याची संधी मिळेल. बिरहौर या झारखंड येथील जमातीमध्ये रामकथा रंगवून सांगितली जाते. या रामकथेत दशरथाला सात राण्या होत्या. या बिरहौरी कथांमध्ये सीता नाजूक बाहुलीसारखी वावरत नाही. एकदा ती जनकाच्या घरी अंगण झाडीत होती. तेव्हा तिने पलंगाखाली ठेवलेले शिवधनुष्य सहज बाजूला केले आणि पदर खोचून पुन्हा झाडू लागली. लक्ष्मण सीतेच्या सांगण्यावरून रामाची मदत करायला गेला. पण त्याआधी तो सीतेला मोहरीचे दाणे देऊन गेला आणि याच मोहरीच्या दाण्यांनी तिने रावणाला भस्म केले. बोराच्या झाडाने आपल्या काट्यांमध्ये सीतेची कर्णकुंडले खोचून ठेवली होती. त्यामुळे रामाने बोराच्या झाडाला चिरंजीव होण्याचा वर दिला. खारुताईने रामाला मदत केल्यामुळे त्याने प्रेमाने तिच्या पाठीवरून हात फिरवला. अशा अनेक सुंदर गोष्टी बिरहौर रामकथांमध्ये आहेत.

आकलन

तेजस परब

# ‘एआय’वरील अतिनिर्भरता घातकच!






**‘एआय’ तुमचा डॉक्टर, मानसोपचारतज्ज्ञ, वकील किंवा डायरी नाही! ‘चॅट जीपीटी’चे सीईओ सॅम अल्टमन यांनी काही दिवसांपूर्वी केलेले वक्तव्य वरवर पाहता सल्ला देणारे असले, तरीही ‘एआय’वर असणारे लोकांचे अति अवलंबित्व हा सर्वार्थाने पुढील काळात चिंतेचा विषय असणार आहे. त्याबद्दलचे हे आकलन.**


‘चॅट जीपीटी’ किंवा तत्सम सुविधा देणाऱ्या ‘एआय’ टूल्सचा वापर हा, गोपनीयतेच्या अधिकारात येत नाही. अर्थात डॉटर, मानसोपचारतज्ज्ञ आपल्या रुग्णांबद्दलची माहितीही गोपनीयतेच्या (attorney client privilege) अंतर्गत येत नाहीत. अशी माहिती न्यायालये किंवा कायदेशीर स्थळी रुग्णाच्या इच्छेविरोधात वापरण्यास मनाई असते मात्र, ‘एआय’शी संवाद साधताना साठवणूक झालेली माहिती ही या अधिकारांतर्गत येत नाही. त्यामुळे युझर्सच्या गोपनीयतेचा भंग होऊ शकतो.

अनेकांना ‘एआय’ आता आपला खासगी आयुष्यातील मित्र वाटू लागला आहे, याबद्दल समाजमाध्यमांवरही चर्चा होते. मात्र, जागरूकता निर्माण होण्यासाठी नाही, तर खासगी संवाद आणि आयुष्यातील अडचणी विचारण्यासाठी चॅटबॉटचा वापर अधिक होत आहे. यामुळे मानसिक स्वास्थही बिघडण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली. विभक्त होत चाललेली कुटुंबपद्धती, वाढता एकाकीपणा, नोकरी किंवा शिक्षणानिमित्त शहरांमध्ये राहताना एकटे झालेली सवय यातूनच सुरू झालेल्या या गोष्टी आहेत.

अगदी साधा ई-मेल करण्यापासून असो वा एखाद्या ऑफिसमध्ये बैठकीत सादरीकरणाचा विषय असो, हल्ली सर्हास ‘चॅटबॉट एआय’चा आधार घेण्याकडे सर्वसामान्यांचा कल असतो. त्याशिवाय ‘एआय’ कंपन्या सोशल मीडिया इन्फ्लूएन्सर्सना त्यांच्या टूलचे प्रमोशन करण्यासाठी आशयनिर्मितीही करतात. त्यामुळे याबद्दल स्वतः कंपनी सीईओ यांनाच भूमिका मांडावी लागली.

‘एआय’ आणि ‘चॅटबॉट’चा वापर हा मानवाच्या कल्पनाशक्तीवरचा आघात करणारा नाही ना? याचाही विचार करावा लागेल. नव्याने येणाऱ्या ‘एआय टूल्स’ आणि ‘चॅटबॉट्स’साठी, भारत हा लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून एक प्रकारे मोठी बाजारपेठच आहे.

अमेरिका आणि पाश्चात्य देश भारताकडे बाजारपेठ म्हणूनच पाहतात. ज्याप्रकारे अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या महत्त्वाकांक्षी आयातशुल्क प्रकरणाची चर्चा सध्या जशी जगभर आहे, तशीच भारतीय बाजारपेठ गमावण्याची चर्चाही अमेरिकेतच आहे.



अमेरिकन कंपन्यांवर बहिष्कार वगैरे टाकण्याच्या मोहिमा तीव्र झालेल्या नाहीत, उलट त्यावरून सरकारकडे बोटे दाखवण्याचे काम सुरू आहे. धोरणात्मकरित्या जी भूमिका असेल ती सरकार घेईलच पण, आपणही या गोष्टींवर कोणत्या प्रकारे अवलंबून राहायचे, याबद्दलही मर्यादाही हवीच. अर्थात अशा अवलंबित्वाबाबतच्या गोष्टी एकाएकी होणार नाहीत पण, त्याबद्दलचे सूक्ष्मनियोजन तर सुरू नाही ना याचा कानोसा घेण्याची वेळ आली आहे. काही दिवसांपूर्वी ‘मायक्रोसॉफ्ट’च्या तांत्रिक बिघाडामुळे, अचानक जगभरातील विमानांच्या उड्डाणांसहित, रस्ते आणि इतर वाहतुकीवरही परिणाम झाल्याची बातमी आली होती. आजही ‘ट्विटर’, ‘मेटा’, व्हॉट्सॲपच्या सेवा काही काळासाठी ठप्प झाल्यानंतर जसा गोंधळ उडतो त्यावरून लक्षात येईल की, या सर्व टूल्सवर असलेले अवलंबित्व किती आहे.

चीनसारख्या या देशाला लक्षात आलेल्या या धोयामुळे, अमेरिकेच्या प्रत्येक टूल्स आणि सॉफ्टवेअर कंपन्यांवर त्यांनी बंदीच घातली. अर्थात त्यांनी स्वतःच्या यंत्रणाही उभ्या केल्या. त्यामुळे डेटा हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिलेला नाही. ‘चॅटबॉट’मध्येही चीनने स्वतःचे ‘डीप-सीक’ तंत्रज्ञान उभे करून, जगभरातील ‘एआय’ क्षेत्राला धक्का दिला होता. ‘एआय चॅटबॉट’वर अवलंबून असणाऱ्यांच्या डोळ्यात अंजन म्हणून, सीए श्रेया जयस्वाल यांनी एक लिंकडीन पोस्ट लिहिली होती. ज्यात त्यांनी ‘चॅटबॉट तुम्हाला तुरुंगात पोहोचवू शकतं,’ असे शीर्षकही दिले होते. कारण, सॅम अल्टमनच्या वायाचा उल्लेख करत त्यांनी पुन्हा सांगितले की, जे ‘चॅट-जीपीटी’मध्ये लिहिलेले आहे, त्याचा पुरावा म्हणून न्यायालयात त्याचा वापर होऊ शकतो.

अर्थात न्यायालयाने तशी परवानगी दिली किंवा तो पुरावा म्हणून सादर झाला, तर त्या व्यक्तीला तुरुंगवास होऊ शकतो. तो कसा? तर समजा एखाद्या युझरने जर मस्करीत जरी त्यावर लिहिले की, मी माझ्या पतीला किंवा पत्नीला धोका दिला आहे, मला आता पश्चाताप होतो आहे मी काय करू? यावर चॅटबॉट हवे ते उत्तर देईल. पण, जर का तो पुरावा युझरच्या साथीदाराला सापडला आणि प्रकरण न्यायालयापर्यंत गेले, तर तक्रारदार हा पुरावा म्हणून सादर करू शकतो. पुढे प्रकरण कायदेशीररित्या पोटगी देण्यापर्यंत जाऊ शकते. एखाद्याने जर ‘एआय’ला प्रश्न विचारला की, इनकम टॅक्समध्ये वाचण्यासाठी पळवाटा काय आहेत? तर टॅस ऑडिट किंवा दिवाळखोरी प्रक्रियेतही हा पुरावा म्हणून वापरता येऊ शकतो. एखाद्या कर्मचार्याने कंपनीत कार्यरत असताना, कंपनीच्या ध्येयधोरणांचा उल्लेख करत स्वतःच्याच व्यवसायासाठी काय फायदा होऊ शकतो का? असा प्रश्न विचारला आणि हा पुरावा सापडला, तरीही कंपनीच्या गोपनीयता धोरणांचे उल्लंघन म्हणून कारवाई होऊ शकते, असे जयस्वाल यांनी सांगितले आहे. पुढे त्या म्हणतात, आपण सर्वचजण ‘चॅटजीपीटी’शी बोलताना एकदमच मनमोकळेपणे बोलू लागलो आहोत. इतके की, काहीच अंतर बाळगत नाहीत. जसे ‘चॅट जीपीटी’ एक डायरी, मानसोपचार तज्ज्ञ, मार्गदर्शक किंवा एकदम खास दोस्त असल्यासारखे लोक चॅट करू लागले आहेत. जर तुम्ही न्यायाधीशांसमोर ते वाय बोलू शकणार नसाल, तर अशा गोष्टी त्यात लिहायच्या भानगडीतच पडू नका, असा सबुरीचा सल्लाही त्यांनी दिला आहे.

काही दिवसांपूर्वीच उघडकीस आलेली अनुप कुमार नायर यांची गोष्ट. ५५ वर्षीय नायर यांनी स्वतःला तीन वर्षे घरातच कोंडून घेतले. याक़ाळात जिवंत राहण्यासाठी त्यांनी, केवळ घरपोच अन्न पुरवणार्या ॲपचा आधार घेतला होता. घरातल्यांनी स्वतःचे जीवन संपवल्याने ते चिंताग्रस्त असायचे. त्यांनी बाहेरच्या जगाशी संपूर्ण संबंधच तोडून टाकले होते. जेव्हा त्यांना बाहेर काढण्यात आले, तेव्हा घराची अवस्था विचित्रच होती. ऑनलाईन जगावर अवलंबून राहिल्याचा अतिरेक आणि नैराश्याच्या कारणास्तव त्यांची ही अवस्था झाली. अर्थात आजही आपल्याकडे अशा गोष्टींवर चर्चा होत नाही. मूळात पुरुषांमध्ये तर नाहीच नाही. या गोष्टींची शिकार तरुणाई सहज होते. मोबाईलचा अतिवापर, जंकफूडचे अतिसेवन, धुम्रपानाचा अतिरेक जितका गंभीर तितकाच गंभीर ‘एआय’वरच्या अवलंबित्वाचाही आहे. अर्थात, ‘सर्वच काही वाईट’ अशातलाही भाग नाही. समाजमाध्यमांवर तयार केला जाणारा सृजनशील मजकूरही तितकाच आवर्जून शेअर करावा, असाच आहे. अर्थात ज्याप्रमाणे इंटरनेट, संगणक, मोबाईल दुधारी शस्त्र मानले जायचे, त्याचप्रकारे ‘एआय’चेसुद्धाही आहे. वापरणारा त्याचा वापर कशाप्रकारे करतो, यावरही बऱ्याच गोष्टी अवलंबून आहेत. त्यामुळे ‘एआय’पेक्षा कधीकधी सदसद्विवेकबुद्धीचा वापरही महत्त्वाचा.

पान १ वरून

## संघाची शंभर वर्षांची यात्रा

समन्वय, ग्रामविकास, कुटुंबप्रबोधन, सामाजिक समरसता, गौसंवर्धन, पर्यावरण संरक्षण, भटके-विमुक्त लोकांमध्ये कार्य आणि सामाजिक सद्भाव यासाठी ज्या ज्या ठिकाणी स्वयंसेवक सक्रिय आहेत, त्या सर्व ठिकाणी मातृशक्ती आणि समाजातील सज्जनशक्ती सक्रिय आहे. त्यांची भागीदारी वाढावी, असा संघाचा आग्रह आणि प्रयत्न नेहमीच असतो. राष्ट्रीयतेचा एक विचार घेऊन समाज जीवनातील विविध क्षेत्रात व्यवस्था परिवर्तन घडवून आणण्यासाठी मजूर, शेतकरी, विद्यालय, धार्मिक संत, राजनीती, कलाकार, वकील, लघु उद्यमी, वनवासी बंधू, क्रीडा इत्यादी विविध क्षेत्रांच्या माध्यमातून स्वयंसेवक सामाजिक जीवनात सक्रिय आहेत. या सर्व कार्यांत स्त्रियांची सहभागिता वाढावी याचे प्रयत्न सुरू आहेत. ही कार्ये, ज्यात स्वयंसेवक सक्रिय आहेत ती सगळी स्वतंत्र आणि स्वायत्त आहेत, ही संघाची संकल्पना आहे; त्याचप्रमाणे आचरणदेखील आहे. संघाची ही १०० वर्षांची यात्रा आणि त्याचे मोठ्या वटवृक्षात रूपांतरण इतकं सोपं कधीच नव्हतं. आधी उपेक्षा, मग उपहास, नंतर स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी प्रत्येक पायरीवर संघाचा विरोध केला गेला. कुठे कुठे तर संघर्ष करावा लागला; पण राष्ट्राच्या पुनर्नि र्णाची ही यात्रा सतत सुरू राहिली. कार्यकर्त्यांचा त्याग, बलिदान, समाजाचे सहकार्य आणि ईश्वरी कृपा यामुळे संघ सतत वाढत राहिला. आज संघकार्याला समाजाचा सहकार आणि सहभाग दोन्हीही सतत वाढत्या प्रम ाणात मिळत आहे. वेळोवेळी समान विषयांसाठी एकत्र येऊन परस्पर सहयोगदेखील केला जातो आहे. याचमुळे संघाची शक्ती, प्रभावासोबत समाजाच्या मानसिकतेत पण अलिकडे बदल झालेला दिसतो. संघ कार्यकर्त्यांचा सगळा भर २०२५ च्या विजयादशमीपर्यंत संघकार्याची गती वाढवून या कार्याला अधिक व्यापक करण्यावर असणार आहे. अधिकाधिक लोकं संघाच्या थेट संपर्कात येऊन, संघाला समजून घेऊन या राष्ट्रकार्याशी जोडले जावे, हा प्रयत्न असणार आहे. २०२५ च्या विजयादशमीनंतर स्वयंसेवक अधिकाधिक लोकांना त्यांच्या त्यांच्या आवडीनुसार समाज परिवर्तनाच्या पाच विशिष्ट क्षेत्रात (पंच परिवर्तन) सहयोगी करण्यासाठी सक्रिय होतील. ‘पंच परिवर्तन’चे पाच विषय आहेत- कुटुंबप्रबोधन, सामाजिक समरसता, पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन, स्वदेशी जीवनशैली आणि लोक-कर्तव्य बोध. संघाच्या विकासयात्रेची इतकी यशस्वी वाटचाल बघून लोक आश्चर्यचकित होतात, कौतुक करतात आणि भारावून जातात. या सगळ्या यशाचे श्रेय मात्र संघ संस्थापक डॉ. हेडगेवारांचे व्यक्तित्व, दर्शन आणि त्यांच्या अमोघ कार्यपद्धतीला जाते. राजकीय सत्तेवर अवलंबून न राहता समाज आधारित रचना उभी करण्याचा त्यांचा आग्रह होता. त्यामुळेच या प्रकारचे शाश्वत परिवर्तन परिणामकारक होताना दिसते आहे. एक संघ गीत आहे- ‘केवल सत्ता से मत करना परिवर्तन की आस, जाग्रत जनता के केंद्रों से होगा अमर समाज ।’ हे सगळं बघताना आणि करताना एक मर्यादादेखील लक्षात येते की, संपूर्ण समाजाला जर जागरूक, संस्कारित, गुणवंत आणि संघटित करायचे असेल तर फक्त शाखांचा पसारा वाढवून हे उद्दिष्ट १०० टक्के साध्य होणार नाही. याकरिता समाजाच्या स्वाभाविक व्यवस्था अर्थात कुटुंब, विद्यालय, महाविद्यालय आणि समाज या सर्व माध्यमातून असे संस्कार देण्याची व्यवस्था करावी लागेल. जेव्हा प्रत्येक जागी, प्रत्येक पायरीवर असे संस्कार मिळतील आणि अनुकरणीय अशी उदाहरणं जागोजागी दिसतील तेव्हा त्यांना बघून सर्व लोकं या प्राचीन आणि वैशिष्ट्यपूर्ण राष्ट्राच्या वास्तविक स्वरूपाला समजू शकतील आणि त्याच्या अनुरूप आचरण व व्यवहार करतील. तेव्हाच संपूर्ण समाजात परिवर्तनशील सकारात्मक शक्ती निर्मित होईल. मगच एक समृद्ध, सशक्त आणि सक्रिय भारत, आपली सर्व समावेशी, एकात्म व सर्वांगीण सांस्कृतिक ओळख निर्माण करून मानवतेला मार्गदर्शन करणारा ‘दीपस्तंभ’ असा समाज तयार होईल, जो आपली वैश्विक जबाबदारी उचलण्यासाठी सक्षम आणि तत्पर असेल. संघाच्या शाखांच्या माध्यमातून आणि स्वयंसेवक आपल्या आचरणातून जे राष्ट्र कार्य करीत आहेत, ते कार्य समाजाच्या स्वाभाविक व्यवस्थांच्या माध्यमातून सुरू होईल. अपराजेय संघटित समाजाची निर्मिती होईल, पुढेही होत राहील आणि ते संपूर्ण समाजाचे कार्य होऊन ‘संघकार्य’ अविरत चालत राहील.

## आखातातील युद्धाची संपूर्ण जगाला झळ

घेऊन चीनने तैवानवर हल्ला केल्यास त्याच्या संरक्षणासाठी पुरेशी क्षेपणास्त्रं आहेत का, असाही प्रश्न विचारण्यात येत आहे. युद्धाच्या पहिल्याच दिवशी इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनी यांना ठार मारल्यानंतर त्यांचा उत्तराधिकारी नेमताना इराणने अमेरिकेचे मत विचारात घ्यावे, अशी दर्पोक्ती डोनाल्ड ट्रम्प यांनी केली होती. पण, इराणमधील धर्मगुरूंच्या मंडळाने अपेक्षेप्रमाणे खामेनी यांची पुत्र मोज्तबा यांची निवड केली. यातून इराणच्या धार्मिक नेतृत्वातही घराणेशाही सुरू होत आहे का, असा प्रश्न विचारला जात असला, तरी या निर्णयामागे एक रणनीती आहे.

अली खामेनी ८६ वर्षांचे असल्यामुळे फारसे सक्रिय नव्हते. इराणमधील धार्मिक व्यवस्थेत मवाळ आणि जहाल असे दोन गट असून, मोज्तबा जहाल गटात आहेत. त्यांचे ‘रिवॉल्युशनरी गार्ड’शी घनिष्ठ संबंध आहेत. यावर्षीच्या सुरुवातीला महागाई आणि बेरोजगारीला कंटाळून इराणमधील तरुणांनी केलेले आंदोलन चिरडून टाकण्यासाठी हजारो लोकांना ठार मारण्यात आले. या कारवाईमध्ये मोज्तबा सहभागी होते. या युद्धाच्या सुरुवातीला त्यांनासुद्धा मारण्याची योजना होती. त्यामुळे इराणच्या नेतृत्वाने आपण हा संघर्ष सुरूच ठेवणार असल्याचे सूचित केले आहे. या युद्धामुळे भारताच्या शेजारी असलेल्या पाकिस्तान आणि बांगलादेशसह अनेक विकसनशील देशांचे कंबरडे मोडले आहे. बांगलादेशमध्ये विद्यापीठांना सुटी घोषित करण्यात आली आहे. वरकरणी तेथे ईदची सुटी वाढवण्यात आली असली, तरी प्रत्यक्षात सरकारला शेख हसीनांच्या सरकारविरोधात झाले तशा विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची भीती आहे. पाकिस्तानमध्ये एका दिवसात पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत ५५ रुपयांची वाढ करण्यात आली. तिथेही प्रत्यक्ष वर्गाऐवजी ऑनलाईन उच्च शिक्षण सुरू करण्यात आले असून, एवढ्यावरच न थांबता, सर्व मंत्री, त्यांचे सल्लागार आणि सचिवांचे दोन महिन्यांचे पगार कापण्यात आले आहेत. कार्यालयांनी अर्ध्या कर्मचार्यांना घरून काम करायला सांगितले असून सरकारी कर्मचार्यांच्या इंधनभत्त्यातही अर्ध्याहून अधिक कपात करण्यात आली आहे. आखाती युद्धामुळे महागाई वाढेल, तसेच काही प्रमाणात स्वयंपाकाच्या इंधनाची टंचाई जाणवणार असली, तरी त्यातूनही मार्ग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पर्शियाच्या आखातातून भारतीय युद्धनौकांच्या देखरेखीखाली भारताला नैसर्गिक वायू पुरवणार्या जहाजांच्या वाहतुकीसाठी भारत इराण आणि अमेरिकेशी बोलणी करत आहे. हे युद्ध आणखी लांबले, तर संपूर्ण जगाला त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागणार आहेत.

कथा

मो. बा. देशपांडे

## मॅरेज की पॅकेज?



सर्वोदय उद्यानातील ती संध्याकाळची शांत रम्य वेळ. झाडाखालच्या बाकावर मनोहरराव एकटेच विमनस्कपणे बसून होते. आज त्यांना कुणाशीही फारसं बोलायची इच्छा होत नव्हती. बराच वेळ ते एकटेच बसून होते तेवढ्यात मागून कुणीतरी खांद्यावर हात ठेवला. ‘‘अरेच्चा, गोविंदराव तुम्ही? कधी आलात पुण्यावरून?’’ ‘‘मला अगोदर सांगा, तुम्ही इथं असे एकटेच का बसून अहात? आणि चेहऱ्यावर कसली उदासी. किती काळवंडलाय बघा! कसली तरी चिंता आतून पोखरते आहे. सांग बघू काय ते?’’ ‘‘गोविंदराव, तुमचं सगळं कसं छान छान. दोन्ही मुलं आपल्या संसारामध्ये रममाण, पण आमची एकुलती एक कन्या. तिच्या लग्नाचा योग कधी आहे कोण जाणे! तीच चिंता मला रात्रंदिवस पोखरतेय बस्स. रात्र रात्र झोप लागत नाही. हल्ली सगळं ताळतंत्र बिघडलंय. मुलांना जास्त काही बोलता येत नाही आणि ते आपलं काही ऐकत नाहीत!’’ ‘‘मनोहरराव, तुमचा नेमका प्रॉब्लेम काय आहे? मला माहितेय, तुमची नेहा एक गुणी मुलगी असून दिसायला सुंदर, सुशील आणि सुशिक्षित आहे. चांगला आयटी जॉब आहे तरी तिच्या लग्नाचं का जुळून येत नाहीये?’’ ‘‘कसंय ना, तिच्यापेक्षा जास्त पॅकेज असलेला मुलगा हवाय. अशी अट आहे तिची.’’ ‘‘खरंच कठीण आहे, हल्ली माणसाची लग्न होत नसून पॅकेजची लग्न होत आहेत? उद्या संध्याकाळी तुम्ही उभयता तिला घेऊन आमच्या घरी या. अनायसे आमच्याकडे नातीचा म्हणजे पिंकीचा वाढदिवस आहे म्हणून बोलावलेय सांगा. मी माझ्या परीने तिला समजावून बघेन...’’ ठरल्याप्रमाणे संध्याकाळी मनोहरराव सपत्नीक स्नेहाला घेऊन आले. खरं तर स्नेहा येत नाही असंच म्हणत होती, पण पिंकीने बोलावले सांगून कशीतरी तिची मनधरणी करून येथवर आणले होते. पिंकीचा बर्थडे केक कटिंग झाल्यावर सर्वांनी टाळ्या पिटल्या. केक खाल्ला. त्यानंतर गोविंदरावांनी या तिघांना मुद्दाम समोरच्या बाल्कनीत थांबवून घेतले. गोविंदराव नेहाला म्हणाले... ‘‘नेहा बेटा, मला तुला एल्डरली ॲडव्हाईस देण्याचा अधिकार आहे. त्यानुसार मी बोलू का?’’ ‘‘बोला काका बिनदिक्कत, त्यात काय?’’ नेहा हसून म्हणाली. ‘‘नेहा, मला प्रांजळपणे सांग. तुझ्या लग्नाचं घोडं कुठे अडलंय?’’ ‘‘काका, मला माझ्या पॅकेजनुसार जोडीदार हवाय.. यात अवाजवी काय आहे?’’ ‘‘अगं, पण त्यामुळे लग्नाचं वय निघून जातं. पैसा महत्त्वाचा आहे की वेळ? त्यामुळे पुढील समस्यांना तोंड द्यावं लागतं, याचा विचार कोण करील? ऐक, मी तुला माझी स्वत.ची एक हकिकत सांगतो... मी मध्यमवर्गीय कुटुंबातला असून लग्नाचे वय झालं तेव्हा मला साधी तुटपुंज्या पगाराची एका दुकानात म्हणजे खाजगी नोकरी होती. पण केवळ लग्नाचं वय झाले म्हणून त्या काळातील विचारसरणीनुसार घरच्यांनी लग्नाचा आग्रह धरला. तेव्हा वडीलधारे काय सांगतात ते ऐकण्याची पद्धत होती. एक साधारण कुटुंबातील मुलगी सांगून आली आणि आमचे लग्न झाले. आमच्या गरिबीतला संसार सुरू झाला. वर्षभरात घरात पाळणा हलला... त्यानंतर मला चांगली नोकरी चालून आली. कारण आधी मी नोकरीच्या स्पर्धा परीक्षा दिल्या होत्या आणि शैलालाही बँकेत नोकरी मिळाली. आतां आम्ही उच्च मध्यमवर्गात आलो आणि रेस्ट इज हिस्ट्री. यथावकाश आमची पदोन्नती झाली. मी प्लॉट घेऊन हे छान घर बांधले. आज आम्ही संपनञन जीवन जगतोय. आमचं कुठेच अडलं नाही...’’ ‘‘पण काका, तेव्हा आणि आताच्या विचारसरणीत बराच फरक पडलाय!’’ ‘‘कोणती विचारसरणी योग्य आहे? जुनी की नवी? आता मला सांग तुला इतके मोठे पॅकेज आहे. त्याला अधिक हवे म्हणजे दुप्पट पैसे आल्यावर तुम्ही काय करणार? कशासाठी हवाय इतका पैसा? तुम्हाला नेमकं हवंय तरी काय? जीवनमान सुखी संपन्न करण्यासाठी असेल तर आयुष्यात गेलेले तारुण्य पुन्हा प्राप्त होत नसते. योग्य वयात लग्न व्हायला हवीत. नंतर दोघांनी मिळून संसाराचा गड संघर्ष करीत लिंपण्यात मजा आहे. खाईन तर तुपाशी नाहीतर उपाशी म्हणजे अमुकच पगाराचा नवरा हवा म्हणून आपल्या आयुष्यातील सोन्यासारखे दिवस वाया घालवण्यात कसली हुशारी आहे?’’ संसार सुख आणि मातृत्व सुख हे सर्वोच्च सुख गणले आहे. त्याची मोजमापं पैशात आणि पॅकेजमध्ये कसे होऊ शकते? आमचे नशीब चांगले होते. कुणाचे कमी-जास्त असू शकते. पण अडून राहिल्याने सगळा खोळंबा होतो. हरेक दिवस नव्या संधी घेऊन येत असतो. जीवनाला कलाटणी मिळत असते. कोण जाणे नंतर पत्नीच्या किंवा बालकाच्या पायगुणाने जीवन अधिक उन्नत होऊ शकते. हे जुने उदाहरण असले तर व्यवहार्य आहे.’’ नेहा विचार करीत होती. ‘‘काका, तुमचे म्हणणे मला पटले. पण हा झाला तुमच्या पिढीचा विचार. आता परिस्थिती बदललीय. आमच्या पिढीचा एकूण कल आय मीन ट्रेंड बघून माझा विचार तसाच झाला होता. पण तो विचार चुकीचा आहे हे माझ्या आता ध्यानात येतंय!’’ ‘‘परिस्थिती नाही केवळ तारीख बदलते बस्स. बाह्य स्वरूप वेगळे दिसले तरी जीवनमान तेच असते तुला एक गंमत सांगतो. आमच्या शेतावरचा म्हाद्या गडी. त्याला दोन मुले आहेत. खेड्यात मुलांचं शिक्षण जेमतेम दहावी म्हणजे फार काही झालं नाही. कामधंदा मिळावा म्हणून पोरं शहरात आले. एकाला मोठ्या टोलेजंग सोसायटीत केअर-टेकर म्हणून नोकरी मिळाली. तेथेच त्याला तीन खोल्यांचा आऊट हाऊस ब्लॉक मिळाला. काम काय सकाळी पाण्याची मोटार सुरू करणे, बंद करणे, थोडी देखरेख, रात्री गेट बंद करणे, बगिच्यातील फुलझाडांना संध्याकाळी पाणी देणे इ. त्यालाही गावाकडील मुलगी सांगून आली. लग्न झालं. आता बघितलं तर दोन मुले खेळताना दिसतात. सुखाचा संसार सुरू आहे. त्यांच्याकडे मोठ्ठी कार नाही, पण आनंद पुरेपूर आहे. बंगला नाही, पण निवारा आहे. शेवटी काय खूप मोठी गुंतवणूक करणाराही एक दिवस मरणार असतोच की. पण नवरा-बायकोच्या नात्यातील ही पैशाची स्पर्धा तुमचे जीवन नकळत हिरावून घेत आहे. हे या बुद्धिमान सुशिक्षित तरुणाईला का कळत नाही?’’ ‘‘काका तुमचे हे बोलणे खरोखरीच आय ओपनर आहे.’’ ‘‘आता त्याच्या त्या दुसऱ्या मुलाची कहाणी ऐक. त्याचेही [illegible] (पान ६ वर)

वेध

प्राजक्ता हुशंगाबादकर

# गोष्ट 'पंच'ची!



**सोशल मीडियावर अलिकडे आईपासून दुरावलेल्या, एकट्या पडलेल्या आणि सतत सॉफ्ट टॉयला बिलगून राहणाऱ्या 'पंच'ला भलतीच सहानभूती मिळाली. त्याच्या मिठी मारण्याच्या क्रियेला मानवी भावनांशी जोडले गेले तर आईला खलनायिका ठरवले गेले. मात्र हा विषय जितका संवेदनशील आहे, तितकाच वैज्ञानिक तथ्य समजून सांगणाराही आहे. हे वास्तव समजून घेणे प्राणिमित्रालाच नाही, तर सामान्यजनांनाही अंतर्मुख करेल.**

तुम्हाला इसापनीतीतील माकडिणीची गोष्ट माहीत असेल. कुरूप म्हणून हिणवलं गेलेलं आपलं पिल्लू सर्वात सुंदर असल्याचं ती ठामपणे सांगते. पिलाचा मृत्यू झाल्यानंतर पिलाला कवटाळून बसलेल्या माकडिणीच गोष्टही सर्वश्रुत आहे. ज्या आर्त भावनेने या गोष्टी ऐकल्यावाचल्या जातात, त्याच आर्ततेने अलिकडे आपल्या आईपासून दुरावलेल्या, एकट्या पडलेल्या आणि सतत सॉफ्ट टॉयला बिलगून राहणाऱ्या 'पंच' या माकडाच्या पिलाला सोशल मीडियावर सहानभूती मिळाली. त्याच्या मिठी मारण्याच्या क्रियेला मानवी भावनांशी जोडले गेले आणि त्याच्या आईला खलनायिका ठरवले गेले. मात्र, या घटनेमागील विज्ञानाबाबत निर्माण झालेल्या गैरसमजांवर प्रकाश टाकेल.

पंच हा कठीण परिस्थितीतून बचावलेला एक लहान जपानी मकाक (माकड). तो फार लहान वयात आईपासून वेगळा झाला. त्याच्याबद्दल अधिक समजून घेण्यासाठी आपण मानसशास्त्रज्ञ हॅरी हार्लो यांनी माकडांवर केलेल्या प्रयोगाचा आधार घेऊ. १९५० च्या दशकात मानसशास्त्रज्ञ हॅरी हार्लो यांनी विस्कॉन्सिन मॅडिसन विद्यापीठात माकडांवर काही प्रयोग केले होते. या प्रयोगांमध्ये त्यांनी लहान माकडांना दोन कृत्रिम आई दिल्या; ज्यातील एक दूध पुरवू शकत होती अशी कृत्रिम तर दुसरी मऊ कापडापासून बनवली होती; मात्र ती कोणत्याही प्रकारचे अन्न पुरवू शकत नव्हती. माकडे नेहमी मऊ कापडाच्या आईकडेच जात. घाबरले की ती तिलाच बिलगत. या प्रयोगातून लक्षात आले की, मकाकना जिव्हाळ्याची आणि सुरक्षिततेची भावना फक्त अन्न पुरवल्यामुळे निर्माण होत नाही तर स्पर्शातून मिळणारा दिलासा, भावनिकदृष्ट्या मिळणारा आधार यातून येते. म्हणूनच तणावपूर्ण परिस्थितीत माकडांना सुरक्षितता आणि धीर मिळतो. अलिकडे चर्चेत राहिलेल्या 'पंच' या मकाकला आईपासून दूर असल्यामुळे मायेचा आधार नव्हता. परिणामी, तो मऊ खेळण्याला बिलगून राहू लागला. ते खेळणं त्याला सुरक्षित वाटायला मदत करत असल्याने आईपासून वेगळे झाल्यामुळे निर्माण झालेली भीती कमी करते. यामध्ये आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, ती म्हणजे माणसांना जसे दुःख प्रकर्षाने जाणवते किंवा एखादी गोष्ट गमावली की, उद्वीग्न व्हायला होते तसे माकडांचे नसते. इतर बहुतेक सस्तन प्राण्यांप्रमाणे माकडांच्या आयुष्याच्या पहिल्या काही महिन्यांमध्ये आईच सर्व काही असते. ती त्यांना उचलून नेते, ऊब देते, संरक्षण करते, दूध पाजते आणि भावनिक आधार देते. शास्त्रज्ञ याला 'सोशल बफरिंग' म्हणतात. आई दुरावल्यास लहान माकडे अनेकदा दुसऱ्या गोष्टींना बिलगतात, खेळणे कमी करतात किंवा इतरांपासून दूर राहतात. आईपासून वेगळे केल्यावर आधी ते अस्वस्थ होतात, कधी आक्रमक होतात आणि नंतर हळूहळू शांत पण उदासीन होतात, असे अनेक अभ्यासांमधून दिसून आले आहे. इतर कळपातील सदस्यांनी काळजी घेतली तर हा त्रास कमी होऊ शकतो, हेही नंतरच्या संशोधनातून लक्षात आले आहे. त्यामुळे माणसांच्या भावनांप्रमाणे आपण माकडांच्या भावनांकडे पाहू शकत नाही हे खरे असले, तरी वैज्ञानिकदृष्ट्या लहान वयात आई दुरावली, तर माकडांना नक्कीच ताण, असुरक्षितता आणि चिंता वाटते. माकडांच्या कळपामध्ये श्रेणीक्रम (हायरार्की) असतो.

या कळपामध्ये प्रभुत्वशाली माकड, ज्यांना आपण 'अल्फा' म्हणतो, ते गटात अधिक प्रभावशाली राहतात, त्यांना अधिक ग्रूमिंग मिळते आणि ते इतरांवर धाक दाखवू शकतात. खालच्या क्रमांकावरील सदस्यांना तुलनेने अधिक आक्रमकतेला सामोरे जावे लागते. त्याच वेळी रक्तसंबंध असलेली माकडे एकमेकांजवळ अधिक राहतात आणि परस्परांचे ग्रूमिंग करतात. अशा प्रकारे श्रेणीक्रम आणि नातेसंबंध मिळून त्या कळपातील समाजरचनेचा पाया तयार करतात. या कळपात लहान माकडांना शिकवण्यात मोठ्या माकडाची भूमिका महत्त्वाची असते. एखादे पिल्लू नियम मोडत असेल, उदा. आपला क्रम नसताना अन्न उचलणे किंवा मोठ्या माकडाच्या फार जवळ जाणे, तर मोठे माकड त्याला फटकारते, हुसकावते. हे कळपाची शिस्त टिकवण्यासाठी असते.

साधारणपणे आई कळपात आपल्या पिलाला संरक्षण देते, तिला तिच्या पिलाचा काही प्रमाणात बचाव करणे शक्य होते. अलिकडे चर्चेत राहिलेल्या माकडाच्या पंच या पिलाकडे मात्र आईची सोबतही नाही आणि संरक्षणही. त्यामुळे तो थेट कळपाच्या कडक शिस्तीला सामोरा जातो. परिणामी तो सॉफ्ट टॉयला आधार म्हणून जवळ करतो. पण यामुळे पंचची आई खलनायिका किंवा 'माता न तु वैरिणी आहे' का? तर नाही! पंचला त्याच्या आईने नाकारले म्हणजे काय केले हे समजून घेऊ. कदाचित तीही प्राणिसंग्रहालयामध्ये राहणाऱ्या प्रायमेट्समध्ये (माकडांमध्ये) दीर्घकालीन ताणामुळे वर्तनात होणाऱ्या बदलाचे उदाहरण असू शकते. अस्वस्थता, आक्रमकता किंवा पिलांकडे दुर्लक्ष अशी लक्षणे तणाव असणाऱ्या प्राण्यांमध्ये दिसू शकतात. त्यामुळे एखाद्या घटनेकडे पाहताना तिच्या आईवर आरोप करण्याऐवजी, त्या मागील पर्यावरणीय आणि व्यवस्थात्मक कारणांकडे पाहणे अधिक महत्त्वाचे आहे. खरे तर, त्याचे आईपासून दुरावणे यापेक्षा पंचच्या शरीरातील कॉर्टिसॉल या रसायनाच्या पातळीचा अभ्यास झाला पाहिजे.

हॅरी हार्लो यांच्या प्रयोगात स्पष्ट केले आहे की, त्या लहान माकडांना अन्नापेक्षा स्पर्शातून मिळणाऱ्या मायेची जास्त ओढ होती. त्यामुळे आपण पंचला मऊ खेळणे धरून बसलेले पाहतो, तेव्हा त्याच्यासाठी ते फक्त खेळणे नसते तर मानसिक आधार असते. अनिश्चित किंवा तणावाची परिस्थिती असेल, तर शरीर आपोआप ओळखीच्या, मऊ गोष्टीला घट्ट पकडते. ही नैसर्गिक प्रतिक्रिया आहे. जसजसा तो मोठा होईल आणि कळपातील इतर माकडांच्या संपर्कात येईल, तसतशी कदाचित त्याला या खेळण्याची गरज कमी होत जाईल. त्याला पुरेसा सामाजिक आधार आणि जिव्हाळा मिळाला तर या खेळण्याची गरजच उरणार नाही. पंचच्या बाबतीत एक आणखी मुद्दा उपस्थित केला जातो आहे की, तो नॉर्मल माकडासारखा आहे का? कळपातील इतर माकडांसारखा तो आयुष्य नॉर्मली जगू शकेल का?

(पान ६ वर)

उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे

भ्र. ९४०३७४९९३२

# वाचन: समृद्धीचे प्रकाशपर्व



पहाटेची रम्य वेळ होती. मला जाग आली होती. पण तरीही अंथरुणात तसाच पडून होतो. अशातच थोडा डोळा लागला म्हणा की, काय सांगता येत नाही पण एक दृश्य माझ्या नजरेसमोरून तरळून गेले. डोळ्यासमोर कन्याकुमारीचा समुद्र होता. किनार्यावर लाटा आदळत होत्या. समुद्राची गाजही ऐकू येत होती. स्वामी विवेकानंदाचे स्मारक दिसायला लागले. अचानक मला स्वामी विवेकानंद ज्या खडकावर ध्यानस्थ बसले होते, त्या ठिकाणी संत ज्ञानेश्वरांची उभी असलेली भव्य मूर्ती दिसू लागली. स्वामी विवेकानंदांच्या भव्य पुतळ्यासारखीच ती मूर्ती होती. त्या मनमोहक मूर्तीकडे पाहत असताना आणखी एक चमत्कार घडला. ज्ञानेश्वरांच्या मूर्तीचे रूपांतर एका विशाल ग्रंथात झाले. मग त्या ग्रंथाची पाने उघडून ती विस्तीर्ण समुद्राच्या पटावर पसरली. समुद्राच्या दोन्ही दिशा त्या पुस्तकाच्या पानांनी व्यापल्या. जणू पुस्तकाने आपला डावा आणि उजवा हात पसरला होता. आता मला पुस्तकातली अक्षरं तारकांसारखी दिव्य आणि प्रकाशमान दिसायला लागली. हळूहळू त्या अक्षरातून प्रकाश बाहेर पडू लागला. त्या अक्षरांची जणू रत्ने झाली. त्यांनी भोवतालच्या परिसराला व्यापले. मलाही व्यापले.

हळूहळू ही प्रकाशकिरणे वाढत जाऊन संपूर्ण विश्वाला न्हाऊ घालू लागली. प्रकाशाचे कवडसे ठिकठिकाणी विखुरले. कोणाकोणाला ती अक्षररूपी प्रकाशकिरणे अनमोल रत्ने वाटली. त्यांनी वेचता येतील तेवढी रत्ने गोळा केली. मीही जमेल तेवढी ती रत्नं गोळा करण्याचा प्रयत्न केला. पण ' देणाऱ्याचे हात हजारो, दुबळी माझी झोळी' अशी माझी अवस्था झाली. इतरांनीही ती पाहिली पण त्यांना ती रत्ने आहेत हे कळलेच नाही. त्यांनी गारगोट्या किंवा चमकणारे दगड समजून त्याकडे दुर्लक्ष केले. देवघरचेच देणे ते! मग ज्ञानेश्वर माउलींच्या एकेक अर्थपूर्ण ओव्या मला आठवू लागल्या. माउली पसायदानात शेवटी म्हणतात, आणि ग्रंथोपजीविये विशेषी लोकी इये, **दृष्टादृष्ट विजये होआवे जी।** ज्ञानेश्वर माऊलींचे अक्षर वाऱ्यावर असलेले विशेष प्रेम आपल्याला इथे दिसते. माउली म्हणतात, 'ज्यांचे ग्रंथांवर विशेष प्रेम आहे किंवा ग्रंथांवरच ज्यांची उपजीविका आहे आणि ग्रंथातील उपदेश, तत्वज्ञान ज्यांनी आपल्या जीवनात आचरणात आणले आहे, त्याचा अनुभव घेतला आहे अशा लोकांना दृष्ट आणि अदृष्ट म्हणजे आपल्या दृष्टीला दिसणारे आणि न दिसणारे अशा सर्व सुखांचा लाभ होऊन ते विजयी होवोत. ज्ञानेश्वरीत माउली आणखी एका ठिकाणी म्हणतात,

**बिंब जरी बचके एवढे, परी प्रकाशा त्रैलोक्य थोकडे। शब्दांची व्याप्ती तेणे पाडे अनुभवावी।।**

सूर्यबिंब जेव्हा आपण पाहतो तेव्हा आपल्याला आपल्या हाताने ते झाकता येईल एवढे लहान भासते. पण त्याचा प्रकाश त्रैलोक्य व्यापून टाकतो. शब्दांचेही तसेच असते. शब्द दिसतो चिमुकला पण त्याच्या अर्थात विश्व व्यापण्याची क्षमता असते. आपले हृदय सुद्धा आपल्या मुठीत मावेल एवढे लहान असते पण या हृदयाकाशात एकदा प्रकाशाचा उदय झाला की सारे आयुष्य तो प्रकाशमान करून टाकतो. असेच आपले आयुष्य प्रकाशमान करण्याची शक्ती अक्षरांमध्ये आणि ती अक्षरे ज्या पुस्तकात सामावलेली असतात त्या पुस्तकांमध्ये असते. तुकाराममहाराज म्हणतात,

**आम्हां घरी धन शब्दांचीच रत्ने।**
**शब्दांचीच शस्त्रे यत्न करू।**
**शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन।**
**शब्दे वाटू धन जनलोका।।**

शब्दांचे महत्व संत तुकारामांनी किती यथार्थ वर्णन केले आहे! पण ज्याला ते कळेल त्यालाच त्याचे महत्व! सुविचार हे चांगल्या वाचणातून, चांगल्या ग्रंथातून आपल्याला मिळतात. म्हणून चांगले ग्रंथ हे सुद्धा रत्नासारखेच मौल्यवान आहेत. अगदी आत्महत्या करण्याच्या निर्णयापर्यंत तो येऊन ठेपला होता. एवढ्यात भूक लागल्याने घरच्यांनी त्याच्यासाठी पाठवलेले फराळाचे पदार्थ खायला त्याने सुरुवात केली. ते पदार्थ ज्या कागदात गुंडाळून पाठवले होते, तो कागद एका मासिकाचा दिवाळी अंकाचे एक पान होते. त्या पानावर पुल देशपांडे यांचा 'माझे खाद्यजीवन' हा लेख छापलेला होता. त्याने शेकोटीच्या प्रकाशात तो लेख वाचायला सुरुवात केली. वाचता वाचता त्याचे निराशेचे विचार कुठल्या कुठे पळून गेले. पुलंनी ज्या खाद्य पदार्थांचे बहारदार वर्णन केले होते, ते पदार्थ खाण्यासाठी तरी आपण जगले महत्वाचे आहे असे त्याला वाटले. पुढे त्याने पुलंना एक पत्र लिहिले. त्या पत्रात त्याने म्हटले, 'खरं सांगतो, माझ्या मनात आत्महत्येचे विचार येत होते. पण आपला लेख वाचला आणि जगावंसं वाटलं.' एवढी शक्ती एखाद्या लेखामध्ये, पुस्तकांमध्ये असू शकते. मानवी जीवनात परिवर्तन घडवून आणण्याचे सामर्थ्य ग्रंथांमध्ये आहे.

स्वामी विवेकानंद, डॉ बाबासाहेब आंबेडकर, डा. एपीजे अब्दुल कलाम यांच्यासारख्या कोणत्याही महामानवाचे उदाहरण घेतले तरी पुस्तकांवर त्यांचे अतोनात प्रेमहोते हे आपल्याला लक्षात येईल. पुस्तकांनीच त्यांच्या जीवनात क्रांती घडवून आणली. ही माणसे कुठेही गेली तरी त्यांच्याबरोबर पुस्तके असत.' जेथे जातो तेथे तू माझा सांगाती' असे पुस्तकांच्या बाबत त्यांचे होते. डॉ कलाम यांचा जन्मदिवस आपण वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करतो. ग्रंथांबद्दल बोलताना ते म्हणतात, 'ग्रंथ सदैव माझे मित्र आहेत. गेल्या पन्नास वर्षांहून अधिक काळ मला ग्रंथांनी प्रेरणा दिली, स्वप्नं दिली. ग्रंथानीच ध्येयपूर्तीसाठी आत्मविश्वास दिला आणि अपयशाच्या प्रसंगी धीर दिला. म्हणूनच माझ्या तरुण मित्रांनो, ग्रंथांशी मैत्री जोडा. ग्रंथ तुमचे उत्तममित्र असतात.' शांता शेळके यांचा 'सहावे सुख' या नावाचा एक लघुनिबंध आहे. त्यात चिनी माणसांचा एक दाखला त्या देतात. दोन चिनी माणसे एकमेकांना भेटली म्हणजे, 'तुम्हाला सर्व सहाही सुखे प्राप्त होवोत' अशा शुभेच्छा ते एकमेकांना देतात. सहापैकी पाच सुखे आपल्या नित्याच्या परिचयाची आहेत. सहावे सुख प्रत्येकाचे वेगवेगळे असू शकेल. कोणी ते पुस्तकात शोधेल, कोणी आपल्या आवडत्या छंदात, कोणी परमेश्वराच्या नामस्मरणात. पण आपल्यासारखी सामान्य माणसे नेहमी पहिल्या पाच प्रकारच्या सुखातच आयुष्याची इतिकर्तव्यता मानतात. सुखाच्या मागे आपण आयुष्यभर धावत राहतो. पण मनात आतून कुठे तरी बोच असते, की सगळे मिळूनही काहीतरी अपूर्ण आहे. तुमचे सहावे सुख जेव्हा तुम्हाला सापडेल, तेव्हाच तुम्हाला खरे समाधान लाभेल. मला वाटतं हे सहावं सुख आपण वाचनात शोधायला हरकत नाही. वाचन किंवा ग्रंथ हे आपल्या जीवनाचा एक भाग व्हायला हवेत. कवी सौमित्र उर्फ किशोर कदमयांची एक छान कविता आहे. या कवितेतील काही ओळींनी आपण आजच्या या लेखाचा समारोप करू या. ते आपल्या मुलांना म्हणतात 'मी तुमच्यासाठी घर, गाडी, बंगला, पैसा यासारखी भौतिक संपत्ती मागे ठेवली नाही.

माझ्या वाडवडिलांनीही तशी ती माझ्यासाठी ठेवली नव्हती. पण मी तुमच्यासाठी पुस्तकरूपाने एक अमूल्य अशी संपत्ती मागे ठेवली आहे. तिचा तुम्ही उपभोग घ्या. ते आपल्या कवितेत म्हणतात, मी नसेन तेव्हा ही पुस्तके असतील, जी नेतील तुला जायचं आहे तिथे. फक्त मी असेन तिथे मात्र, तुला पोहोचता येणार नाही कारण मी आधीच होऊन गेलेलो असेन एखादी कथा, एखादी कादंबरी, कविता, एखाद्या पुस्तकातली माझी अनावर आठवण आली की या प्रचंड ढिगाऱ्यातलं ते एखादं पुस्तक शोध, तुझा प्रवास बघ कसा सोपा होऊन जाईल!

प्रबंधांची बीजे


श्रीरंग हिर्लेकर

# विभूतियोग जे जे उत्तम, उदात्त उन्नत

गीतेच्या दहाव्या अध्यायाचे नाव विभूतियोग. गीता आणि विष्णुसहस्रनाम या दोन रचनांत फार साम्यता आहे. दोघींचेही जन्म एकाच स्थानी म्हणजे कुरुक्षेत्रावर. दोन्हींचे रचनाकार एकच- **'व्यासाय विष्णुरूपाय व्यासरूपाय विष्णवे।'** असा ज्यांचा गौरव आहे, ज्यांच्या बहुआयामी बुद्धीला एकही विषय अस्पर्शित नाही असे महर्षी व्यास. एक युद्धाच्या संभाव्य परिणामांच्या कल्पनेने व्याकूळ झालेल्या अर्जुनाची समजूत घालण्यासाठी तर दुसरी युद्धोत्तर नव निर्वाचित राजा युधिष्ठिराला मार्गदर्शन करण्याच्या निमित्ताने. गीतेचा उद्गाता प्रत्यक्ष कृष्ण तर नामसहस्राचे आचार्य भीष्म. युद्धापूर्वी अनेक ज्ञानी, विद्वान, तत्त्ववेत्ते, धर्ममार्तंड, तेजस्वी, शूर, वीर, प्रतापी आणि विविध विषयांतील आदर्शांचे मापदंड अशांनी हे भारतवर्ष समृद्ध असूनही या सर्वनाशी युद्धाची वेळ आली. मग आदर्शाची नेमकी व्याख्या ती काय, कोणता मार्ग श्रेयस्कर, काय धरावे आणि काय टाळावे, ध्येय काय असावे, चिंतन कशाचे करावे, काय केले, कसे वागले असता या इतिहासाची पुनरावृत्ती होणार नाही या चिंतेने अस्वस्थ झालेल्या युधिष्ठिराने आचार्यांना सहा प्रश्न विचारून मार्गदर्शन करावे, अशी विनंती केली.

**'किमेकं दैवंत लोके किं वाप्येकं परायणम्। स्तुवन्तः कं कमर्चन्तः प्राप्नुयुर्मानवाःशुभम्।।'**

म्हणजे या विश्वात असे एकमेव दैवत कोणते आहे की, ज्याच्या आज्ञेने सर्वजण प्रेरित होतात? श्रेष्ठ अशी अंतिम गती किंवा परम प्राप्तव्य स्थान कोणते? कोणाची स्तुती आणि अर्चना करावी? कोणत्या दैवताच्या गुणगायनाने अथवा पूजनाने मानवाचे कल्याण होते? सर्वश्रेष्ठ किंवा आचरणीय असा धर्म कोणता? संसारबंधनातून सुटण्यासाठी कोणाचे चिंतन करावे? त्यावेळेस भीष्मांनी **'विष्णोर्नामसहस्रं मे श्रुणु पापभयापहम्।'** असे म्हणत युधिष्ठिराच्या प्रश्नांची उत्तरे देताना सर्व वैशिष्ट्यांनी युक्त, **'वेवेष्टि यत् याप्नोति तत् विष्णुः'** म्हणजे जगताला सबाह्य अभ्यंतरी व्यापणाऱ्या विश्वंभर विष्णूची असंख्य गुणवैशिष्ट्ये सांगितली. विभूतियोगात कृष्णाने **'अहं सर्वस्य प्रभवः'** या शब्दांनी सुरुवात करून त्यानिमित्ताने उदाहरण म्हणून आपल्या ८२ विभूती सांगितल्या. भक्ताने आराध्यासारखे होण्याकरिता आधी समजावून घ्यावे म्हणून तो म्हणतो की, माझे सर्व उद्योग तू नीट समजून घे व तसा हो. नंतर त्याने आपल्या योगैश्वर्याचे स्वमुखाने वर्णन केले. कृष्णाच्या 'अहं ब्रह्मास्मि'ची ती व्याख्या होती. दिव्य, श्रेष्ठ, मध्यम, कनिष्ठ, स्थूल, सूक्ष्म, चल, अचल सजीव, निर्जीव, रमणीय, रौद्र अशा ठिकाणी तो उत्कटतेने कसा भरला आहे ते सांगितले.



१) अद्वैताचा मोठा घास भरवण्यापूर्वी दृश्यातून अदृश्याकडे नेणे हा मार्ग केव्हाही सोपा. तोच त्याने निवडला. सूर्य, चंद्र, इंद्र, हिमालय ही परिचित उदाहरणे सांगत सांगत- **'यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा। तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसम्भवम्।।'** या सर्व म्हणजे माझा एखादाच अंश समज असेही सांगितले.

२) सूक्ष्म ते स्थूल, पुन्हा सूक्ष्म हा क्रम जाणीवपूर्वक आहे. आधी बुद्धी, ज्ञान, क्षमा. मग देवता व ऋषी म्हणून नारद, बृहस्पती. मग निसर्गातील स्थैर्य म्हणून हिमालय, समुद्र. नंतर कालाचे गूढ तत्त्व. पुढे अंतर्मनाविषयी म्हणून ज्ञानं ज्ञानवतामहम्. थोडक्यात अंतर्गत-दैवी- भौतिक-कालात्मक-पुनः चैतन्यात्मक किंवा योगमार्गानुसार मन-प्रकृती-विश्व-काल-ब्रह्म असा क्रम.

**३) श्रेष्ठत्वाचा निकषः** पर्वतांमध्ये हिमालय, नद्यांमध्ये गंगा, अश्वांमध्ये उच्चैःश्रवा, शस्त्रांमध्ये अमोघ वज्र, यज्ञांमध्ये जपयज्ञ. ही निवड यादृच्छिक नसून मानवाच्या सांस्कृतिक चेतनेमध्ये ज्यांना सर्वोच्च प्रतीक मानले गेले आहेत त्यानुसार आहे.

४) व्यासांच्या मनात लेखनाचा आराखडा तयार असावा. त्यांनी विश्वरूप दर्शन दाखवायचे आधीच ठरवले असावे. म्हणून सूर्याचे तेज, सागराचे गांभीर्य, कालपुरुषाच्या विकराल दाढेत **'यथा नदिनां बहवोऽम्बु वेगाः'** प्रमाणे शिरणारी असंख्य विश्वे या अनुषंगाने अर्जुनाचे कल्पनाविश्व विंचरून आणि विस्तारून ठेवले.

**५) निश्चित सुसंगती :** विभूतींच्या अनुक्रमणिकेत एक निश्चित सुसंगती आहे. मानवी चेतनेच्या उत्क्रांतीचा नकाशा आहे. मनुष्य दृश्य शक्तींना नमतो, त्यांचे तत्त्व जाणतो आणि मग अनन्यशरण होतो. त्याचा आध्यात्मिक वाटचाल मार्ग यात कौशल्याने चितारला आहे. यात विश्वरूपदर्शनाची तयारी दिसते.

**तात्त्विक अधिष्ठानः** सुरुवातीला कृष्णाने थेट विभूती न सांगता 'अहं सर्वस्य प्रभवः' असे म्हटले. देव, ऋषी, मनू हे सर्व माझ्यापासून आहेत, असे जो जाणतो, तो माझ्यासारखा होतो, असे म्हटले. ईश्वर हा सर्वांचा मूळ स्रोत आहे, हे लक्षात घेतले नाही तर पुढे सांगितलेल्या सर्व विभूती म्हणजे काहीतरी काव्यकल्पना अशाच वाटल्या असत्या.

**अंतर्मनातील दैवी गुण :** आता बाह्य विश्वातून अंतःकरणात शिरायचे. बुद्धी, ज्ञान, क्षमा, सत्य, दम, शम, सुख-दुःख, भय-अभय. याप्रमाणे ईश्वराला आपल्यातच ओळख अशी मूकसूचना आहे. येथे अध्यात्म ज्ञानाचा प्रारंभ आहे. बाह्य **दैवी गुण :** आदित्यात विष्णू, ज्योतींमध्ये सूर्य, नक्षत्रांत चंद्र, वेदांमध्ये सामवेद, स्थावरांमध्ये हिमालय, पुरोहितांत ब्रुहस्पती, ऋषींमध्ये भृगु, देवर्षीत नारद आणि देवांमध्ये इंद्र... याप्रमाणे. तात्पर्य उत्कट भव्य ते ध्यावे.

**निसर्ग, शक्ती आणि ऐश्वर्यः** येथील क्रम अधिकच व्यापक आहे. समुद्र, काल, सिंह, गरुड, वज्र, कामदेव, गंगा. यात एक निराळा संकेत दिसतो. कालिदासाच्या या श्लोकात हिमालयाची उंची, स्थैर्य, दिव्यता, सार्वभौमत्व, आणि अनेक वैशिष्ट्ये अशी एकवटली आहेत की, त्यांच्यावरील भाष्य हाही एका सुंदर लेखाचा विषय होईल. देवतात्मा हा समास देवतांचा आत्मा असा सोडवावा किंवा बहुव्रीही समासाप्रमाणे देवता-दिव्यता हाच ज्याचा आत्मा असेही म्हणावे. विभूतियोगात अनेक तत्त्वांची उंची सांगितली आहे. अक्षरांमध्ये अकार, समासांमध्ये द्वंद्व, सर्वश्रेष्ठ विद्या कोणती तर अध्यात्मविद्या, अक्षय काल, सर्वनाशक मृत्यू, स्त्री गुणनिदर्शक कीर्ती, श्री, वाणी, स्मृति, क्षमा, मेधा, धृति, स्मृति, संगीतातील प्रत्यक्ष बृहत्साम. विश्वाच्या मागील कालशक्ती आणि नियमन तत्त्वसुद्धा... याप्रमाणे जे जे तेजस्वी, भव्य, दिव्य, प्रभावी आहे ते सर्व माझ्या फक्त एका अंशमात्र. मी सर्व व्यापूनही शिल्लकच आहे. 'विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत्' असे सांगितलेच.

एकंदर रचनाक्रम बघितला तर अध्यात्म- अंतर्मन- देवता- निसर्ग- शक्ती- काल- अद्वैत अशी आहे. ही केवळ विभूतींची दीर्घ मालिका नाही. ही वाहती आकाशगंगा नसून केवळ त्याच्या कटीची मेखलाच आहे. यातून ईश्वर हा सर्वांचा आदिकारण, भक्तियोगातून जाणावयाचे ते ज्ञेय, ज्ञान देणारा परमात्मा हे सूत्र लक्षात येते. मानवी चेतनेतील गुण उदा. बुद्धी, ज्ञान, क्षमा, सत्य, दम, शम, सुखदुःख, भय-अभय यातून बौद्धिक, नैतिक, भावनिक अस्तित्वगत अशी रचना आढळते. विश्वाचा विस्तार सांगताना सूक्ष्म- दैवी- स्थूल- जैविक सांस्कृतिक अशी चढती भाजणी दिसते.

(पान ६ वर)

# ग्रहसंकेत

## (रविवार, १५ मार्च ते शनिवार, २१ मार्च २०२६)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार
'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✲ **रविवार, १५ मार्च-** पापमोचनी एकादशी, श्रावणोपास, संत बाळूमामा उत्सव आदमापूर, भुदरगड रथोत्सव मायणी (ता. खटाव), ग्राहक हक्क दिन, संत नामदेव महाराज उत्सव ✲ **सोमवार, १६ मार्च-** सोमप्रदोष, महाराजा मल्हारराव होळकर जयंती, भैरवनाथ यात्रा भैरववाडी, राष्ट्रीय लसीकरण दिन ✲ **मंगळवार,१७ मार्च-** शिवरात्री, मधुकृष्ण त्रयोदशी, श्री हिंगलाजमाता प्रकट दिन, वारुणी योग ✲ **बुधवार, १८ मार्च-** दर्श अमावास्या स.८.२६ नंतर, मन्वादि, अन्वाधान, उ. भाद्रपदार्कः सकाळी ९.२०, सिध्देश्वर यात्रा जयसिंगपूर, विप्रनाथ महाराज पुण्यतिथी अंजनवती (ता. जि.बीड), शहाजीराजे भोसले जयंती ✲ **गुरुवार, १९ मार्च-** गुढीपाडवा, नूतन वर्षाभिनंदन, अभ्यंगस्नान, कल्पादी, अमावास्या सकाळी ६.५५ पर्यंत, संवत्सर शालिवाहन शके १९४८ प्रारंभ, कालयुक्तनाम मारवाडीय संवत् २०८३ प्रारंभ, छत्रपती संभाजी महाराज पुण्यतिथी, डॉ. हेगडेवार जयंती, चैत्री नवरात्रारंभ, वासंतिक देवी नवरात्रारंभ, विश्व जोतिष दिन✲ **शुक्रवार, २० मार्च-** स्वामी समर्थ प्रकट दिन, संत झुलेलाल जयंती, बालचंद्रमाव्रत, चंद्रदर्शन (२०:१५ पर्यंत), विषुव दिन,भैरवनाथ यात्रा तांबवे ✲ **शनिवार, २१ मार्च-** विषुव दिन, श्री गौरी-शंकराचा दोलोत्सव, मन्वादि, श्रीराम दोलोत्सव, रमजान ईद, जागतिक वनीकरण दिन, मत्स्य जयंती, गौती तृतीया (तीज)

**मुहूर्तः-** ✲ **साखरपुडा-** १५, २०, २१ मार्च (१९ पर्यंत) ✲ **डोहाळ जेवण-** (मुहूर्त नाही.) ✲ **बारसे-** १५ मार्च (९ नंतर), २०, २१ मार्च (१९ पर्यंत) ✲ **जावळ-** १५ मार्च, २० मार्च ✲ **गृहप्रवेश-** १५, १९, २०, २१ मार्च.

### मेष :- शुभ फलदायी वाटचाल

सगळ्याच गोष्टींसाठी योग्य वेळ असते. तोपर्यंत थांबता आलं पाहिजे. शुक्र-गुरु केंद्र मंगळ गुरु त्रिकोण योग आपल्या मनासारखे सर्व घडविणार आहे. विचाराने व ठामपणाने केलेली वाटचाल आता शुभ फलदायी ठरेल. नवीन गुंतवणूक विचाराने करावी. उपजत कला-गुणांचा विकास होत जाईल. आर्थिक प्रगती मनासारखी होईल. चिंता नको. शुभ ता. १५, १९, २०

### वृषभः- सामंजस्याने रहावे

जी गोष्ट आपणास आव्हान देते, तीच गोष्ट आपल्यात बदल घडू शकते. धनस्थ गुरुचा कर्मस्थ मंगळाशी होणारा त्रिकोण योग आर्थिक प्रगती करणारा आहे. स्थावर मध्ये नवी गुंतवणूक करू शकाल. बँक, ज्ञानदान, अभियंत्रिकी अशा क्षेत्रात नव्या संधी लाभतील. नव्या विचारांना चालना मिळेल. योजलेली कामे मनासारखी होतील. सामंजस्याने रहावे. शुभ ता. १५, २०

### मिथुनः- प्रगतीचे मार्गक्रमण

स्वतःवर विश्वास प्रथम ठेवावा. जग जिंकण्याची ताकद सर्वात आधी आपल्या मनात निर्माण होत असते. राशीतील गुरुचा कर्मस्थ शुक्राशी होणारा केंद्रयोग आर्थिक बाबतीत शुभ फलदायी ठरेल. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. निश्चित रहावे. समाधानकारक घटना घडतील. शुभ ता. १९, २१

### कर्कः- नवे विचार साकार

आयुष्यात भेटणारा प्रत्येक व्यक्ती रंगासारखा असतो. कोणी रंग बदलतो, तर कोणी रंग भरत असतो. मंगळ- गुरुचा त्रिकोण योग सामाजिक कार्यात मनासारखे यश मिळवून देणारा आहे. कलागुणांचा विकास होईल. नवे विचार साकार करता येतील. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. अडचणीतून मार्ग निघत जाईल. फार चिंता करू नका. धार्मिक गोष्टीत पुढाकार घ्याल. शुभ ता. १५, २०

### सिंहः- संधी पुन्हा लाभतील

प्रत्येकाचे रंग निराळे असतात, कधी शहाणपणाचे, कधी वेडेपणाचे, कधी उत्साहाचे तर कधी नैराश्याचे. अष्टमातील शुक्राचा लाभातील गुरुशी होणारा केंद्रयोग आर्थिक बाबतीत आपणास सुदैवी बनवणारा आहे. हातून निसटलेल्या संधी पुन्हा लाभतील. नवे विचार मार्गी लागतील. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. भागीदारीच्या व्यवसायात समस्या संभवतात. शुभ ता. १६, १९

### कन्याः- अपेक्षित घटना

सकारात्मक विचार, चांगल्यांची संगत आपल्या जीवनात योग्य दिशा देते. मंगळ- गुरु त्रिकोण योग कार्यक्षेत्रात प्रगती करणारा आहे. शुक्र-गुरु केंद्रयोग कौटुंबिक जीवनात सुख समाधान मिळवून देईल. यांत्रिक क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. अपेक्षित कामे होतील. स्पर्धांमध्ये यश मिळेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. समाधान वाटेल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. १५, १९

### तुलाः- आर्थिक प्रगती

चांगल्या वर्तनात लाखो लोकांची मने जिंकण्याची ताकद असते. पंचमातील मंगळाचा भाग्यस्थ गुरुशी होणारा त्रिकोण योग आर्थिक प्रगती करणारा आहे. साहित्य, कला संस्कृतीसाठी योग्य कार्य घडेल. पोटाच्या तक्रारींची दखल घ्यावी. भाग्यवृध्दिंगत करणाऱ्या घटना घडतील. प्रशासन, यांत्रीक क्षेत्रात प्रगती घडेल. महत्त्वाची कामे मनासारखी होतील. शुभ ता. १५, १९

### वृश्चिकः- सौख्यदायी घटना

धर्म कोणताही असो, चांगला माणूस बनावे कारण हिशोब धर्माचा नाही तर कर्माचा होत असतो. राशी स्वामी मंगळाचा गुरुशी होणारा त्रिकोण योग स्थावर बाबतीत सौख्यदायी घटना घडविणार आहे. चिकाटीने केलेले मार्गक्रमण शुभ फलदायी ठरेल. जुने येणे वसूल करून घ्या. कलागुणांचा विकास होत जाईल. फार दगदग करू नका. शुभ ता. १६, २०

### धनुः- वास्तुदोष दूर करावा

जगातील सर्वात मोठी स्पर्धा ही स्वतःला सिद्ध करण्यासाठी असावी. दुसऱ्यांना हरविण्यासाठी नाही. सुखस्थ शुक्राचा राशी स्वामी गुरुशी होणारा केंद्रयोग सौख्यदायी घटना घडविणारा आहे. अंगीकृत कार्यात म नासारखी प्रगती साधता येईल. अडचणीतून वेळीच मार्ग निघत जाईल. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. वास्तुदोष दूर करावा. शुभ ता. १५, २०

### मकरः- सुसंधी लाभतील

आपल्यासाठी जे योग्य आहे, तेच देव देत असतो. कधीही देवावर नाराज होऊ नये. शुक्र- गुरु केंद्र मंगळ- गुरु त्रिकोण योग आर्थिक बाबतीत शुभ फलदायी ठरेल. अनावश्यक खर्च कसोशीने टाळावा. अंगीकृत कार्यात मनासारखी प्रगती होत जाईल. आर्थिक व्यवहार विचाराने करावेत. उत्साहवर्धक घटना घडतील. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. १६, १९

### कुंभः- अडचणींची शक्यता

कोणी लाज, कोणी संस्कार, कोणी धर्म, कोणी माणुसकी विसरले मग कलीयुग आणले कोणी? राशीतील मंगळ, राहु मुळे आपले विचार भरकटणार नाहीत याची प्राधान्याने दखल घ्यावी. अडचणीत येण्याची शक्यता आहे. शुक्र-गुरु केंद्रयोग आर्थिक बाबतीत अनुकूल राहील. शारीरिक तक्रारींकडे दुर्लक्ष होऊ देऊ नका. अनावश्यक खर्च कसोशीने टाळावेत. शुभ ता. १५, २०

### मीनः- जामीन कोणास राहू नका


आपले काही विचार दुसऱ्यांना पटले नाही तरी विचार करायला लावतात, हे मात्र नक्की. राशीतील शुक्राचा बुधवारी राशी स्वामी गुरुशी होणारा केंद्रयोग सौख्यदायी घटना घडविणार आहे. अनुभवाच्या आधारे कठीण प्रसंगी योग्य ते निर्णय घ्यावेत. जामीन कोणास राहू नका. समस्या संभवतात. राशीतील रवि, शनी विचाराने मार्गक्रमण करावयास लावतील. फार चिंता करू नका. शुभ ता. १५, १९

!! शुभ भवतु !!

दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर

# जंगली जयगड



सुजलाम् सुफलाम् महाराष्ट्र राज्याच्या संपन्नतेत मोलाचा वाटा असलेल्या कोयना नदीने आपल्या कुशीत एक देखणे खोरे निर्माण केले आहे. हेळवाकच्या जवळ जेव्हा कोयना धरण बांधले तेव्हा सह्याद्रीची मुख्य रांग आणि वनकुसवडे पठार यांच्यामधील भौगोलिक परिस्थितीचा खूप फायदा झाला. सह्याद्रीतील कडीण बेसॉल्ट दगड पोखरून वीज निर्मिती प्रकल्प उभारले गेले. या भागातील विकास कामांना गती मिळाली. कराडवरून चिपळूणला जाताना कोयनानगर मार्गाने गेलो तर कुंभार्ली घाट लागतो आणि दुसरा मार्ग नवजा गावाच्या जवळून पंचधारा बोगद्यातून उतरतो. नवजा हेच जंगली जयगडच्या पायथ्याचे गाव आहे. सातारा जिल्ह्यातील कोयनानगरपासून साधारण १०-११ किलोमीटर अंतरावर नवजा गाव असून आपल्याला जंगली जयगडला जायचे असल्यास पायथ्याचे नवजा गाव गाठावे. गावातून पाच किलोमीटरवर किल्ल्यावर जाण्यास फाटा आहे. किल्ल्यावर जायचे असल्यास कोयनानगर वनखात्याकडून परवानगी घ्यावी लागते. घनदाट जंगलातील वाटेवर परिसरातील जाणता व्यक्ती सोबत असेल तर वाट चुकण्याचा धोका टाळता येतो. वन विभागाची चौकी ओलांडल्यावर डाव्या हाताचा एक रस्ता डोंगरावर चढतो. वाट गर्द झाडीतून असल्याने सावधगिरीने प्रत्येक पाऊल टाकावे. घनदाट जंगलात वन्यप्राणी दिसण्याची शक्यता असते, त्यांच्या अस्तित्वाच्या काही खुणाही आपल्याला चालताना दिसतात.

जंगलाची समृद्धी अनुभवत वर चढत गेलो की आपण घोडेतळ येथे पोहोचतो. जंगली जयगड इंग्रजांच्या ताब्यात असताना इंग्रज अधिकारी येथे घोडे ठेवून पुढे गडावर चालत जात असत, म्हणून या जागेला घोडेतळ नाव पडले. या ठिकाणी जिवंत पाण्याचा झरा आहे आणि वन विभागाने विश्रांती घेण्यासाठी एक कट्टा बांधला आहे. नवजा गावातून घोडेतळपर्यंत येण्यास दोनअडीच तास लागतात. येथून पुढे पायवाटेने समोर चालत गेल्यावर मूळ वाटेला फाटा फुटला की डावीकडे वळायचे. घनदाट जंगलातून चालत आपण गोलाकार बुरूज बांधलेल्या माथ्यावर पोहोचतो. बुरुजावर चढण्यासाठी पायऱ्या आहेत. पायऱ्याने चढून बुरुजावर गेलात की, खालील दरीचे विलोभनीय दृश्य दिसते. येथून थोडे खाली उतरत गेलो की, सह्याद्रीच्या मुख्य रांगेपासून विलग झालेल्या डोंगरावर वसलेल्या जंगली जयगडचे दर्शन होते. हा डोंगर विलग झाला असला, तरी एका चिंचोळ्या धारेने सह्याद्रीशी जोडलेला आहे. गडाचे प्रवेशद्वार सुस्थितीत नाही. आजूबाजूला बांधकामाचे दगड विखुरलेले आहेत. गडाच्या दिशेने जाताना दोन छोटे कातळसुळके दिसतात. या सुळक्यांना स्थानिक मंडळी 'दीपमाळ' म्हणतात. किल्ला चिंचोळ्या आकाराचा असून एका बाजूच्या तटबंदीचे अवशेष अजून शिल्लक आहेत. किल्ल्याच्या उर्वरित तिन्ही बाजूला दरीत कोसळणारे सरळसोट कडे आहेत. त्यामुळे सुरक्षा वाढविण्यास तटबंदीची गरजच भासली नसावी. येथे पोहोचल्यावर एक छोटेसे मंदिर, दीपमाळ, दगडी भांडे आणि दगडी चौथरा दिसतो. गडाची देवता असलेल्या ठाणाई देवीचे हे ठिकाण आहे. येथे मूर्ती मात्र नाही. किल्लेदाराच्या वाड्याचे अवशेष म्हणजेच चौथरा फक्त आता शिल्लक आहे. टेहळणीसाठी बांधलेला दगडी बुरूज आहे. वाड्याच्या मागे एक विहीर आहे; मात्र पूर्णपणे बुजली आहे. गडाच्या पश्चिम टोकावरून कोळकेवाडी जलाशय, कोळकेवाडी दुर्ग, पोफळी घाट, पोफळी लाईट हाऊस आणि तळकोकणचे अप्रतिम दृश्य दिसते. गडावरून वासोटा, मकरंदगड, महिमंडणगड, रसाळ, सुमार, महिपत हे दुर्ग नीट दिसतात. कुंभार्ली घाटावर नजर ठेवण्यासाठी जंगली जयगडची निर्मिती करण्यात आली. गड स्वराज्यात असताना हेळवाक हे या भागातील मुख्य बाजारपेठेचे ठिकाण होते. नंतर पेशवे काळात सरदार खंडोजी मानकर यांनी पंतप्रतिनिधी यांचेकडून किल्ला घेतला; मात्र पुन्हा ताबा पंतप्रतिनिधी यांच्याकडे सोपविण्यात आला. पुढे ताई तेलीन यांच्या ताब्यात असलेला हा किल्ला पेशव्यांचे सेनापती बापू गोखले यांनी जिंकून घेतला. १८१८ मध्ये जंगली जयगड इंग्रजांच्या ताब्यात गेला. त्यानंतर दुर्गम जागी वसलेल्या या किल्ल्याकडे दुर्लक्ष झाले. किल्ल्याला आसपासच्या घनदाट जंगलाने अधिकच दुर्गम केले आहे. कोयना धरणाच्या मागील विशाल शिवसागर जलाशयाच्या सभोवताली पसरलेले कोयना अभयारण्य महाराष्ट्राची वनसंपत्ती आहे. १९८५ मधे अभयारण्य घोषित झालेले हे जंगल महाराष्ट्रातील सर्वात घनदाट जंगलांपैकी एक आहे. या जंगलाला शिवसागर जलाशयामुळे नैसर्गिक संरक्षण लाभले आहे. जलाशयाच्या पश्चिमेकडे अभयारण्याचा मोठा आणि घनदाट भाग आहे. कोयना नगर ते महाबळेश्वरजवळील तापोळापर्यंतचा परिसर अभयारण्यात समाविष्ट असून मेट इंदवली, वासोटा आणि महारखोरे अशा तीन भागात विभागले गेले आहे. तापोळा, म्हाळुंग, वाचावळे, कुसापूर, इंदवली, बलवण, मोरवी, कुसवळी, सिंधी आणि कंदांटकी खोरे अशी १० गावे यात समाविष्ट आहेत. सह्याद्रीची मुख्य डोंगररांग आणि उपरांग यांच्यामधून कोयना नदी वाहते. मुख्य रांगेचा उतार कोयनेच्या बाजूला सौम्य आहे. पश्चिमेकडे ९० अंशाचा महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाचा उंच 'बाबू कडा' आहे आणि दुसऱ्या बाजूला कोयना अभयारण्यातील सर्वात उंच वासोटा किल्ला आहे. सोळशी आणि कांदाटी या कोयनेच्या उपनद्या याच जंगलातून वाहतात. विपुल प्रमाणात पाणी असल्याने हे सदाहरित जंगल आहे. येथे बऱ्याच दुर्मिळ वनस्पती आढळतात. अंजनी, कडुनिंब, उंबर, जांभूळ, हिरडा, आवळा, आंबा, शिकेकाई, करवंद, धायटी, मुरुडशेंग, गारंबी अशा वृक्षसंपदेने हे जंगल नटलेले आहे. कोयना अभयारण्यात शेकरू हा महाराष्ट्राचा राज्यप्राणी आढळतो. याला स्थानिक मंडळी 'राक्षसी खारी' असेही म्हणतात. बिबट्या, अस्वल, वाघ देखील या जंगलात आहेत. त्यामुळे या परिसरात फिरताना काळजी घेणे आवश्यक आहे. कोयना प्रकल्पामुळे महाराष्ट्राचा खूप फायदा झाला. महाराष्ट्रातील हा परिसर भूकंपप्रवण क्षेत्र असल्याने येथे सतत भूकंपाचे झटके बसतात. त्यामुळे कोयना प्रकल्पात बांधली गेलेली वीजगृहे, इमारती आणि यंत्रे भूकंपाच्या धक्क्याचा अभ्यास करून तशीच बसविली आहेत. महाराष्ट्रातील पाण्याची आणि विजेची गरज भागविणारी कोयना महाबळेश्वरच्या दक्षिणेकडील वशिंडा पर्वतात उगम पावते. कोयना नदीमुळे परिसरातील हजारो हेक्टर भूमी सिंचनाखाली आली आणि राज्याची मोठ्या प्रमाणात विजेची गरज पूर्ण झाली. सातारा जिल्ह्यातील जावळी, पाटण परिसरात असलेले कोयनेचे खोरे निसर्गरम्य आणि जैवविविधतेने नटलेले आहे. या परिसरातील गिरीदुर्ग अत्यंत दुर्गम आणि वैशिष्ट्यपूर्ण असे आहेत. महाराष्ट्राच्या विकासात मोलाची भूमिका असलेल्या कोयना नदीचे आणि प्रकल्पाचे वर्णन कवी यशवंत यांनी केले आहे. 'तुडुंबली ही इथे कोयना, विशाल जणू मांडिला आयना डोकावुनि हो यात पहा ना, भवितव्य महाराष्ट्राचे या इथे निरखुनि घ्याया, आनंदवनभुवनी या.'

पान २ वरून

## जजमेंटल

काही महिन्यांनंतर एके दिवशी सकाळी मी सायकलिंग करून आल्यावर चहा घेत बसलो असताना अचानक तो अदृश्य झालेला मुलगा माझ्यासमोर हजर झाला आणि कार स्वच्छ करण्यासाठी त्याने मला चावी मागितली. दोन मिनिटे मला काय बोलावे ते कळलेच नाही. अचानक माझ्या मनातला राग उफाळून आला. मी त्याला त्याच्या बेशिस्त वर्तनाबद्दल चांगलेच खडसावले व माझे पैसे बुडवल्याबद्दलदेखील उल्लेख केला. त्यानंतर त्याने जे सांगितले त्यानंतर काय बोलावे ते सुचेना व जुने अनुभव असले, तरीही त्यांच्या भरवशावर जजमेंटल होणे खरोखरीच चुकीचे असते, हे मला पटून गेले. त्याने मला थोडक्यात असे सांगितले... ''सर, मला माफ करा. मी मोठी चूक केली. मला साधारण तीन महिन्यापूर्वी मुंबईला एका सीएनसी मशीनबाबतच्या प्रशिक्षणाचा कॉल आला. मला फोन आला आणि दुसऱ्याच दिवशी सकाळी रुजू व्हायचे होते. मी केवळ तीन तासात तयारी करून मुंबईला गेलो. मला नवा फोन घेण्यासाठी पैसे नव्हते. रोज १० तास प्रशिक्षण होते त्यामुळे मला काहीही करता येत नव्हते. मला कळत होते की, आपल्याप्रमाणे मी ज्यांच्या ज्यांच्या घरी कार स्वच्छ करायला जातो त्यांची किती अडचण झाली असणार. पण सर मी काहीच करू शकलो नाही. आल्यावर त्वरित माझ्या सर्व ग्राहकांकडे जाऊन त्यांची माफी मागून काम सुरू करण्याचा प्रयत्न करतोय. मला माफ करा.'' मला काय बोलावे ते सुचले नाही. त्याच्या हातात कार स्वच्छ करण्यासाठी चावी दिली आणि स्वतःला बजावले, कधीही जजमेंटल होऊ नये. वयाच्या ५४ व्या वर्षी एक चांगला धडा मिळाला. खरेच आहे, शिकण्याची तयारी असेल तर जीवन कोणत्याही वयात चांगले धडे देते.

पान २ वरून

## समावर्तन

म्हणजेच विद्यार्जन संपवून स्वगृही परत येणे. या प्रसंगी ब्रह्मचर्यव्रताची विधिवत सांगता करून त्यातून निवृत्ती घेण्यात येते. हा संस्कार गुरुगृही करायचा असतो. याप्रसंगी गुरूंच्या छत्रछायेत आलेला बटू एव्हाना शरीरानं काटक-सुदृढ, मेधेनं कुशाग्र असा तेजस्वी युवक झालेला असतो. मुहूर्ताच्या दिवशी स्नातक होणाऱ्या बटूनं सकाळी आन्हिकानंतर पुण्याहवाचन आणि प्रधानहोम करावा. त्यानंतर न्हाव्याकडून डोक्यावरील शेंडी वगळता, सर्व केस काढून पुन्हा स्नान करावं. त्यानंतर काही सूत्रग्रंथात सांगितल्याप्रमाणे स्वतः गुरू एक घागरभर पाण्यानं शिष्यावर अभिषेक करतो. 'माझ्याजवळ असलेली सगळी विद्या मी तुला दिली; नव्हे तुला नखशिखांत त्यात भिजवून टाकलं' या अर्थानं ही कृती करण्यात येते. उपनयनाच्या वेळी घातलेल्या एका यज्ञोपवीतात आणखी एकायज्ञोपवीताची समंत्रक भर घालून त्याला अंगावर धारण करायला दोन नवीन वस्त्रं देतात. त्याच्या डोळ्यांमध्ये काजळ आणि कानांमध्ये कुंडलंघातली जातात. कपाळी मुंडावळ्या आणि गळ्यात किमान एखादा सोन्याचा मणी असलेला हार, हातात छत्री व वंश दंड, डोक्यावर पागोटं व पायात चपला घालून तो घरी जाण्यासाठी सज्ज होतो. हा सगळा खर्च गुरू करतात. शेवटी गुरू त्याला उपदेश करतात. त्यानंतर शिष्याचं लग्न होईपर्यंत तो स्नातक म्हणवल्या जातो. स्नातकानं गुरूंना दक्षिणा देऊन गुरुपत्नीसह त्यांना दंडवत प्रणाम करावा आणि परतीचा प्रवास सुरू करावा.

पान ४ वरून

## मॅरेज की पॅकेज

शक्षण कमी, पण वृत्तीने सदाचारी आणि निर्व्यसनी. पण आज हा विचार रुचणारा नाही. कारण नव्या पिढीला हॉटेलिंग, लाँग ड्राईव्ह, पार्टी कल्चर, कार-बंगला, आधुनिक केशभूषा आणि वेशभूषा यांचे जब्बर आकर्षण आहे. पण जीवनाच्या चाकोरीशी त्याचा संबंध काय?'' ''चाकोरी म्हणजे काय, काका?'' ''शिक्षण, नोकरी किंवा व्यवसाय, विवाह आणि संतती या चार गोष्टी मिळून चाकोरी तयार होते. ही चाकोरी अंदाजे ३५ वर्षेपावेतो पूर्ण व्हायला हवी. पण आताशा जॉब कल्चर आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांचे अतिरेकी विचार जीवनाच्या या एकूणच आनंदावर मात करताना दिसत आहेत.'' विचारमग्न नेहाने मान डोलावली. ''तिसरे उदाहरण तुमच्या पिढीची रिना. माझ्या मित्राची मुलगी. ती उच्च शिक्षणासाठी विदेशात गेली. आता चाळिशीला आली. पण संसाराची कटकट नको म्हणून लग्नाचा निर्णय घेत नाही. नेहा कान देऊन ऐकत होती. घरी जाताना मनात काहीतरी निश्चय करूनच गेली. लवकरच तिचा विवाह आयटी इंजिनीअरशी झाला. त्याचे पॅकेज थोडे कमी असले, तरी स्थळ लाखात एक होते. मनोहरराव आता समाधानी दिसत होते. कारण ते आता आजोबा झाले होते. त्यांची लाडकी कन्या तिच्या संसारात रमली होती. त्या दिवशी अवचित एका बुफे पार्टीत मनोहरराव आणि गोविंदराव यांची गाठभेट झाली. ''काय म्हणतेय नेहा, कशी आहे?'' गोविंदराव मनोहररावांचा खांदा घुसळीत म्हणाले, ''अगदी मजेत.. आणि हो मी पुन्हा आजोबा झालोय. आणखी एक गुड न्यूज ऐका, आमच्या जावयांनी स्वीच-ओव्हर केलंय. त्यांना उच्च शिक्षण आणि अनुभवाच्या जोरावर नामवंत कंपनीत थेट वरिष्ठ प्रबंधक म्हणून अल्पावधीतच म्हणजे लग्नानंतर केवळ सहा महिन्यातच नेमणूक झाली. आता त्यांचे पॅकेज नेहापेक्षा बरेच जास्त आहे बरं का!'' ''छान छान. म्हणजे स्वत:पेक्षा जास्त पॅकेजवाला नवरा हवाय, ही नेहाची इच्छा पूर्ण झाली म्हणायची!'' ''होय तर, पण गोविंदराव फुल क्रेडिट गोज टू यू ओन्ली. कारण तुमच्या समुपदेशनामुळे तिचं ब्रेन वॉशिंग झालं.'' '

पान ५ वरून

## गोष्ट 'पंच'ची!

पंचच्या आयुष्याची सुरुवात एकाकी झाली असली तरी लहानपणी त्याला पुरेसे शिक्षण मिळते आहे का, हे पाहणे महत्त्वाचे आहे. हॅरी हार्लो आणि डॉ. मेवा सिंग यांच्यासारख्या संशोधकांच्या अभ्यासातून एक गोष्ट स्पष्ट झाली आहे.

लहान माकडांचे खरे नुकसान कळपाचा भाग नसल्यामुळे होते. हार्लो यांच्या प्रयोगात पूर्णपणे एकटी ठेवली गेलेली माकडे पुढे इतर माकडांसोबत नीट वागू शकली नाहीत, कारण त्यांना आपल्या कळपात कसे वागायचे हे शिकायलाच मिळाले नव्हते. पंच इतर माकडांना पाहत असेल, त्यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करत असेल, चुकले तर दटावला जात असेल, कधी कधी दूर लोटला जात असेल तरी तो अजूनही शिकतोय, वाढतोय. इतर माकडांप्रमाणेच त्याला लहानपणी माकडांच्या कळपात राहूनच हे सामाजिक शिक्षण मिळणे गरजेचे आहे. स्वत:ची साफसफाई करायची, काय खायचे, कळपातील मोठा कोण आहे हे कसे ओळखायचे कधी दूर जायचे हे धडे त्याला माणसांकडून, म्हणजेच प्राणिसंग्रहालयातील कर्मचाऱ्यांकडून मिळणार नाही, तर इतर माकडांकडून मिळेल आणि हेच इतर जंगली प्राण्यांनाही लागू होते. म्हणूनच सामाजिक आयुष्यापासून दूर ठेवले जाणे हेच पंचचे खरे नुकसान आहे.

पान ५ वरून

## विभूतियोग जे जे उत्तम, उदात्त उन्नत

अकार-काल-नीती-धृति-क्षमा... यातून विश्वाच्या संचालक तत्त्वाचा बोध सूचित होतो आणि शेवटी उपसंहार म्हणून हे म्हणजे माझा एक अंश म्हणत सूची थांबते. हा अध्याय वर्तुळाकृतीत फिरतो.

**सर्वोपनिषदो गावो:** गीता ही सर्व उपनिषद रुपी कामधेनूंचे दूध आहे. दोग्धा कोण तर प्रत्यक्ष गोपालनंदन. त्यामुळे विभूतियोग हा त्या उपनिषदातील सूत्रांचा काव्यमय विस्तार आहे. तो छांदोग्यातील 'सर्वं खल्विदं ब्रह्म' हे सूत्र विश्वाच्या तेजस्वी घटकातील ब्रह्मतत्व सांगते. ईशावास्यातील सर्व काही ईश्वराच्छादितईश्वराधीन हेही लक्षात येते. विभूतियोगातील 'काल अस्मि:' हा उल्लेख निर्णायक आहे.

**सांख्यिकी गूढ :** व्यासांनी सुरुवातीलाच गणपतीला सांगितले की, माझ्या रचनेतील गूढार्थ समजल्याशिवाय पुढचे काही लिहावयाचे नाहीस. त्यानुसार हा अध्याय १० वा असणे यातही एक गूढ आहे. भारतीय परंपरेत १० म्हणजे परिपूर्णता. ही १ आणि ० ची अस्ति-नास्तिची संगणकीय कूट भाषा आहे. एकातून अनंताकडे नेणारा प्रवास आहे. विभूतींची ही मांडणी विश्वकोषासारखी आहे. यात सृष्टिचक्राचे सुव्यवस्थित वर्गीकरण आहे. चिकित्सक दृष्टीला त्यात त्रिगुणांचा संदर्भ दिसतो. सत्वप्रधान म्हणून ज्ञान-तप-जप, यज्ञ-गंगा. रजोदर्शक म्हणून इंद्र-वज्र-कामदेव. तम प्रधान म्हणून मृत्यू आणि शेवटी कृष्णाचा उच्चार-त्रिगुणात्मक प्रकृतीच्या अलिकडील-पलीकडील अधिष्ठानही मीच. यावर जितके चिंतन करावे तितके हे अथांग भासते.

# मध्यपूर्वेतले युद्ध आणि जागतिक अशांततेचे मूळ



**सध्या जगभरात सामरिक अस्थिरतेचे वातावरण तयार झाले आहे. या अस्थिर वातावरणामुळे जगात अणुयुद्ध सुरू होते की काय, अशी साधार भीती व्यक्त केली जात आहे. सामरिक विषयाचा गंध नसलेली मंडळी या सर्व घटनांचे खापर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या डोक्यावर फोडताना दिसतात; मात्र या जागतिक अशांततेचे मूळ अमेरिकेच्या आर्थिक पेचप्रसंगात आणि युद्धामुळे मिळणाऱ्या नफ्यात शोधावे लागेल.**

वेधक

**भागवत सोनावणे**

फेब्रुवारी २०२६ च्या शेवटच्या आठवड्यात अमेरिका आणि इस्रायलने इराणवर पुन्हा मोठ्या प्रमाणावर हवाई हल्ले सुरू केले. खरे तर इराण आणि अमेरिकेमध्ये याच सुमारास इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमाबद्दल वाटाघाटी सुरू होत्या आणि दोन्ही देशां ध्ये समझोता होणार अशा वावड्याही पसरवण्यात आल्या होत्या. मात्र लगतच झालेल्या हवाई हल्ल्यामुळे हे स्पष्ट होते की, अमेरिकेने हे वाटाघाटींचे मृगजळ इराणला बेसावध ठेवण्यासाठी वापरले होते. काही महिन्यांपूर्वी पाकिस्तान आणि सौदी अरेबियात संरक्षण करार झाला तेव्हाच आंतरराष्ट्रीय राजकारणाची जाण असलेल्या अनेकांच्या मनात संशयाची पाल चुकचुकली होती. म्हणूनच सौदी अरेबियाला अमेरिका आणि इस्रायलच्या या हल्ल्याची पूर्वसूचना होती, असे वाटते. अशा प्रकारे इराणवर मोठा हल्ला झाल्यास इराण मध्यपूर्वेतल्या अमेरिकेच्या मित्रराष्ट्रांवर हल्ले करणार हे गृहीतच होते.

ताज्या घडामोडींमुळे ते सिद्धही झाले. अशा प्रकारे इराणवर अमेरिका आणि इस्रायलच्या हल्ल्याची पृष्ठभूमी गेल्या सहा महिन्यांपासूनच तयार केली गेली. या युद्धामुळे जगभरात शिया विरुद्ध सुन्नी ही फाळणी अधोरेखित झाली आहे. भारत आणि पाकिस्तान वगळता जगभरात फक्त शियाधर्मीय देश इराणच्या समर्थनार्थ उतरले आहेत, तर बहुतांश इस्लामिक देश जे सुन्नीपंथीय बहुसंख्य आहेत, ते अमेरिकेच्या बाजूने उभे ठाकलेले दिसतात. या युद्धात अमेरिका आणि इस्रायल आक्रमक असले, तरी बराचसा दोष इराणच्या अतिरेकी परराष्ट्र धोरणाला देता येतो. १९७९ च्या इस्लामिक क्रांतीनंतर इराणने आर्थिक आणि भौतिक प्रगतीकडे लक्ष केंद्रित करण्याऐवजी आपली इस्लामिक क्रांती एक्स्पोर्ट करण्याचे धोरण अवलंबिले. इस्लामिक जगताच्या नेतृत्वावर दावा ठोकला आणि त्याचाच एक भाग म्हणून इस्रायलविरुद्ध संघर्षात उडी घेतली. पॅलेस्टिन प्रश्नाचा इराणच्या सामरिक हिताशी काहीही संबंध नसताना इराणने इस्रायलच्या अस्तित्वालाच आव्हान दिले. परिणामस्वरूप इराण हे इस्रायल आणि अमेरिकेचे लक्ष्य बनले.

बहुतांशी इस्लामिक देश सुन्नीपंथीय आहेत आणि त्यांना इराणसारख्या शियापंथीय देशाचे नेतृत्व कधीही मान्य होणार नाही, ही अक्कल इराणच्या अयातुल्ला खामेनेई यांना कधीच आली नाही. म्हणूनच आज अमेरिका, इस्रायल आणि अरब देशांचे शत्रुत्व इराणने ओढवून घेतले आहे. हे युद्ध चार-पाच आठवडे चालेल, असे अमेरिकेच्या अध्यक्षांनी म्हटले आहे. तसे झाल्यास जगाचा तेलपुरवठा थांबल्यामुळे संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेचा डोलारा डळमळणार आहे. या आगीची झळ अमेरिकेलाही बसल्याशिवाय राहणार नाही. इराणला प्रत्यक्ष अमेरिकेवर हल्ले करता येत नसला, तरी अमेरिकेच्या नौदलावर आणि आपल्या आसपासच्या अमेरिकेच्या मित्रदेशांवर इराण नक्कीच हल्ले करू शकतो. युद्धाची उद्दिष्टे स्पष्ट आणि सीमित ठेवणे अत्यंत गरजेचे असते. तसे न केल्यास युद्ध जिंकले; पण शांतता हरले, अशी स्थिती येऊ शकते. यासंदर्भात भारताने 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान परिपक्व रणनीतीचा परिचय दिला. 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे पाकिस्तानविरुद्ध सीमित लक्ष्य साध्य झाल्यानंतर भारताने लगेचच युद्ध थांबवले. आपल्याच देशातले काही वाचाळवीर या युद्धादरम्यान भारताने पाक अधिकृत काश्मीर का घेतले नाही किंवा युद्ध आणखी का सुरू ठेवले नाही, असे प्रश्न विचारले. याला उत्तर एकच- अशा प्रकारे अनियंत्रित युद्ध झाल्यास अर्थव्यवस्थेला झळ बसते. आज भारत आणि पाकिस्तानने 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान हे तारतम्य दाखवले.

मध्यपूर्वेच्या लढ्यात अमेरिका, इस्रायल आणि इराण असा समजूतदारपणा दाखवतात की नाही, यावर जागतिक अर्थव्यवस्थेचे भवितव्य टिकलेले आहे. मध्यपूर्वेत मोठ्या प्रमाणावर हिंसाचार सुरू असतानाच पाकिस्तान आणि अफगाणिस्तानचे एकमेकांवर हल्ले सुरू झाले आहेत. पख्तुनिस्तान प्रांत पाकिस्तानचा असायला अफगाणिस्तानचा कायम विरोध राहिला आहे. दोन्ही देशां धील ड्युरँड लाईनची सीमा अफगाणिस्तानला कधीच मान्य नव्हती. या सर्व घटनाक्रमामध्ये भरीस भर म्हणजे इम्रान खान या पठाण प्रधानमंत्र्याला पाकिस्तानी सैन्याने तुरुंगात डांबून ठेवले आहे. इम्रान खानचा पक्ष निवडणुका जिंकला असताना- ही बहुसंख्य पंजाबी पाकिस्तानी सैन्याने ही खेळी खेळली आहे.

आज पाकिस्तान बलुचिस्तानामध्ये फुटिरतावाद्यांचा सामना करीत आहे. त्याच वेळी अफगाणिस्तानबरोबर दुसरी आघाडी उघडून पाकिस्तानने आपले भवितव्य धोक्यात घातले आहे. यातून १९७१ प्रमाणे आताही पाकिस्तानची शकले होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आज जगभरात सामरिक अस्थिरतेचे वातावरण तयार झाले आहे. युरोपमध्ये रशिया आणि युक्रेन यांच्यातले युद्ध गेली चार वर्षे सुरू आहे. मध्यपूर्वेत गाझा पट्टीवर इस्रायलचे हल्ले, लेबनॉनवर हल्ले, सीरियामध्ये अंतर्गत संघर्ष पाहायला मिळत आहे. त्यात भरीस भर म्हणून इराणवर अमेरिका, इस्रायलने हल्ला केला आहे. या सर्व जागतिक घटनां ुळे आज जगात अणुयुद्ध सुरू होते की काय, अशी साधार भीती व्यक्त केली जात आहे. १९४५ मध्ये दुसरे महायुद्ध संपले, परंतु त्यानंतर सुमारे ४५ ते ५० वर्षे जगात शीतयुद्ध सुरू होते.

समाजवादाचा पुरस्कार करणारा सोव्हिएत रशिया आणि त्याचे मित्रदेश एका बाजूला तर व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणारा अमेरिका आणि त्याचे मित्रदेश दुसऱ्या बाजूला, अशी विभागणी झाली होती. त्यावेळी आणखी एक वेगळा गटही अस्तित्वात आला होता. भारत, इजिप्त आणि इंडोनेशियासारख्या त्या काळी नुकत्याच स्वतंत्र झालेल्या देशांनी एकत्र येऊन अलिप्त राष्ट्रांचा एक तिसरा गट निर्माण केला होता. अशा प्रकारे १९९० च्या दशकापर्यंत जग या तीन मुख्य गटांमध्ये विभागले होते. भांडवलशाही देश आणि समाजवादाचे पुरस्कर्ते देश यांच्यात एक प्रकारे सत्तासंतुलन होते. सामरिक क्षेत्राचाच विचार करायचा झाला, तर अखंडित सोव्हिएत संघ लष्करीदृष्ट्या निदान युरोप खंडामध्ये तरी अमेरिकेचा तुल्यबळ होता. अर्थातच प्रबळ नौसेनेमुळे अमेरिका सागरी सत्तेच्या क्षेत्रात सोव्हिएत संघाच्या खूप पुढे होता. अमेरिकेचे नाविक सामर्थ्य इतके प्रचंड होते आणि आहे की, जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात आपले लष्करी बळ वापरण्याची क्षमता अमेरिकेमध्ये आहे. तसे ते इतर कोणत्याही देशाकडे नाही. नाविक सामर्थ्यात सोव्हिएत संघ अमेरिकेच्या मानाने कमी सामर्थ्यवान असला, तरी सामरिक दृष्टीने महत्त्वाच्या युरोप खंडामध्ये सोव्हिएत सैन्य अमेरिका आणि पाश्चिमात्य जगाला वरचढ होते. त्यात भरीस भर म्हणजे अण्वस्त्रांच्या क्षेत्रात सोव्हिएत संघ अमेरिकेच्या तोडीस तोड होता. सामरिक सामर्थ्याच्या आणि एकूण प्रगतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या अंतराळ संशोधन क्षेत्रातही अमेरिका आणि सोव्हिएत संघ यांच्यात स्पर्धा सुरू झाली होती.

१९९०-९२ या कालावधीत सोव्हिएत संघाचे विघटन झाले. त्यातून जन्माला आलेला रशिया अमेरिकेपुढे दुबळा देश ठरला आणि तोपर्यंत जगात असलेले सत्तासंतुलन बिघडले. या परिस्थितीचा फायदा घेत अमेरिकेने जगभर आपल्या हितानुसार जागतिक स्तरावर छोट्या छोट्या देशांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. शीतयुद्ध संपल्यानंतरच्या काळात मध्यपूर्वे ध्ये इराकवर हल्ला करून अमेरिकेने त्या देशाची तेलसंपदा आपल्या कह्यात केली.

या हल्ल्यापूर्वी अमेरिकेने इराकचे त्या वेळचे सर्वेसर्वा सद्दाम हुसेन यांनी मोठ्या प्रमाणावर संहार करू शकतील अशा शस्त्रास्त्रांचा साठा करून ठेवल्याची आवई उठवली. जगाच्या भल्यासाठी ती नष्ट करण्याची नैतिक (?) जबाबदारी घेऊन सद्दाम हुसेन यांची सत्ता उलटवून टाकली आणि नंतर त्यांना फाशी देण्यात आले. शेवटपर्यंत ही शस्त्रास्त्रे सापडली नाहीत, ही बाब वेगळी. कमजोर झालेला रशिया मध्यपूर्वे तल्या अमेरिकन अश्वमेधाला थांबवू शकला नाही. चार वर्षांपूर्वी युक्रेनमधल्या अमेरिकेच्या घुसखोरीला थांबण्यासाठी रशियाने युक्रेनवर हल्ला केला. चार वर्षे होऊनही रशिया हे युद्ध जिंकू शकलेला नाही. त्यामुळेच आज अमेरिकेची जगभर निरंकुश लष्करी सत्ता असून सामना करण्यासाठी दुसरी शक्ती नाही. लष्करी आणि सामरिकदृष्ट्या हा महत्त्वाचा बदल होत असताना शीतयुद्धाच्या काळात अमेरिका आणि चीनमध्ये मैत्री निर्माण झाली. सोव्हिएत संघाला नेस्तनाबूत करण्यासाठी अमेरिकेने चीनचा वापर केला. चीन आणि अमेरिकेच्या मैत्रीच्या कालखंडात अमेरिकन तंत्रज्ञान आणि भांडवलाचा ओघ चीनकडे वळला होता. परिणामी २१ व्या शतकाच्या सुरुवातीला चीन आर्थिक महाशक्ती म्हणून उदयास आला. आज परिस्थिती अशी आहे की, आर्थिक क्षेत्रात चीन अमेरिकेच्या खूप पुढे निघून गेला आहे. कालांतराने या आर्थिक शक्तीचे रूपांतर लष्करी सामर्थ्याच्या स्वरूपात होऊ शकेल, याची चिंता अमेरिकेला आहे. अमेरिका आज आर्थिकदृष्ट्या सर्वात मोठा कर्जबाजारी देश बनला आहे. केवळ डॉलर हे आंतरराष्ट्रीय चलन असल्यामुळे अमेरिकेच्या नागरिकांचे उच्च राहणीमान शाबूत आहे. सध्याच्या आर्थिक पेचप्रसंगातून वाट काढण्यासाठी अमेरिका लष्करी बळाचा आणि जगभरातल्या युद्धांचा फायदा करून घेत आहे. अगदी युक्रेनच्या युद्धातूनही अमेरिकेच्या शस्त्रव्यापाराला अफाट नफा कमवता येत आहे. म्हणजेच आजच्या जागतिक अशांततेचे मूळ अमेरिकेच्या आर्थिक पेचप्रसंगात आणि युद्धामुळे मिळणाऱ्या नफ्यात शोधावे लागेल.

# पाणी : उत्पत्ती आणि विश्वातील संभाव्य स्थान

वेध

**डॉ. मधुकर आपटे**

मानव आणि इतर सर्व जीवित सृष्टीसाठी पाणी हा एक अतिशय आवश्यक पदार्थ आहे. म्हणूनच पाण्याला 'जीवन' या शब्दाने संबोधिले जाते. संशोधन कार्यात सर्वप्रथम पाणी कुठे उपलब्ध आहे? ते कोणत्या स्वरूपात आहे? त्याचा साठा किती आहे? इत्यादी प्रश्नांची उत्तरं शोधण्याला प्राधान्य देण्यात येते. साधारण १५ अब्ज वर्षांपूर्वी येल्म नावाच्या लहान गोळ्याचा एकाएकी स्फोट होऊन मोठ्या मात्रेत ऊर्जा बाहेर फेकली गेली. ती सर्व दिशांनी पसरत गेल्याने तिचे तापमान कमी कमी होत गेले. स्फोटानंतर क्वार्क आणि इलेक्ट्रॉन या मूलभूत कणांची निर्मिती झाल्याने त्यांच्यापासून अणुगर्भ निर्माण झाले. क्षणाक्षणाला ते दूर दूर पसरत जाऊन तापमानात घट होत गेली. तापमान साधारण १०,००० अंश झाल्यावर हायड्रोजन आणि हिलियम ची निर्मिती झाली. तापमान घटू लागले. या ढगांचा विशाल आणि ओबडधोबड आकार कमी होत जाऊन साधारण एक अब्ज वर्षानंतर त्या ढगातून तारे निर्माण झाले. या ताऱ्यांना पहिल्या पिढीचे तारे अथवा (Population III Stars) म्हटले जाते. ते तारे अतिशय मोठे असल्याने त्यांचे आयुष्य फारच कमी (साधारण काही हजार वर्ष) होते.

अल्पकाळातच त्यांच्या गाभ्याच्या बाहेरील भागात क्रमाक्रमाने वेगवेगळ्या संघटन अणुभट्या (Fusion Reactors) निर्माण होऊन त्यात प्राणवायूची निर्मिती झाली. या अवस्थेतील मोठ्या ताऱ्याच्या अवस्थेला 'तांबडा राक्षसी तारा (Red Gaint) असे म्हणतात. ताऱ्याची ही अवस्था काही सहस्र वर्षीचीच असते. त्यामुळे ते तारे फुटून इतर काही मूलद्रव्यांसह प्राणवायू प्राप्त झाला आहे. पाण्याच्या निर्मितीची प्रक्रिया : तांबडा राक्षसी ताऱ्याचे आयुष्य बरेच लहान असते. त्यामुळे ते लवकरच, म्हणजे काही हजार वर्षांनंतर फुटले आणि त्यातील प्राणवायू मोकळा झाला. त्या प्राणवायूचे हायड्रोजनच्या अणूंशी संयोग होऊन जक म्हणजे हायड्रोक्विल हे मौलिक (Radical) निर्माण झाले. हे मौलिक इतर अणूंशी संयोग पावण्यात अतिशय तत्पर असल्याने त्यांचा तेथील हायड्रोजनच्या अणूंशी संयोग होऊन करज हे पाण्याचे रेणू निर्माण झाले.

अशा प्रकारे पाण्याचे रेणू जरी निर्माण झाले तरी त्यांना जपून ठेवणे बरेच आवश्यक होते. हे नव्याने निर्माण झालेले पाण्याचे रेणू फुटून प्राणवायू आणि हायड्रोजन अलग झाले असते. परंतु 'देव तारी त्याला कोण मारी' या म्हणीनुसार त्या नवनिर्मित पाण्याच्या रेणूंचे रक्षण कसे झाले यावर विचार करूया. या रक्षण कार्यात दोन प्रमुख घटना कारणीभूत ठरल्याचे लक्षात येते.



(१) या विशाल ताऱ्याची राक्षसी अवस्था त्याच्या निर्मितीनंतर काही हजार वर्षांनंतरच होत असल्याने निर्माण झालेले इतर तारे त्यांच्या बाल्यावस्थेत होते. त्यांच्या सभोवती धूळ आणि वायूचे पांघरूण होते. त्यामुळे त्यांचेकडून अतिनील प्रारण बाहेर पडण्याची शक्यता फारच कमी होती.

(२) तांबडा राक्षसी ताऱ्यात निर्माण होणारे पाणी त्या ताऱ्याच्या गर्भापासूनच्या बरेच बाहेरच्या थरात निर्माण होत असते. अतिनील प्रारण मात्र त्या ताऱ्याच्या आतल्या थरात निर्माण होते. या दोन थरांमधील भागात बराच जाड वायूचा थर असल्याने हा वायू त्याच्या बाहेरील थरात निर्माण झालेल्या पाण्याला आतील थरात निर्माण होणाऱ्या अतिनील प्रारणापासून वाचवतो.

**पाण्याच्या जन्मस्थानापासून भ्रमण:** तांबडा राक्षसीतारा साधारण १० ते १५ दशलक्ष वर्षांनंतर त्याच्या अंताकडे जातो. या अवस्थेत त्याचा व्याप वाढत जाऊन शेवटी स्फोट होतो. जपून ठेवले गेलेले पाणी सर्व दिशांनी अवकाशात फेकले जाते. हे बाहेर फेकलेले पाणी अवकाशातील धूमकेतू, बटूतारे, नव्याने निर्माण होत असणारे ग्रह इत्यादींमध्ये जाऊन त्या अतिथंड पिंडांमध्ये बर्फाच्या अवस्थेत राहते. आपल्या सूर्यमालेतील गुरू, शनी, युरेनस, प्लूटोच्या भोवती फिरणाऱ्या काही चंद्रांमध्ये बर्फाच्या रूपात पाणी आढळून आल्याने या विचाराला पुष्टी मिळते. आणि काही ढगात पाणी निर्माण झाले आहे.

**पृथ्वीवरील पाणी:** साधारणपणे साडेचार अब्ज वर्षांपूर्वी पृथ्वीची निर्मिती झाल्यानंतर ०.३२ अब्ज ते ०.७२ अब्ज वर्षांच्या काळात पृथ्वीवर पाण्याची निर्मिती झाली असल्याचे मानले जाते. हे स्पष्ट करणाऱ्या प्रमुख दोन कल्पना केल्या जातात.

पहिल्या कल्पनेनुसार तांबड्या राक्षसाच्या स्फोटानंतर बाहेर फेकले गेलेले पाणी काही लघुग्रहांमध्ये प्रथम साठविले गेले. हे पाणीधारी लघुग्रह पृथ्वीवर आदळण्याने त्यांच्यात साठविलेले पाणी प्राप्त झाले, असे मानले जाते. दुसऱ्या कल्पनेप्रमाणे पृथ्वी आणि सूर्यमालेतील इतर ग्रह निर्माण होण्याच्या काळात काही खडक अथवा बर्फाचे लहान लहान गोळे अगोदरच निर्माण झाले होते. प्लॅनेटेसिमल या नावाने ते संबोधिले जातात. तांबडा राक्षसाच्या स्फोटाने बाहेर फेकले गेलेले पाणी अथवा बर्फ या लहान लहान पिंडांमध्ये साठवले गेले असल्याने ते गोळे पृथ्वीवर आदळून अथवा पृथ्वी निर्माण काळातच तिच्यात सम्मिलित झाल्याने पृथ्वीवरील पाणी निर्माण झाले असल्याचा अंदाज आहे.

अजून एका कल्पनेप्रमाणे पृथ्वीच्या निर्मितीच्या अगोदरच हायड्रोजन आणि प्राणवायू निर्माण झाले असल्याने त्यांच्यापासून पृथ्वीवर पाणी निर्माण झाले असावे. परंतु ही मूलद्रव्ये तांबडा राक्षसाच्या स्फोटाने प्राप्त झाले असल्याने 'पृथ्वीवरील पाण्याची निर्मिती तांबड्या राक्षसापासून झाली' असेच बोलले जाते. पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या क्षेत्रफळाच्या साधारण ७१ टक्के भागावर पाणी पसरलेले आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागाचे क्षेत्रफळ ५.१० दशलक्ष वर्ग किलोमीटर असल्याने भूतलावर ३.६१ दशलक्ष वर्ग किलोमीटर क्षेत्र पाण्याने व्यापले आहे. या पाण्याचा ९६.५ टक्के पाणी समुद्रात खारेपाणी असून फक्त ३.५ टक्के पाणी 'गोड पाणी' असल्याचे समजते. हे गोड पाणी समुद्रातील हिमनग, भूजल आणि नदी, सरोवर विहिरी इत्यादींमधून आढळते. द्रव रूपातील पाणी आपल्या सूर्यमालेत फक्त पृथ्वीवरच आढळते. इतर ठिकाणी पाणी बर्फ आणि वाफ या रूपातच असते.

बर्फाच्या रूपात पाणी पृथ्वीच्या पलीकडे काही मात्रेत मंगळाच्या ध्रुव प्रदेशात आणि चंद्रांवर असल्याचे समजते. अनेक धूमकेतूंमध्ये बर्फाच्या रूपात पाणी साठविले असल्याचे सिद्ध झाले आहे. शुक्र ग्रह सूर्याच्या जवळ असल्याने त्याच्या वातावरणात वाफेच्या रूपात पाणी आहे. समुद्राच्या पाण्याची सूर्याच्या उष्णतेने वाफ होऊन ती ढगात जाते. या वाफेत समुद्राच्या पाण्यातील मिठाचा अंश नसतो. हे ढग आकाशात उंच जाऊन त्या वाफेचे द्रवीकरण होऊन पावसाच्या रूपाने ते पाणी खाली पडते. हे पाणी जमिनीवरून नद्यांच्या रूपाने पुन्हा समुद्राला मिळते. नद्यांच्या रूपाने हे पाणी वाहात असल्याने जमिनीवरील अनेक क्षार त्या पाण्यात मिसळले जातात. अशा प्रकारे समुद्राला जास्तीचे क्षार मिळत असतात आणि समुद्रातील क्षारांचे प्रमाण सतत वाढत जाते, हे निश्चित.



## श्रीरामाची आरती

श्रीरामचंद्रा तुला आरती ओवाळीतो,
मनोभावे ओवाळीतो ।।धृ।।
श्रीराममूर्ती पद्मासनी साजरी,
प्रेमदृष्टी भक्तावरी
सीतामाई वामांगी शोभते,
मातृवात्सल्ये पाहते
दक्षिणभागी हा सुमित्रानंदन,
रामचरणी ज्याचे मन
हात जोडोनिया हनुमंत नम्र उभा,
लीनभक्तीचा गाभा
पंचायतन भक्तिभावे पाहतो,
मनोभावे ओवाळीतो ।।१।।
कनकतबक त्याला मोतियाचे कोंदण,
त्यात रुप्याचे निरांजन
गोनवनीतोद्भवात भिजलेली,
वात त्यात सरकविली
भक्तिभावाने ज्योत तेजाळली,
धरा सारी झळाळली
पाहे कवतीके कौसल्यानंदन,
रामकृपेची खूण
हृदयार्तीने आरती ओवाळीतो,
मनोभावे ओवाळीतो ।।२।।
कोदंडधारी राम आजानुबाहू,
राम आदर्शाचा ठावू
दैत्य-दानवा रामाचा थरार,
राम भक्ता दयासागर
हनुमंताचा राम सखा धीवर,
राम सीतासर्वेश्वर
लक्ष्मणाचा भरताचा भ्राता,
राम आनंदाचा कर्ता
श्रीरामाला आनंदे न्याहाळीतो,
मनोभावे ओवाळीतो ।।३।।
राम सगुणही राम निर्गुणही,
श्रुती कीर्ती सदा गाई
अणुरेणूहुनी राम किती थोकटा,
राम आहे किती मोठा
ओवाळावी आरती ब्रह्मांडाने,
चंद्र-सूर्याची निरांजने
सायुज्यदाता राम कृपासागर,
राम कैवल्याचे आगर
श्रीरामकृपे सलोकता पावला,
राम रामनामी रंगला ।।४।।

**राम तारे**



# ‘वॉर अ‍ॅण्ड पीस’...!

लक्ष्यवेध

**राहुल बोरगांवकर**

पश्चिम आशियात, आखाती देशांमध्ये उडालेल्या युद्धाच्या आगडोंबामुळे जगावर तिसऱ्या महायुद्धाचे सावट पडले आहे. जगभराची इंधनाची गरज भागविणाऱ्या या आखाती देशांमध्येच युद्ध सुरू असून, त्यामुळे खनिज तेलाचे, पर्यायाने पेट्रोल-डिझेलसारख्या इंधनांचे भाव वाढतील आणि सारे जग महागाईच्या तडाख्यात सापडेल, याची चिंता जगाला भेडसावत आहे. युद्धाला दहा दिवस उलटल्यानंतरही इराण आणि अमेरिका-इस्रायल हे दोन्ही शत्रू माघार घेण्यास तयार नसून, दिवसेंदिवस हे युद्ध उग्र होत चालले आहे. या पार्श्वभूमीवर भारतातील स्थिती पाहिली, तर अनेकांना आश्चर्याचा धक्काच बसेल.

भारतीयांमध्ये आजघडीला तरी महागाई आणि इंधनटंचाईबद्दल चिंतेची भावना पसरलेली नाही. युद्धाच्या पार्श्वभूमीवरही भारतात शांतता आहे. याचे कारण, भारतात सर्वत्र इंधन आणि स्वयंपाकाचा गॅस मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. सरकारने अजूनही पेट्रोल-डिझेलच्या दरांमध्ये वाढ केलेली नाही. उलट, भारतीयांचे दैनंदिन जीवन आणि सारे व्यवहार निर्वेधपणे सुरू आहेत. भारतात नुकताच होळीचा सण उत्साहात पार पडला. इतकेच नव्हे, तर देशात क्रिकेट- जगतातील मानाची ‘टी-२०’ विश्वचषक स्पर्धाही पार पडली. भारतीय संघाने अंतिम सामन्यात जबरदस्त खेळी करून, न्यूझीलंडचा दणदणीत पराभव केला आणि देशात युद्ध जिंकल्यासारखी विजयी आनंदाची लाट पसरली. दुसरीकडे भारताची अर्थव्यवस्था यंदाही सात टक्क्यांपेक्षा अधिक दराने विकास साध्य करील, असे अंदाज जागतिक वित्तसंस्थांनी व्यक्त केले आहेत. लोकसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पाही सुरू झाला आणि नेहमीप्रमाणेच विरोधी पक्षांनी पहिल्याच दिवशी गोंधळ घालून, लोकसभेचे काम बंददेखील पाडले. याचाच अर्थ, देशात सर्वकाही सुरळीत सुरू आहे. देशात अशी सुरळीत स्थिती निर्माण करण्यासाठीच, एका व्यक्तीने आपली रात्रीची झोप घालविली आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेले एक तप जे राजनैतिक मुत्सद्देगिरीचे राजकारण केले, त्याची फळे आज देश चाखतो आहे. मोदी यांनी जगभर फिरून बहुसंख्य देशांच्या प्रमुखांशी सौहार्दाचे, क्वचित प्रसंगी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. विशेष म्हणजे जागतिक पटलावर एकमेकांचे शत्रू असलेल्या देशांच्या

**आखातातील युद्धाने जगातील संपन्न देशांची झोप उडविली असून, इंधनाच्या संभाव्य टंचाईमुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्था भीतीने थरथरत आहेत. अमेरिकेसारख्या महासत्तेला दररोज अब्जावधी डॉलरचा चुराडा सहन करावा लागत असून, दुसरीकडे भारतात सर्वकाही आलबेल आहे. यामागे केवळ एका व्यक्तीचे अथक परिश्रम आणि मुत्सद्दी धोरण आहे.**

प्रमुखांचे, मोदी यांच्याशी मात्र सलोख्याचे संबंध आहेत. तसेच आपल्या शत्रूदेशाशी भारताने (म्हणजे मोदींनी) मैत्रीचे संबंध राखल्याबद्दलही, त्यांची मोदी यांच्या विरोधात कसलीच तक्रार नाही. भारताशी कृतघ्नपणे वागलेले देशही, आज मोदी यांच्याशी मैत्री करण्यास तयार असतात. परस्परविरोधी विचारांच्या देशांनी, मोदी यांना आपला सर्वोच्च नागरी सन्मानही दिला आहे. या जागतिक युद्धाच्या पूर्वसंध्येला भारताची देशांतर्गत राजकीय, आर्थिक आणि सामाजिक स्थिती हेवा वाटावी इतकी समतोल आणि शांत आहे.

भारताची अर्थव्यवस्था वेगाने धावत असून, देशात राजकीय स्थैर्य आहे. तसेच सामाजिक तणावही मर्यादेत आहेत. माओवादी हिंसाचार संपुष्टात आला आहे. भारताच्या लष्करी सामर्थ्यामुळे, त्याच्याकडे वाकडी नजर करण्याचे धैर्य कोणातच नाही. हे सर्व मोदी आणि त्यांच्या मंत्रिमंडळाने इतकी वर्षे घेतलेल्या अपार मेहनतीचेच फळ आहे. मोदी यांच्या या कार्याची दखल घेणे तर सोडाच; पण त्यांच्या प्रत्येक निर्णयाची खिल्ली उडविणे इतकेच विरोधी पक्षांना काम उरले आहे. त्यातूनच त्यांचा बिनडोकपणा आणि कपटी वृत्तीचे दर्शन घडते. जे भारतीय मोदी यांच्या निर्णयांवर नाखूश आहेत, त्यांनी एकदा जगाची स्थिती काय आहे? त्यावर नजर टाकावी. जगात कुठेही युद्ध नसतानाही काँग्रेसच्या राजवटीत देशात गॅस सिलिंडर आणि पेट्रोलची टंचाई होत असे. परकीय चलनाची टंचाई तर पाचवीलाच पूजलेली होती. त्यासाठी काँग्रेसने देशातील सोनेही परदेशात गहाण ठेवले होते. मोदी यांनी आता यापैकी बरेचसे सोने पुन्हा भारतात आणले आहे.

आज भारताकडे ७०० अब्ज डॉलरची विक्रमी परकीय गंगाजळी शिल्लक आहे. शिवाय, जगातील सर्वश्रेष्ठ तंत्रज्ञान कंपन्यांनी भारतात अब्जावधी रुपयांची गुंतवणूक करण्याच्या योजना आखल्या आहेत. त्यामुळे परकीय चलनाची गंगाजळी वाढणारच आहे. पण, केवळ डॉलरवर भारत अवलंबून राहिलेला नाही. डझनभर देशांशी भारत आजही रुपयातून व्यापार करीत असून, आणखी अनेक देशांशी रुपयात व्यवहार करण्याचे करार केले आहेत. अशा देशांची संख्या दिवसागणिक वाढत आहे. ‘यूपीआय’च्या माध्यमाने भारत आणि अन्य काही देशांमध्ये होणारी पैशांची देवाणघेवाण फक्त सुलभच झाली आहे असे नव्हे; तर त्यामुळेही भारताचे डॉलरवरील अवलंबित्वही कमी होत चालले आहे. अशा निर्णयांचे दूरगामी परिणाम होत असतात. जगभरातील प्रगत देशांच्या अर्थव्यवस्था रडतखडत चालू असताना, भारताची अर्थव्यवस्था चौखूर उधळली आहे. जगभरातील अंधारलेल्या आर्थिक अवकाशात भारताची अर्थव्यवस्था हाच चमकणारा तेजस्वी तारा आहे, असे अर्थतज्ज्ञ म्हणत असतात. आता जग युद्धाच्या ज्वाळेत होरपळत असताना, भारतात मात्र बर्फासारखा गारवा आहे, असे म्हणावे लागते. फ्रान्सचा सम्राट नेपोलियनने रशियावर केलेल्या आक्रमणाच्या पार्श्वभूमीवर, प्रसिद्ध रशियन लेखक लिओ टॉलस्टॉय यांनी लिहिलेली ‘वॉर अ‍ॅण्ड पीस’ ही कादंबरी विलक्षण गाजली. ती अभिजात कलाकृती मानली जाते. देशावर आलेल्या परचक्राच्या संकटातही मानवी कोमल भावना केवळ कायमच राहतात असे नव्हे, तर त्या व्यक्तीला योग्य निर्णय घेण्यास प्रेरितही करतात, हे या कादंबरीचे सूत्र. भारताच्या सर्व शेजारी देशांमध्ये भयानक यादवी हिंसा होऊन सत्तापालट झाला आहे. भारततही असेच घडावे, यासाठी बहुतेक विरोधी पक्ष, त्यातही काँग्रेस जीवाचे रान करीत आहेत. त्यात त्यांना यश येणे शक्यच नाही. जगात ‘वॉर’ असले, तरी भारतात मात्र ‘पीस’ आहे. कारण हा मोदी यांच्या मुत्सद्दी धोरणाचा लाभांश आहे.

**नेपाळच्या २०२६च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये बालेन शाह यांच्या ‘राष्ट्रीय स्वतंत्र पक्षा’चा विजय झाला असून, या घटनेने नेपाळच्या राजकीय इतिहासात एक नवा टप्पा नोंदवला गेला आहे. दीर्घकाळ पारंपरिक पक्षांच्या प्रभावाखाली राहिलेल्या नेपाळी लोकशाहीत, यावेळी मतदारांनी स्पष्टपणे बदलाची दिशा स्वीकारली. नेपाळमधील निवडणूक सामाजिक बदलांचे राजकीय प्रतिबिंब म्हणूनही महत्त्वाची ठरते.**

# प्रत्यक्ष कृतीची वेळ...




परराष्ट्रकारण

**कौस्तुभ वीरकर**

गेल्या काही वर्षांत नेपाळमध्ये तरुणांमध्ये वाढत चाललेली बेरोजगारी, भ्रष्टाचाराबाबतची नाराजी आणि प्रशासनातील अकार्यक्षमता यांविषयी तीव्र असंतोष निर्माण झाला होता. २०२५ मध्ये झालेल्या तरुणांच्या आंदोलनांनी, या असंतोषाला व्यापक स्वरूप दिले. समाज माध्यमांवर सक्रिय असलेल्या ‘जेन-झी’ने नेपाळमधील सरकारला थेट आव्हान दिले. त्यावेळी तरुणांच्या या ऊर्जेला राजकीय स्वरूप देण्यात बालेन शाह यशस्वी ठरले. सांस्कृतिक क्षेत्राशी जोडलेली पार्श्वभूमी असलेल्या शाह यांनी भ्रष्टाचारविरोधी शासन, रोजगारनिर्मिती आणि प्रशासनातील पारदर्शकता यांसारख्या मुद्द्यांवर ठाम भूमिका घेतली. त्यामुळे नावीन्याच्या शोधात असलेल्या आणि पारंपरिक पक्षांच्या अकार्यक्षमतेला कंटाळलेल्या तरुण मतदारांवर त्यांचा तत्काळ प्रभाव पडला. त्याचीच परिणीती ते स्वतंत्रपणे काठमांडू शहराचे महापौर निवडून आले. त्यानंतर आता त्यांच्या गळ्यामध्ये याच तरुणाईने पंतप्रधानपदाची माळ घातली आहे. तथापि, या विजयासोबतच बालेन शाह यांच्यासमोर आव्हानांचा एक मोठा डोंगर असणारच आहे.

ज्या आंदोलनामुळे बालेन शाह यांचा एक कलाकार ते नेपाळचा पंतप्रधान हा प्रवास झाला, त्या आंदोलनकर्त्यांच्या अपेक्षा अत्यंत मोठ्या आहेत. बालेन शाह यांनी प्रचारादरम्यान अर्थव्यवस्था मजबूत करणे, रोजगारनिर्मितीची प्रक्रिया गतिमान करणे आणि भ्रष्टाचाराविरुद्ध कठोर कारवाई करणे यांसारखी आश्वासने दिली आहेत. परंतु, शासन-कारभाराच्या गुंतागुंतीच्या प्रक्रियेत ही आश्वासने प्रत्यक्षात उतरविणे सोपे नसते. त्यामुळे बालेन शाह यांना ही आश्वासने पूर्ण करण्यासाठी मेहनत घ्यावी लागणार आहे. अन्यथा, त्यांची आश्वासने ‘बोलाचा भात आणि बोलाचीच कढी’ ठरतील. दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यात बालेन शाह यांना अपयश आले, तर देशातील तरुणाई पुन्हा असंतोषाच्या रूपाने बालेन शाह यांच्या विरोधात उभी राहू शकते. त्यासाठी बालेन शाह यांना नेपाळमधील ‘जेन-झी’ची ऊर्जाही शासनाच्या कार्यक्षमतेशी जोडून घ्यावी लागणार आहे.

याशिवाय, बालेन शाह यांच्या समोरचे दुसरे महत्त्वाचे आव्हान म्हणजे नेपाळचे भू-राजकीय संतुलन. आर्थिक विकासासाठी परकीय गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा प्रकल्प आवश्यक असले, तरी त्यातून निर्माण होणार्या राजकीय प्रभावाचे व्यवस्थापन करणे, ही कोणत्याही नेपाळी नेतृत्वासमोरील मोठी कसोटी असते. बालेन शाह यांच्या पूर्वीच्या काही भूमिकांमुळे यासंदर्भातील चर्चा अधिकच महत्त्वाची ठरते. उदाहरणार्थ, भारताचा भूभाग नेपाळमध्ये दाखवलेला ‘ग्रेटर नेपाळ’चा नकाशा आपल्या कार्यालयात लावणे किंवा काहीकाळ भारतीय चित्रपटांवर निर्बंध लावण्याचा निर्णय, अशा भूमिका बालेन यांच्या राजकारणाचा भाग राहिल्या आहेत. आता पंतप्रधानपदाच्या जबाबदारीत या भूमिकांकडे त्यांना अधिक संतुलित दृष्टिकोनातून पाहावे लागेल. आंतरराष्ट्रीय संबंधांच्या दृष्टीने नेपाळला भारताशी असलेले ऐतिहासिक, आर्थिक आणि सांस्कृतिक संबंध जपणे महत्त्वाचे असून, नेपाळच्या धोरणात्मक स्वातंत्र्याचेही रक्षण चीनपासून बालेन यांना करावे लागणार आहे. यात बालेन अपयशी ठरल्यास, नेपाळ दीर्घकाळ त्याची किंमत चुकवेल.

परिवर्तनाच्या घोषणा आणि त्याची अंमलबजावणी यामध्ये अनेकदा मोठी दरी असल्याचे आढळते. बालेन शाह यांनी जर प्रशासनिक कार्यक्षमता, आर्थिक सुधारणा आणि संतुलित परराष्ट्र धोरण या क्षेत्रांत ठोस पावले उचलली, तरच त्यांचे नेतृत्व नेपाळच्या राजकीय इतिहासात निर्णायक ठरेल. अन्यथा, बालेन यांचा झालेला विजय ही, निव्वळ एक राजकीय लाटच ठरेल. नेपाळमधील तरुणाईने असंतोषातून घडवलेला हा बदलाचा प्रयोग, आता प्रत्यक्ष शासन-कारभाराच्या कसोटीवर उभा असून, त्या कसोटीतूनच बालेन शाह यांच्या नेतृत्वाचे खरे राजकीय मूल्यमापन होणार आहे.



# शालिवाहन आणि त्याची संजीवनी विद्या

**ज्याप्रमाणे शालिवाहन या एका सर्वसामान्य माणसाने संजीवनी मंत्राच्या साहाय्याने मातीतून योद्धे निर्माण केले, अगदी तसेच, डॉ. हेडगेवार या एक सर्वसामान्य, कनिष्ठ मध्यमवर्गीय माणसाने मातीतून कार्यकर्ते निर्माण केले. हिंदू समाज मातीसारखाच निष्प्राण, निस्त्राण होऊन बसला होता. कुणीही बलदंडाने यावे आणि मातीप्रमाणेच या हिंदू समाजाला मनसोक्त तुडवावे, लुटावे, मारावे, बाटवावे अशी स्थिती होती. डॉ. हेडगेवारांनी या निष्प्राण मातीवर संघटनेचा संजीवनी मंत्र टाकला. संघटनेचे सर्व समस्या हळूहळू दूर होतील, ‘संघटन में शक्ती हैं’ हा छोटा मंत्र आणि दैंनदिन संघशाखा हे सोपे तंत्र ‘मंत्र छोटा, तंत्र सोपे’ निर्माण करून त्यांनी चमत्कार घडवला.**

विशेष

**मल्हार कृष्ण गोखले**

गुढीपाडवा किंवा वर्षप्रतिपदा या दिवशी सुरू होणारे नवे वर्ष, नवे संवत्सर याबद्दलची भरभरून माहिती आपण दरवर्षीच वाचत-ऐकत पाहत असतो. गुढीपाडवा हा हिंदू समाजाच्या अत्यंत पवित्र अशा साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्यामुळे त्या दिवशी धार्मिक कार्यक्रमही पुष्कळ असतात. नव्या घरात प्रवेश, मुलांचे जावळं काढणे, सत्यनारायण पूजा, सोने खरेदी, नवीन वाहन खरेदी, गुढ्या-तोरणांची सजावट आणि या सगळ्यांच्या निमित्ताने बाजारात भरपूर उलाढाल म्हणजेच एकंदरीत प्रत्येक घरासह एकंदर समाजात खूप उत्साह, खूप धावपळ, खूप आनंद या दिवशी ओसंडून वाहत असतो.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघात या दिवसाला एक वेगळेच महत्त्व आहे. संघ संस्थापक डॉ. हेडगेवार यांनी सुरुवातीपासूनच संघामध्ये कोणत्याही व्यक्तीची पूजा करण्याचा परिपाठ ठेवला नाही. संघामध्ये गुरू म्हणून कुणीही व्यक्ती नाही, तर भगवा ध्वज हाच गुरू आहे. देशभरातल्या सर्व हिंदू समाजाला पूज्य असणारे असंख्य साधू- संत, महापुरुष, महान स्त्रिया; इतकेच नव्हे तर, राम आणि कृष्ण यांच्यासारखे दैवी अवतार यांना संघ भारतमातेचे पुत्र-कन्या म्हणून पूज्य मानतो. भारतमाता हे सर्वोच्च दैवत आणि भगवा ध्वज हा गुरू. परंतु, अतिशय निर्दोष अशी ही परंपरा ज्यांनी सुरू केली आणि व्यक्तिमाहात्म्य या बाधक ठरू शकणाऱ्या अवगुणाला थाराच ठेवला नाही. अशा डॉ. हेडगेवारांची काहीतरी आठवण, कृतज्ञतेची खूण म्हणून ठेवणे आवश्यकच होते. त्यासाठी असा प्रघात सुरू करण्यात आला की, वर्षप्रतिपदेच्या दिवशी ध्वज लागून रीतसर शाखेला सुरुवात होण्यापूर्वी ‘आद्यसरसंघचालक प्रणाम’ दिला जातो. संपूर्ण वर्षभरात डॉ. हेडगेवार या व्यक्तीला प्रणाम करण्याचा हा एकमात्र, एकमेव प्रसंग असतो.

शालिवाहन किंवा सातवाहन हा एक अनाथ मुलगा होता. दोन हजार वर्षांपूर्वी महाराष्ट्राची राजधानी असलेल्या प्रतिष्ठान उर्फ पैठण या नगरीत एका कुंभाराच्या कारखान्यात तो हरकाम्या पोऱ्या म्हणून वावरत होता. एका साधूने त्याच्या हातावरील राजचिन्हे पाहून त्याला संजीवनी विद्या- मेलेल्यांना जिवंत करण्याची विद्या शिकवली. प्रतिष्ठान नगरीवर परकीय आक्रमक शकांची टोळधाड आली. तेव्हा शालिवाहनाने आपल्या मालकाशी बोलणे करून मातीचे सैन्य बनवले. मग संजीवनी मंत्राने त्या सैनिकांना जिवंत केले. ते सैन्य घेऊन तो राजाच्या मदतीला गेला आणि त्यांनी शकांचा पराभव केला. आनंदित झालेल्या राजाने शालिवाहनाला प्रथम सेनापती, मग युवराज आणि शेवटी राज्यपदच दिले. शालिवाहनाने मोहिमांवर मोहिमा काढून शकांना पूर्ण पराजित करून देशाबाहेर हाकलून दिले. ज्या शक टोळ्यांना भारतातच राहायचे होते, त्यांना त्यांच्या परकीय संस्कृतीचा त्याग करायला लावून हिंदू संस्कृतीचा स्वीकार करायला लावला. हे कार्य नर्मदेच्या तीरावर भृगुकच्छ उर्फ भडोच नगरीत बराच काळ चालू होते. अखेर भारत देश शकमुक्त देश झाला. ही पुराणकथा प्रसिद्धच आहे.

ज्याप्रमाणे शालिवाहन या एका सर्वसामान्य माणसाने संजीवनी मंत्राच्या साहाय्याने मातीतून योद्धे निर्माण केले, अगदी तसेच, डॉ. हेडगेवार या एक सर्वसामान्य, कनिष्ठ मध्यमवर्गीय माणसाने मातीतून कार्यकर्ते निर्माण केले. हिंदू समाज मातीसारखाच निष्प्राण, निस्त्राण होऊन बसला होता. कुणीही बलदंडाने यावे आणि मातीप्रमाणेच या हिंदू समाजाला मनसोक्त तुडवावे, लुटावे, मारावे, बाटवावे अशी स्थिती होती. डॉ. हेडगेवारांनी या निष्प्राण मातीवर संघटनेचा संजीवनी मंत्र टाकला. संघटनेचे सर्व समस्या हळूहळू दूर होतील, ‘**संघटन में शक्ती है**’ हा छोटा मंत्र आणि दैनंदिन संघशाखा हे सोपे तंत्र ‘मंत्र छोटा, तंत्र सोपे’ निर्माण करून त्यांनी चमत्कार घडवला. विशेष म्हणजे त्यांचा जन्म वर्षप्रतिपदेलाच झाला होता. त्यामुळे डॉ. हेडगेवार हे आधुनिक काळातले शालिवाहनच आहेत. अशा आशयाची मांडणी संघ प्रचारक, कार्यकर्ते, स्वयंसेवक हे नेहमीच करत असतात आणि करत राहतील. या निमित्ताने आपण हिंदू परंपरेतल्या वर्षप्रतिपदा आणि संजीवनी विद्या यांचा थोडा आढावा घेऊ या...

वर्षप्रतिपदेला पृथ्वी सूर्याभोवतीची आपली एक प्रदक्षिणा संपवून नव्या प्रदक्षिणेला सुरुवात करते, ही झाली खगोलशास्त्रीय घटना. परंतु त्या दिवशी घडलेली ऐतिहासिक संस्मरणीय घटना म्हणजे कृष्णाने केलेला कालियाचा पराभव. महाभारत कथेत कृष्ण आहेच, पण मुळात महाभारत हा कौरव-पांडव संघर्षाचा, कुरू नामक वंशाचा इतिहास आहे. कृष्णाचा इतिहास म्हणजे भागवत महापुराण किंवा श्रीमद्भागवत. एखाद्या व्यक्तीच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतची हकिकत म्हणजे इतिहास, ही संकल्पना पाश्चिमात्य आहे. त्यामुळे श्रीमद्भागवताच्या बारा स्कंध म्हणजे प्रकरणांमध्ये असंख्य हकिकती आहेत. त्यापैकी दहाव्या स्कंधात कृष्णाचे समग्र जीवनचरित्र येते. कृष्णाने तान्हे बाळ असतानाच पूतना राक्षसीसह अनेक राक्षसांना ठार केले तसेच वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षी मुद्दाम यमुनेत उडी मारून अत्यंत बलाढ्य अशा कालिया नामक नागाला पराभूत केले. या कथेसह सगळ्याच कृष्णकथांना एक अद्भुताच्या स्पर्श आहे.

सध्या आपल्या सवयीच्या झालेल्या कथित आधुनिकतेत या अद्भुत कथा बसत नाहीत. पण एक समांतर बलकथा आहे. इ. स. १६६३ साली शिवरायांनी शाहिस्तेखानावर घातलेला यशस्वी कमांडो छापा ही थेट कालियामर्दनाचीच आवृत्ती आहे. आता संजीवनी विद्येकडे वळू या. भृगू महर्षींच्या अनेक पुत्रांपैकी शुक्राचार्य हे एक होत. हे राक्षसांचे गुरू बनले. भगवान शिवाची उग्र तपस्या करून त्यांनी त्यांच्याकडून संजीवनी विद्या मिळवली. मग त्यांच्याकडून ती प्राप्त करून घेण्यासाठी देवगुरू बृहस्पतीचा पुत्र कच हा आला. संजीवनीचा यानंतर उल्लेख रामायणात येतो. इंद्रजितच्या बाणाने लक्ष्मण मृत होतो. तेव्हा वानरांचा वैद्य सुषेण याच्या आदेशानुसार हनुमंत थेट हिमालयात जातो. तो ते द्रोणागिरी नामक अख्खे शिखरच उपटून आणतो. सुषेण संजीवनीच्या प्रयोगाने लक्ष्मणाला जिवंत करतो, इत्यादी. आता गं त पहा की, इथे संजीवनीला मंत्र न म्हणता वल्ली म्हणजे वेल म्हटले आहे. सुषेण संजीवनी वल्लीच्या औषधी उपयोगाने लक्ष्मणाला सजीव करतो, संजीवनी मंत्राच्या जपाने नव्हे. आता आपण रामायण काळ, शालिवाहनाचा काळ यातून एकदम आधुनिक काळात येऊ. मुंबईच्या दादर पश्चिम भागात डोंगरे बाग नावाची वाडी होती. आता तिला अमृतकुंभ सोसायटी म्हणतात. तिथे विनायक परशुराम उर्फ अप्पाशास्त्री जोशी नावाचे नामांकित वैद्य राहात असत. ते मूळचे पेणचे. किशोरवयातच ते घरदार सोडून हिमालयात गेले. तिथे त्यांना योग्य गुरू मिळाले आणि ते आयुर्वेदात निष्णात झाले. विद्या पूर्ण झाल्यावर गुरूंनी त्यांना आदेश दिला की, आता थेट मुंबईत जायचे. तिथे दवाखाना थाटून अतिशय माफक दरात रुग्णसेवा करायची. त्यानुसार पुढील आयुष्यात अप्पाशास्त्री एक नामांकित वैद्य आणि महान गाणपत्य म्हणून प्रसिद्धीस आले. एका विद्वान मित्राने एकदा त्यांना विचारले, ‘संजीवनी विद्या किंवा मंत्र किंवा वल्ली हे सगळे खरे आहे का? मृत व्यक्ती जिवंत होणे हे निसर्गाविरुद्ध आहे. मग असे घडू शकते का?’ यावर अप्पाशास्त्री उत्तरले, ‘होय, असे घडू शकते.’ साहजिकच पुढचा प्रश्न आला. ‘मग अप्पा, तुम्हाला ही विद्या येते का?’ अप्पाशास्त्री उत्तरले, ‘होय. आजवरच्या तुमच्या कारकीर्दीत असा प्रसंग आलाय का?’ अप्पाशास्त्री उत्तरले, ‘होय. फक्त एकदाच. महान वारकरी संत मामासाहेब दांडेकर हे अत्यवस्थ आहेत, अशी बातमी मला कळली. मी पुण्याला गेलो. मामांना भेटलो. त्यांना प्रार्थना केली की, या विद्येचा प्रयोग करण्याची परवानगी द्या. मामांनी आपले डोळे माझ्यावर रोखले आणि म्हणाले, कशाला माझ्या आणि पांडुरंगाच्या भेटीआड येता? मामांची अनुमती नाही म्हटल्यावर मी त्यांना अखेरचा प्रणाम केला. मामासाहेब १९६८ साली मरण पावले. अप्पाशास्त्री १९७५ साली मरण पावले. म्हणजेच संजीवनी विद्या किंवा मंत्र किंवा वल्ली यांचे रहस्य माहीत असलेला माणूस आता अगदी ५० वर्षांपूर्वी आपल्यात वावरत होता. भारत हा असा देश आहे की, अशा अद्भुत भासणाऱ्या गोष्टींचे ज्ञान असणारी माणसे इथे आजसुद्धा असू शकतील. ती असोत. त्यांचे कार्य ती माणसे करतच असतील. आपणा सर्वसामान्य हिंदू माणसांचे काम आहे डॉ. हेडगेवारांचा संजीवनी मंत्र जपण्याचे- **‘संघटन में शक्ती है! बटेंगे तो कटेंगे!! एक है तो सेफ है!!**